# प्रकरण तिसरे

# 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' वाङ्मयीन मूल्यमान

# प्रकरण तिसरे

## 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' वाङ्मयीन मूल्यमापन

**प्रास्तविक**

- आज इथे उद्या तिथे : रचनाविशेष
- देखणी दक्षिण : रचनाविशेष
- आज इथे उद्या तिथे : निसर्गचित्रण
- देखणी दक्षिण : निसर्गचित्रण
- आज इथे उद्या तिथे मधील व्यक्तिचित्रण
- देखणी दक्षिण : मधील व्यक्तिचित्रण
- 'आज इथे उद्या तिथे' मधील निवेदनशैली
- 'देखणी दक्षिण' मधील निवेदनशैली
- 'आज इथे उद्या तिथे' शीर्षकाची समर्पकता
- 'देखणी दक्षिण' शीर्षकाची समर्पकता
- आज इथे उद्या तिथे : छायाचित्रे
- देखणी दक्षिण : छायाचित्रे
- आज इथे उद्या तिथे : भाषाविशेष
- देखणी दक्षिण : भाषाविशेष
- 'आज इथे उद्या तिथे' मधील म्हणी

- 'देखणी दक्षिण' मधील म्हणी
- आज इथे उद्या तिथे : हिंदी शब्दांचा वापर
- देखणी दक्षिण : हिंदी शब्दांचा वापर
- आज इथे उद्या तिथे : इंग्रजी शब्दांचा वापर
- देखणी दक्षिण : इंग्रजी शब्दांचा वापर
- आज इथे उद्या तिथे : कोकणी शब्दांचा वापर
- देखणी दक्षिण : कोकणी शब्दांचा वापर
- आज इथे उद्या तिथे : हिंदी गीतांचा वापर
- देखणी दक्षिण : हिंदी गीतांचा वापर
- आज इथे उद्या तिथे : संवाद
- देखणी दक्षिण : संवाद
- आज इथे उद्या तिथे : काव्यात्मकता
- देखणी दक्षिण : काव्यात्मकता
- आज इथे उद्या तिथे मधील उपमा,प्रतिक
- समारोप
-

# प्रकरण तिसरे

## 'आज इथे उद्या तिथे'व 'देखणी दक्षिण'चे वाङ्.मयीन मूल्यमापन

**प्रास्ताविक :**

प्रवासवर्णनाचा विचार केला तर असे आढळून येते की, कोणतेही प्रवासवर्णन परिपुर्ण नसते. त्यामध्ये काहीतरी राहून गेल्याचे अथवा लेखकाचे एखाद्या घटकाकडे लक्ष न वेधणे किंवा एकच गोष्ट सातत्याने अतिशयोक्तीपुर्ण वर्णने अशा प्रकारचे दोषही लेखक करू शकतो.

लेखक जेव्हा आपले अनुभव लेखनीद्वारे साहित्यरूपात उतरवत असतो तेव्हा तो पाहिलेले सर्वच अनुभव जसेच्या तसे उतरवित नाही. पाहिलेल्या घटनाप्रसंगातून निवडक अशा प्रसंगांनाच तो प्राधान्य देतो. प्रवासवर्णनात खरा कस लागतो तो लेखकाच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे. लेखकाचे व्यक्तिमत्त्व बहुअयामी असेल तर असे प्रवासवर्णन वाचकांच्या पसंतीस उतरते. लेखक ज्या प्रदेशात जन्मला आहे. साहजिकच त्या प्रदेशाचाही छाप त्या प्रवासवर्णनावर उमटलेला दिसतो. तेथील लोकाचार रूढी, परंपरा, लोककला, सवयी, सण, उत्सव याचेही चित्रण लेखक आपल्या निवेदनातून करत असतो.

लेखकाचे वाचन किती आहे कोणत्या वाचनावर अधिक भर आहे. या सर्वांची उकल त्याच्या संदर्भ देण्यावरून ठरत असते. लेखकाचा कल नेमका कोणत्या घटकाकडे आकर्षित झाला आहे हेही त्यांच्या लेखनावरून दिसून येते. उषा पाणंदीकरांच्या आज इथे उद्या तिथे ह्या प्रवासवर्णनाचा विचार केला तर त्यांच्या व्यक्तित्वातून अपार कष्ट करण्याची हातोटी हाच गुण दिसून येतो. त्यांचे वाचनाचे वेड तर अफाट आहेच. पण प्रवास करण्यासाठीही त्या डगमगत नाहीत. आपल्या पतीराजांच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रवास करताना जाणवते. त्यांच्या प्रवासवर्णनात काव्यात्मकतेचाही गुण दिसून येतो.

लेखिका ज्या ज्या स्थळांना भेटी देतात तेथील परिसराचे सुक्ष्मरित्या निरीक्षण करतात. टिपणे घेतात, माहिती संकलित करतात. उत्कृष्ठ प्रवासवर्णन होण्यासाठी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता लागते त्या सर्व घटकांचा विचार उषा पाणंदीकर करताना दिसतात. प्रत्येक घटना प्रसंगाना तेवढ्याच ताकदीने मांडण्याचा प्रयत्न करतात. अतिशयोक्ती न होईल याची काळजी घेताना दिसतात.

प्रवासवर्णन करणं म्हणजे आपल्या स्मृतीला पुन्हा जागं करणं अन् आपल्या स्मृतिपटलावर ज्या घटनाप्रसंगाची साठवणूक झाली आहे त्याची पुन्हा एकदा उजळणी करणे होय. हे करत असताना लेखकाला काही गोष्टींचे भान ठेवायला लागते. ते म्हणजे सामाजिक अगर वाङ्.मयीन असो ते गरजेचे असते.

प्रवासवर्णनाला लेखक जेव्हा बसतो तेव्हा त्याला प्रवासात पाहिलेल्या चांगल्या वाईट, चित्रविचित्र घटना प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर तरळू लागतात. लेखक तेव्हा मात्र गोंधळून जातो कारण कोणता घटना प्रसंग घ्यायचा व कोणता टाळावयाचा याविषयी त्याच्या मनात एक वैचारिक धांदल उठत असते. तरीही तो त्याच्या मनबुध्दीला पटेल अशाच घटना प्रसंगाची निवड करतो. पाहिलेला घटनाप्रसंग जसाच्या तसा वर्णन करीत नाही. त्यावर स्वत:चे संस्कार करून तो ते कलात्मकरित्या मांडत असतो. तो सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वैचारिक, राजकीय भान ठेवून आपले अनुभव कथन करीत असतो.

लेखकाला वरील गोष्टीचे जसे भान ठेवायला लागते तसेच त्याला वाङ्.मयीनदृष्ट्याही कलाकृतीकडे भान ठेवावे लागते. आपण ज्या साहित्यकृतीचा अनुभव कथन करण्यासाठी आपण वापर करत आहोत, त्या साहित्यकृतीची संकल्पना, स्वरूप, विशेष हे ध्यानात धरून अनुभवाला आकार द्यावा लागतो. आपण आपल्या प्रवासवर्णनात

निसर्गचित्रण कितपत केले आहे ? कोणत्या पातळीवर जाऊन केले आहे ? ते रसिकवाचकांच्या मनावर अधिराज्य करेल का ? निसर्गचित्रणाची रेलचेल जास्त झाली नाही ना ? असे एक ना अनेक प्रश्नांची उकल व प्रत्यक्ष साहित्यकृतीत मांडणी झाली आहे का ? याची शहानिशा करावी लागते. असेच विचार, निवेदनशैली, भाषाविशेष, व्यक्तिचित्रण, काव्यात्मकता, भावनाविष्कार, अलंकारिक वाक्ये, म्हणी, रचनाविशेष यांच्याबाबतीत करावा लागतो.

वरील सर्व गोष्टींचा एकमेळ झाला तर व उत्कृष्ट अभिव्यक्ती असेल तर लेखकाचे साहित्य वाचकाच्या पसंतीला उतरते. प्रवासवर्णनातील एकाच घटकावर जास्त लक्ष केंद्रित केले तर असे प्रवासवर्णन वाचनीय न होता अतिशयोक्तीचा दोष दिसून येईल व अशा लेखनाकडे वाचक मग ओघानेच पाठ फिरवितो. लेखकाचे खरेपण हे वाचकाला कलाकृती आवडणे हेच आहे.

**आज इथे उद्या तिथे : रचनाविशेष**

सौ. उषा पाणंदीकर या आपल्या प्रवासवर्णन लेखनात इतक्या गढून गेल्याचे दिसते की, प्रत्येक घटकाकडे त्यांनी लक्ष पुरविले आहे. घटना प्रसंग असो अगर एखादे धार्मिक स्थळ असो त्यांनी त्याचे बारकाईने पुराव्यानिशी वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे निवेदन प्रथमपुरुषी असून त्याला वेगवेगळ्या पैलूंचा आधार आहे. त्या कधी हिंदी म्हणींचा वापर करतात तर कधी मराठी, कोकणी म्हणींचा वापर करतात. 'आज इथे उद्या तिथे' या पुस्तकात त्या इंग्रजी, संस्कृत, हिंदी, कोकणी शब्दांचाही बऱ्याच प्रमाणात वापर करताना दिसतात. तरीही मराठी भाषा आपला अस्सल बाणा सोडताना दिसत नाही. तिच्या सौंदर्यात आणखीनच भर पडताना दिसते.

लेखिकेची लेखनाच्या आवेगात प्रतिभाशक्ती जागृत होते व त्याच स्थितीत त्या काव्य करू लागतात. त्यांच्या काव्याने कुठेही बोजडपणा घेतला नाही. उलट त्या काव्याने गेयता आणण्याचा प्रयत्न केला आहे. लेखिका लेखन करीत असताना कधी त्या भावनीक होतात तर कधी त्या टिकात्मक लेखन करून तटस्थतेची भूमिका घेतात तर कधी काव्यात्मक लेखन करून कवयित्रीची भूमिका निभावतात. प्रवासवर्णन लिहित असताना समाजातील वेगवेगळ्या घटकावर प्रकाश टाकतात पण त्याच बरोबर टिकेचे फटकारेही ओढतात.

खरोखरच एखाद्या जाणकार अनुभवी संपृक्त लेखकाकडे जे लेखनविशेष असायला हवेत याचा सर्वसंग परिपक्व असे गुण उषा पाणंदीकर यांच्याकडे आहेत. त्यांच्या लेखनाची भाषा कुठेही कंटाळवाणेपणा आणीत नाही. नवे नवे घटना प्रसंग सांगत त्या जीवनभाष्य करतात तर कधी हिंदी गाण्यांचा वापर करतात तर कधी मध्येच एखादी आख्यायिका, दंतकथा सांगून वाचकाला आणखीनच वाचनात गाढतात. त्या लेखन करताना इतरत्र भरकटून जात नाहीत. त्यांची लेखनी खेळकरवृत्तींची तर आहेच पण जळजळीत व नखरेलही आहे. टीका करताना त्या कोणाचेही स्वत:वर दडपण घेताना दिसत नाहीत. बिनधास्तपणे त्या लेखन पुढे चालू ठेवताना दिसतात.

**'देखणी दक्षिण : रचनाविशेष**

सौ. उषा पाणंदीकरांच्या रचनेला वेगवेगळे पैलू आहेत. सुगरणपक्षी ज्याप्रमाणे एकेक गवताची पाती गोळा करून आपले घरटे बनवत असते. ती सुगरणपक्षी घरटे राहायला कसे तयार होईल याचाच विचार करत नाही तर ते सुंदरही कसे दिसेल याकडेही लक्ष जातीने देण्याचा प्रयत्न करते. त्या घरट्याला ती पुन्हा पुन्हा दुरून न्याहाळत

असते. तिच्या मनातल्या घरट्याप्रमाणे प्रत्यक्षात ती उतरवत असते. त्याप्रमाणे उषा पाणंदीकरांनी आपल्या दोन्ही प्रवासवर्णनामध्ये लेखनाचे जे रचनाविशेष आहेत याकडे सातत्याने लक्ष पुरवले आहे. दोन्हीप्रवासवर्णने अत्यंत वाचनीय अशी झाली आहेत. त्यांची लेखनीही अभ्यासुवृत्तीची आहे. त्याला अभ्यासाची जोड आहे. त्यांच्या लेखनीत काव्यात्मकता आहे. परखडपणा आहे. संदर्भानुसार घटनाप्रसंगाचे वर्णन करण्याकडे कल आहे. खेळकरवृत्तीनेही लेखन करतात. तर कधी त्या इतक्या भावनिक होतात की त्यातून त्या कवयित्रीचीही भूमिका निभावून नेतात. त्यांना प्राचीन इतिहासाची जाण आहे. त्यांची वृत्ती धार्मिक असल्याचे जाणवून येते. कारण जेव्हा त्या एखाद्या ठिकाणाला भेट देतात तेव्हा तेथील स्थळाविषयी एखादी पुराणकथा, दंतकथा सांगतात. त्यांच्यावर आध्यात्माचा पगडा असल्याचे जाणवते. त्या जन्माने गोमंतकीय असल्या तरी उत्तमरित्या मराठीतून लेखन करू शकतात हे त्यांनी पुस्तकरूपाने दाखवून दिले आहे. तसेच त्यांच्या स्थानिक भाषेचीही सरमिसळ करून लेखनाला लालित्य प्राप्त करून देतात. त्यांचे संस्कृत वाचन अफाट असल्याने लिखाणात संस्कृतशब्दही भरपूर प्रमाणात आले आहेत, तसेच इंग्रजी व कोकणी शब्दांच्या बाबतीत म्हणता येईल. त्या मराठी, कोकणी म्हणींचा फारच सुंदर व सफाईदारपणे वापर करताना दिसतात. त्यांनी परकीय भाषेतील शब्द वापरले असले तरी ते कोठेही बोजड वाटत नाही वा लिखानातील लालित्य कमी करत नाहीत उलट कलाकृतीच्या सौंदर्यात भरच घालतात.

**आज इथे उद्या तिथे मधील निसर्गचित्रण :**

**हिमालयाच्या कुशी**

प्रवासवर्णनातील निसर्गचित्रण हेही प्रवासलेखनाला सौंदर्यप्राप्त करून देते.

प्रवासी लेखक जेव्हा प्रवासात वेगवेगळी निसर्गसौंदर्य स्थळे पाहतो तेव्हा लेखकाच्या मनात वेगवेगळे भावतरंग उमटत असतात. त्याला वाट करून देण्याचे काम तो लेखनीच्या रूपाने करत असतो. या संदर्भात स्पिनोझा या पाश्चात्य तत्ववेत्याचे विचार ध्यानात घेऊ. '' मी तुम्हाला स्पष्टपणे बजावतो की, मी निसर्गाला सुंदर म्हणत नाही वा कुरूपही म्हणत नाही, निसर्गात व्यवस्था आहे असेही मी म्हणत नाही की गोंधळ आहे असेही म्हणत नाही. वस्तूंना आपण सुंदर वा कुरूप म्हणतो. व्यवस्थित वा अव्यवस्थित म्हणतो ते आपण आपल्या स्वत:च्या कल्पनेने म्हणतो. उदा. आपणासमोर जे पदार्थ असतात, ते पाहून जी गती आपल्या ज्ञानतंतूत निर्माण होते ती जर आपल्या कृतीस हितावह असेल तर त्या वस्तूंना आपण सुंदर म्हणतो, तसे नसेल तर आपण त्या पदार्थांना कुरूप म्हणतो.' [१] लेखकाच्या दृष्टीक्षेपात ज्या ज्या निसर्गातील घटना घडतात त्याचे बारकाईने वर्णन करतो. येथील पशू, पक्षी, त्यांचे राहणीमान, झाडे वेगवेगळ्या प्रकारची वनराई साऱ्यांना एका कुटुंबाप्रमाणे तो पहात असतो. ह्या संदर्भात मारुती चित्तमपल्लीचे मत विचारात घेऊ. ''निसर्ग तसा सारेच पाहतात पण फारच थोडे तो अनुभवू शकतात.'' [२] उषा पाणंदीकरांनीही हा निसर्ग खऱ्या अर्थाने अनुभवला आहे. त्यात त्या स्वत:चे अस्तित्व हरवून जातात. इतक्या त्या निसर्गाशी एकरूप होऊन वर्णन करतात.

निसर्गाचे वर्णन करताना लेखिका लिहितात ''केदारनाथाला जाताना तीस चाळीस तरी डोंगर ओलांडावे लागतात. हे पर्वत एकमेकांपासून अलग. जणू दोन भाऊ शेजारी......

एक उंच म्हणावा तर दुसरा त्याच्याहूनही सवाई. चढायचे तितके उतरायचे. किमान एका डोंगराच्या माथ्यावर यायचे.... पुन्हा खाली येऊन नदीच्या पात्रापर्यंत जायचे.

नदीवरचा लाकडी पूल ओलांडायचा. दुसरा पर्वत चढू लागायचे. एखादे वेळेस आणि खूपदा एका पर्वतांचे शिखर हा दुसऱ्या पर्वताचा पायथा ठरे. एकेक झुळका छाती पुढे काढून रूद्रस्वरुपात उभा..... कुशीचे डोंगर झेप घेतल्यासारखे अंगावर येत. दुसऱ्या बाजूला खोल दरी..... त्यात एखादा छोटासा गाव...... त्यातली छोटीशी घरे...... आणि डोलणाऱ्या पवनचक्क्या बुडत्याला काडीचा आधार वाटत. पृ. १८.

दरी पाहताना त्यांना कसे भयावह वाटत होते. डोंगर चढताना कसे त्यांना त्रासदायक झाले याचेही त्या निसर्गसौंदर्याबरोबर वर्णन करतात. तर पुढे लिहितात ''कुशीची विक्राळ दरी पाहिली की मी डोळे मिटायची आणि छे ! मनांत भीती धरून इथे यायचेच कशाला ! म्हणून परत डोळे उघडायची. हिमालयाला भित्री माणसे आवडत नाहीत.... मनाला बजावायची – पृ. १८.

आणि डोळे उघडून पहाण्याजोगी, डोळ्यांची तहान निवण्यासाठी किती किती दृष्ये दिसू लागली. प्रथम साधी साधी झाडे येऊन गेली. नंतर चीड फर हिवर अशी उंच उंच आहे. मध्येच सुचिपर्णी आपला दिमाख दाखवून गेला. सोनेरी पिवळे लाल फुलांचे लोलक असलेली झाडे मिरवीत मिरवीत येऊन गेली. पलाश पॉपलर, नील चिनार, पांढरा सफेता, गुलाबी छटेचा ऱ्होडोऱ्हाईन आपणही कमी नाही..... सांगू लागले. लाल शाल्मली लाजून आणखी लाल झाल्या होत्या. साग अभिमानाने सळसळू लागला. अल्प रुपेरी देवदार आणखीन उंच होऊ लागला. पृ. १८.

लेखिका निसर्गाचे वर्णन करताना इतक्या तल्लीन होतात की, त्या निसर्गमय होऊन जातात. ''दहा हजार फुटांवर फेनधवल प्रपात उरी फुटून मंदाकिनीला भेटण्यास

खाली धावत होते. लाल गुलाबांचे घोस फुलले होते. पांढरी शेवंती उगरमेली झाली होती. निळी रानतुळस कृष्णमय झाली होती.

वाटेत कच्चा भुसभुशीत बर्फ कपारीनी रस्त्यावर साचला होता. वरची हिमशिखरे मधेच डोकावत व खालचे हिमपर्वत खेदपुर्वक पहात. धावणारे पाणी बघितले होते. भोवऱ्यात घुसमटणारे पाणी, कोसळणारे पाणी, विहिरीतले बंधनातलं पाणी आणि आता हे थबकणारे पाणी..... विसावलेलं पाणी !....पृ. २१, २२. लेखिका प्रवास करताना त्यांना एक शाळा दिसून येते त्याचेही सुंदर वर्णन केले आहे ते असे ''या मिशनरी लोकांचे मात्र कौतुक, नेटकेपणा, वक्तशीरपणा व शिस्त यावर या लोकांची मदार.....

त्यांनी इथे एक शाळा सुरू केली आहे. ती किती स्वच्छ राखली होती ! हिरव्यागार तृणांकुराचा गालिचा व त्यावर लाल पिवळे कर्दळीचे घोस किती सुंदर दिसत होते. झांजा व टाळ घेऊन गायलेली भजने कितीतरी वेळ कानात आणि मनात गुंजारव करीत राहिली. पृ. ३५.

**मदनाचा बाजार**

दिल्ली ते खजुराओ म्हणजे तीन प्रदेश पायांखाली नव्हे मोटारीखाली घालावे लागतात. प्रथम आग्रा म्हणजे उत्तरप्रदेश, घोलपूर म्हणजे राजस्थानचा थोडा पुढे आलेला भाग आणि बुंदेलखंड म्हणजे मध्यप्रदेश.....

आग बरसावी तसे उन पडले होते. बरोबर नेलेल्या पाण्याचं रूपांतर चहाच्या आधणात झाले होते व आम्हाला सक्त इशारा होता. रस्त्यावरचे विकत पाणी प्यायचे नसते. वेडी तहान जीवन कासावीस करत होती. दिवसाला पंच्याहत्तर बाटल्या आम्ही ड्रींक्सच्या घेतल्या. आणि या धगीत आग्रा मथुरा रस्त्यावर मोरांची प्रणयक्रीडा चालली होती. त्याचा

भव्य पिसारा निळा हिरवा रंग व प्रत्येक पिसांतून चमकणारा त्याचा डोळा.... मोर नाच करत होता. बिचारी लांडोर हा नृत्याचा थयथयाट एक पाय वर करून मुकाट्याने बघत होती. – पृ. ४१, लेखिका 'बिहड' चे वर्णनही अचुक शब्दात वास्तवदर्शी पुढील शब्दात करतात.

''विंध्याचलाच्या कुशीतून बाहेर निघून ही चंबळा उत्तर प्रदेशाच्या इटावा जिल्ह्यात जाऊन यमुनेला मिळते. या नदीने हा प्रदेश टेकड्यांचा भकास मुरमाड करून ठेवला आहे. एरवी नदी ही भाग्यविधाती असते. पण मडं दिसले की खणायचे हा या चंबळेचा धर्म झाला आहे. ही आपली काठाकाठांची भुसभुशीत माती खोदीत जाते. आणि भेटीला पाऊस तिला मदत करतो. जरा पाऊस पडला की जमीन धुपते खचते. माती चंबळेच्या दिशेने वहात जाते. मातीचा ढेकळा ती पोटात घेते व एक विवर तयार करते. परत या विवराला फाटे फुटतात व परत भुयारे बनतात व हा कमळाच्या जाळ्यासारखा गुंता सतत चालू रहातो. हे दृष्टचक्र मग जमिनीला डोके वर काढू देत नाही शेतीचे रूपांतर माळरानात..... रान नाही, अरण्य नाही. नुसती रेताड जागा.... ते हे 'बिहड' दरोडेखोरांच्या पोलिसांना चुकवण्याच्या जागा..... पृ. ४२

''यासारखाच आणखी ताप सुरू होता. तपमान ५०° होते. भक्ष्य गिळून पडलेल्या अजगराप्रमाणे हवा सुस्त होती. उकड हंडी उंचावत होती. अंगाची तलखी वाढत होती. आणि आम्ही झाशीच्या जवळ पोहोचलो तो 'आंधी' दिसून यायला लागली. धुळीचे लोट वाहू लागले. वाराच वादळ झाला व तो पिऊन झाडं तारवटल्यासारखी पिंगा खेळू लागली. झाशीच्या जवळ पोहोचतो तसे मोत्यासारखे थेंब पडू लागले. 'मिट्टीका' सुगंध आसमंतात दरवळला व मग टपटपणाऱ्या थेंबाचे सरसर धारांत रूपांतर झाले...... आणि प्रलयंकारी पाऊस केव्हा पडू लागला कळलंच नाही. विजेचे खांब मोडू पडू लागले. झाडे

उखडून पडू लागली. जमिनीशी नाते त्यांनी केव्हाच तोडून टाकले. पण रात्रीच्या वसतीला वृक्षांवर आलेल्या पांखरांचे आक्रंदन चालू होते. त्यांची नाळ तुटता तुटत नव्हती. पृ. ४६.

उषा पाणंदीकरांनी जो निसर्ग अनुभवला तो आपल्या शब्दातून हुबेहूब मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

'पाऊस पडला तरी असह्य उकाडा होता. हवा भक्ष्य गिळून पडलेल्या अजगरासारखी सुस्त झाली होती. तापलेल्या तव्यावर थेंब पडावेत तशी आग होत होती. काहीच नकोसे वाटत होते. बाजारचा रस्ता व चौक ओलांडून आम्ही मियाँ तानसेनच्या समाधीकडे आलो आणि त्याला म्हटले बाबा रे तुझा तो मेघमल्हार राग गाऊन थोडा पाऊस पाड बाबा........ पण तानसेन आता पार पलिकडे पोचला होता. तो सिध्दी राबवायला तयार नव्हता. तो भैरव गाऊन पहाट फुलवणार नव्हता. मल्हार मोर नाचवणार नव्हता. वसंत गाऊन फुलं फुलवण्यास तयार नव्हता. ही निसर्गाची किमया...... हे नैसर्गिकच व्हायला हवं..... असं त्याचं म्हणणं होतं. पृ. ४९. निसर्गातील फुलं त्यांचा गंध, रंग त्या अलगद आपल्या शब्दाच्या कुंचल्याने टिपतात. त्या पुढीलप्रमाणे ''कसला तरी मादक गंध भरला होता. झाडांचा हिरवा रंग एकमेकात मिसळला होता. उतरती उन्हे केतकीच्या बनात येऊ का, येऊ का विचारीत होती. झाडां-झुडपात ती छपाछपी खेळू लागली तशी झाडावरच्या गुलाबी 'बेनुल्ल' बांडगुळ लाजून आणिक गुलाबी झाले व तिच्या शिरशिरीबरोबरच गंभीर वाटणारे वातावरण गंभीर बनले..... प्रकाशाची कवाडं मिटू लागली. सांजवेळ येऊ लागली. पृ. ५२.

**भूतलावरचा स्वर्ग :**

हरयाणा सुखी आणि संपन्न दिसत होता. ठिकठिकाणी अलिशान रेस्टॉरंटस्

आणि त्याच्यावरच्या गार वेली डुलत–डुलत स्वागत करीत होत्या. सगळ्या वाटेवर हिरवागार रंग डोळ्यांना थंडाई देत होता. वरचे गर्द निळे आकाश मनावर मोरपिस फिरवीत होते. मन उप्पाट भरून निघालं होतं. पृ. ६४.

कुशीला दुतर्फा सुरु वृक्षांची रांग....... मधे मधे चवीला बोगन वेलीयास..... समजा आणखी रस्ता रूंद करावा तर निलगिरी नव्या वृक्षांची खडी तालिम...... मधेच कांचन शिरीष वृक्षाचे फुलांचे घोस आपली जातकुळी सांगून जात. काही वृक्षांवर ' सर्वस्वी तुझीच' म्हणून गोल गोल वळसे घालून अष्टांगाने आलिंगणाऱ्या मधुमालती कशा बहरून आल्या होत्या व तेही वृक्ष एखाद्या मिलनोत्सुक पुरुषाप्रमाणे त्यांना कवटाळून बसले होते. सगळे फुलमय, हरिविजयातल्या राधेचे वर्णन इथूनच केले असावे. 'पृ. ६४.

पर्यावरण..... पर्यावरण नुसता उध्दारच नव्हता तर ते अंगिकारलं गेलं होतं. जगलेली झाडे जोपासणं तर चाललंच होतं....... पण मेलेल्या झाडांच्या जागी नवी शेपटी लावली होती. पृ. ६४.

निसर्गाने सगळ्याच वृक्षांना सौंदर्य दिले आहे. कुणा रंग, कुणा ढंग, डौल, उंची, कुणा फुलांनी शृंगारले आहे...... कुणा पानांनी मढवले आहे. कुणा फळाची श्रीमंती दिली आहे. हे उणे म्हणूनच की काय थोड्याभोवती आख्यायिकांचे पटल आहे.

वड, पिंपळ, उंबर यांच्याभोवती गूढतेचे वलय असते. देवदार ही वैभवाची खूण....... चंदन म्हणजे संस्कृत वाङ्.मयातील विरह..... त्याशिवाय चंदन हा सर्पवेष्टित असतो म्हणतात. कदंबा म्हणजे कामदेव मदन. बकुल वृक्षावर सुंदर स्त्रीने चूळ टाकली तर तो पिसा सर्वांगाने फुलतो म्हणतात. कवी 'बी' ना चाफा भेटला होता. तो बोलत नव्हता, चालत नव्हता. तो खंत करीत होता. पण चाफा हा इतका रसिक की त्याला बिचाऱ्याला स्त्रीचे

स्मितहास्यसुध्दा पुरेसे होते. अशोक वृक्ष हा विकृत वासनेचा असावा. बहरून यायला तो स्त्रीच्या लत्ताप्रहराची आस धरतो. कन्हेर हा साधासुधा पण स्त्रीच्या नृत्याने फुलावा. आंबा म्हणजे मांगल्य पण हासुध्दा स्त्रीच्या सहवासाने चळतो. सुंदर स्त्रीने फुंकर घातली तर याचा मोहर ? मोहर शिरशिरून उटतो. तशीच या चिनाराबाबतीत ही आख्यायिका आहे. चिनार हा दिवसरात्र प्राणवायु सोडतो आणि त्याच्या सान्निध्यात जर कुठल्याही आजारी व्यक्तीला ठेवली तर ती खणखणीत होणारच ! या बेबंद धुंद कलावंतासारख्या वृक्षराजावर जी आशिका माशुका झाली तर नवल नाही. पण हायरे देवा ! हा प्रियकर भलताच दगलबाज असता तरी त्याला माफ झाले असते. 'सैय्या झुटोंका–बडा सरताज निकलो' किंवा एकादी 'ओ बलमा तूने धोका दिया ।' यावरच ही प्रेमकहानी संपली असती पण या चिनाराला सुंदर स्त्री असे संबोधतात असे जेव्हा इथे ऐकले...... तेव्हा कुणी तरी पाण्याचा नव्हे पण चहाचा कप मला बसवून दिला. पृ. ७५

झाडांचे वर्णन असो अगर फुलांचे वर्णन असो लेखिका एका वेगळ्याच उंचीवर जाऊन पोहोचतात. त्यानी स्वत:ची लेखनशैलीच निर्मिली आहे.

'नंगा परबत, असर्फत, शेषनाग, अमरनाथ या हिमशिखराशी ओळखी करून दिल्या. चिनाब, राठी, जेहलम या हिमदुहितांची कुळे सांगितली. दाल व नगीन ही सरोवरे तर अंगणातच..... वुलर मानसबल ही पुढ्यांत नेऊन दाखवली. देवदार यर चिड, फर, पायन, तुती, चिनार या सोयऱ्यांशी गाठी घालून दिल्या...... हिवाळा येत असल्याने पंपसीर, कतीज, स्तुल, कोकील, चकोर, बुलबुल हे आपली बिऱ्हाडे उचलून उबदार प्रदेशात जाणारे पक्षी दाखवले. ओले अक्रोड, आलुबुखार, लालबुंद चेरी, गोश प्लमस, खब्बुगोश, डाळींब आग्रहाने खाऊ घातले. पृ. ७९, प्रत्येक वेळी त्यांनी निसर्गाचे जसे

दिसले तसे वर्णन केले आहे. तेही कलात्मकरित्या वर्णन केले आहे. प्रत्येकवेळी नाविण्यपुर्ण असे निसर्गचित्रण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. बहरलेले खिलनमर्ग, फुलांचे मैदान गुलमर्ग झाले. इवली इवली अनामिक फुले घेऊन डोलणाऱ्या गालिच्याचे सोनमर्ग झाले आणि अचानक एक दिवस पाऊस पडला. गारठा वाढला. पेहेलगामला गेलो तेव्हा डोंगर बर्फाच्छादित झाले होते. कोवळ्या उन्हाचा तवंग त्यावर अलौकिकतेचा स्पर्श करीत होता. उगवतीची किरणे चमचम करीत त्यावर सप्त रंग उधळीत होती. मधे–मधे त्यावर दुधाच्या कावडी फुटत होत्या...... दगडधोंड्यातून आलेले 'लिदर' नदीचे बर्फमय पाणी अधिकच अनाघरात झाले होते. गारव्यामुळे कुणीच जवळीक न साधल्यामुळे....... गायीगुरांनीसुध्दा टाळल्यामुळे हिरमुसले होऊन शेजारच्या हिरवळीकडे जवळीक साधू पहात होते. आणि नदी पलिकडचे एक जरठ शिवमंदिर आंबट शौक करीत तिची कळी खुलवित होते. – पृ. ८६ वरील वर्णन वाचल्यानंतर असा अनुभव येतो की, नुकतेच जन्मलेले अभ्रक आपले इवले इवले हातपाय हालवत आहे व आपल्या नाजूक डोळ्यांनी सगळ्यांना मंत्रमुग्ध करीत आहे. एवढे नाजूक व कोमल वर्णन लेखिका वरील पध्दतीने करतात.

'जेव्हा हिवाळा जवळ येऊ लागतो तेव्हा बर्फाचा एक हलकासा फवारा झाला की केशराला धुमारे फुटू लागतात. काळ्या गोबरी शेतात गवताच्या पात्यासारखी पोपटी पाने व निळी बैंगणी रंगाची इवली इवली फुले डुलत होती व सोन पिवळे उन्ह कौतुकाने त्यांची 'पापी' घेत होते.' – पृ. ८७.

'अंवतीपूरचा हिंदू राजा हे फूल पुर्वी मंदिरात अलगद खोवीत असे..... व राणी ही फुले नाजूक हाताने वेणीत घालीत असे.

या फुलांच्या पाकळ्या इतक्या नाजूक आरसपानी असतात की चंद्रांची किरणे पलिकडे आरपार जाऊ शकतात. जणू मस्तानीचा कंठ. चांदण्या रात्री चमकणाऱ्या केशराची फुलाची शोभा स्वर्गीय असते'' पृ. ८७.

केशराच्या फुलांचे वर्णनसुध्दा खूपच मोहक आणि वास्तवपूर्ण केले आहे. त्यांच्या निसर्गचित्रण रेखाटनाला एक अवीट अशी गोडी आहे. वाचक जेव्हा निसर्गचित्रण वाचतो तेव्हा तो त्याच्या प्रेमातच पडतो. ज्या प्रदेशाचे वर्णन वाचत असतो, तो फक्त वाचन नाही तर त्या परिसरातून फेरफटकाच आपणसुध्दा मारत आहोत हे त्याच्या एकाग्रतेतून जाणवते.

'हिमालय म्हटला की वाट वळणावळणाची आलीच. कुशीला डोंगराचे कडे, देवदार, चीड, फर, जीन फर ही झाडे...... डोंगरावर खोदून केलेली खाचरे मधेच थोडी शेती..... मधेच लटकल्यासारखे एक-एक थर.... पण रस्ता अगदी प्रशस्त भला.' पृ. ११३.

'भुवनेश्वर ते कोणार्क हा रस्ता गोमंतकातल्यासारखाच..... ठिकठिकाणी माडाच्या बागा..... हिरवी खाचरे, मधे मधे आरशाप्रमाणे चकाकणारी तळी..... त्यातली माणकाच्या रंगाची कमळे वाऱ्याच्या झुळकानी थरारत होती. सकाळची कोवळी थंडी....... पण आनंदाची उब घेऊन आम्ही पुढे जात होतो – पृ. १२६. अशाच पध्दतीचे निसर्गवर्णन पुढे करतात. 'प्रभातसूर्य' हा उषेसारखाच स्नेहल आहे. तरतरीत उत्साही शीतल आहे. त्याच्या नसानसातून रग तारूण्य सळसळते आहे. त्याच्या दंडात केयुर आहे. तलम पीतांबर तो नेसला आहे. फुलांच्या हाराबरोबर गळ्यांत जानवेही आहे. नितळ डोळे स्वच्छ हास्य त्याचे अंतरंग उघडे करतो.

मध्यानसूर्य हा दुपारच्या तापासारखाच कठोर कोरडा रखरखीत भगभगीत भासतो, कुरळ्या केसाचा हा तेजस्वी प्रमत्त पुरूषसिंहाची प्रतिमा वाटते.

उस्तंचल सुर्य हा थकला आहे....... त्याच्या नजरेत आता जाणतेपण आले आहे. गोकर्णीच्या फुलासारखी बिझली नजर..... कमरेवरची गळलेली मोत्यांची माळ........ पायांतल्या घसरणाऱ्या पादुका...... तो आता आपला थकवा नाहीसा करण्याकरिता रजनीच्या महालात जाणार आहे. सूर्याहूनही त्याचा घोडा जास्त थकला आहे. त्याचे तोंड फेसाळले आहे. आणखी प्रवास झाला तर तो फुटून जाईल.

सूर्य म्हणजे ब्रम्हा, विष्णू, महेश...... प्रात:काळचा ब्रम्हा.... दुपारचा विष्णु....... रात्रीचा शिव..... जनन, जीवन व मरण यांचे रूप....... पण तोच इथे मोडून पडला आहे.

**'देखणी दक्षिण' : निसर्गचित्रण**

निसर्गचित्रण असल्याशिवाय प्रवासवर्णनाचा सुगंध दरवळत नाही. पण याची कमतरता लेखिकेने जाणवू दिलेली नाही. त्यांनी ज्या निसर्गरम्य स्थळांना भेटी दिल्या तेथील पशू, पक्षी, वृक्ष यांचे कलात्मक व उपमा, प्रतिमांचा वापर करून वर्णन करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ''सौंदर्यशोधक मन चिंतनाचा स्वभाव असल्यावर प्रवास व निसर्गशोभा यांना काही वेगळीच परिमाणे लाभतात. धार्मिक वा पुण्यसंचयाची दृष्टी कमी असेल तर समोरच्या क्षेत्राचे, स्थानाचे, निसर्गाचे महत्त्व अनेकदृष्टींनी वेगळे वाटेल.''[३] 'देखणी दक्षिण' मधील निसर्गचित्रणही वरील मुद्यांना धरूनच झाले असल्याचे जाणवत राहते. निसर्गचित्रण करताना त्या लेखनाशी व तेथील ठिकाणाशी त्या फारच एकरूप होतात. त्या म्हणतात, 'पांढऱ्या पिवळ्या तगरीच्या फुलांसारखे फेसाचे तुरे सागर धरतीला आणून

देत होता. तिला खुश करू पाहत होता. हे पाहून लालभडक चोचीचे पांढरे पक्षीही खूश झाले होते. तिरकी झेप मारून सूर मारू पाहत होते. किनाऱ्यावरती सुरूची झाडे समोरच्या डोंगराला अचकट–विचकट नाचून दाखवीत होती, समोरच्या कुळागरातील पोफळीची झाडे नाक मुरडून अनुरागाने माडाला म्हणाली, 'नस्ते म्हाका सोसना....... मोगाक भायली सवंगा कित्याक !' पृ. १० पण माणूसच विचार करतो किंवा त्यांनाच भावभावना आहेत असं नाही तर झाडे पशू पक्षी हेही गुजगोष्टी करतात. त्यांच्याही मनात भावनांचा कल्लोळ असतो हेच वरील निसर्गचित्रणातून त्या व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात तर त्यांना अधिकच बोलके करण्याचा प्रयत्न करतात. लेखिका संध्याकाळी जेव्हा समुद्र पाहायला जातात तेव्हा केलेले वर्णन असे 'समुद्र गंभीर वाटत होता. वाऱ्याच्या थपटांनी लाटा उसळत होत्या. शिडांच्या होड्या, मचवे डुलत होते. हिंदकळत होते. किनाऱ्यावर कुणीच नव्हते. थंडीतला निमुळता दिवस..... काळोख पाझरू लागला होता. तळव्यांना गुदगुल्या करणारी पांढरी–पिवळी वाळू परकी वाटू लागली होती. पश्चिमेकडून पुर्वेकडे जाणारी बगळ्यांची माळ मात्र 'निल गगन के चले, धरती के प्यार तले, ऐसे ही जग में.....' आकाशात पोहत चालली होती. लेखिका निसर्गवर्णन करत असताना स्वत:चे अस्तित्व विसरून त्या मनातील भावनांना कुठेही आडपडदा न ठेवता वाट करून देतात. निसर्गचित्रण करताना त्यांनी असाच हिंदी गाण्यांचाही वापर केलेला आढळतो. पृ. १२ गिरसप्पा धबधब्याचेही उत्तम वर्णन करतात. 'एखादे गुपित जपल्यासारखे ते मागे ठेवूनच आम्ही पुढे आलो. कदाचित ते धबधब्याच्या चिंब धारेत स्नानाचे सुख घेत असेल. गिरसप्पाच्या बागेतल्या लाल शेंदरी गुलाबाच्या कळीभोवती गुंजारत असेल. जांभळ्या बोगनवेलीच्या जाळीत दडून बसले असेल. हिरव्या निसर्गाची गहराई अनुभवत असेल. तळ्यात फुललेल्या कमळ मिठीत अडकून पडलेही

असेल. आपले काहीतरी हरवले असल्याचा भास झाला. पृ.१२. खरोखरच निसर्गाच्या सानिध्याचा त्यांना एवढा लळा लागलेला आहे की जेव्हा त्या पुढील प्रवासास निघतात तेव्हा आपले काहीतरी हरवल्याचे त्या मान्य करतात. 'निळेभोर आकाश साद घालू लागले. 'दुरून डोंगर साजरे' पण हा निलगिरी दुरूनच साजरा दिसतो असे नाही. निळ्या–निळ्या फुलांनी सजून, निलगिरीच्या झाडांनी नटून हा आपले निलगिरी नाव सार्थ करीत होता.

सगळीकडे निळा शाम भरून राहिला होता. चहाची निळी, हिरवीर रोपटी आसमंतात निळाई पसरवीत होती. पृ. ३७ अशाच पातळीवरचे आणखीही त्या लेखन करतात. 'केरळ म्हणजे तांबडीलाल माती, हिरवी वनराई, शेजारी निळा समुद्र असलेली ३८ हजार चौरस मैलांची भूमी. पश्चिमेस निळ्या समुद्राने कवटाळलेली, पुर्वेस हिरव्या, मोरपिसी पर्वतरांगांनी अलिंगन दिलेली. उत्तरेस असलेल्या पर्वतराजीस 'अनैमल' म्हणतात, तर दक्षिणेस वेलची पिकवणारा वेलची पर्वत आहे.पृ. ४० जेवढे म्हणून निसर्गाचे वेगळेपण, त्याचे सौंदर्य लेखिकेने आपल्या शब्दांनी प्रवासवर्णनात उतरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि वाऱ्याच्या झुळकीने शीळ घालणाऱ्या नारळीच्या झावळ्या, 'कायरात' डुंबणारी मुले...... शेजारी आळसून पडलेली घरं. 'कुरूवेप्पु' कडुनिंबावर चिवचिवणाऱ्या 'करूवा' चिमण्या आणि बुचाच्या झाडावरचे 'तता' पोपट.... हा सारा निसर्ग, सृष्टीचे हे रूप पाहून आनंदाने भोवळ यायला लागली. कुर्गच्या मढिकेरी गावातली, कॉफीच्या बागांतली ती भांगोळीसारखी वाट आणि तो सुगंध किती तरी वेळ मनात राहिला.' पृ. ४५ निसर्गाचे हे सृष्टीरूप पाहून लेखिका भोवळ येऊन पडायला लागतात. एवढे ते सुंदर अप्रतिम निसर्ग ठिकाण स्वत: त्या अनुभवतात व वाचकाला त्याचा प्रत्यय आणून देण्याचा प्रयत्न करतात. 'फुलेचि घर, फुलेचि दार......' केरळ असे नटून जाते. मोकळ्या माळावर रंगीबेरंगी तेरडा,

हळदुवी हरिणीची फुले फुललेली असतात. गुलाबी 'कुड्डुक' उगरमेली झाली असते. नागचाफा फणा काढून डोलत असतो. केतकी उगवलेली असते. 'फुलों से ...... कलियों से तेरी माँग भर दूँगा......' असे इथला प्रत्येक तरूण आपल्या सखीला म्हणत असेल. हा फुलांचाच उत्सव आहे. इकेबाना किंवा चेरी उत्सवाची महती जपानने फार गाऊ नये. केरळमध्ये हा असा उत्सव फार पुर्वीपासूनच आहे. पृ. ५६ लेखिका निसर्गाचे वर्णन तर करतातच पण काही ठिकाणी निसर्गाचा उत्सव केला जातो हेही सांगतात. तसेच बाहेरील राष्ट्रात निसर्गातल्या वस्तूंचा उत्सव केले जातात हे त्या ठासून सांगतात.

आम्ही चालत होतो. खडकाळ वाट ठेचकाळीत होती. काटे–करवंदीसारखी खुरटी वनस्पती अडवीत होती. पोपटी करड पिंगट झाले होते. रानफुलांचा सडा पडला होता. जांभळी, गुलाबी, लाल घाणेरीची झाडे तिखट 'हिरवट, उग्र गंध सोडीत होती. एक वडाचे झाड पाखरांचा संसार घेऊन बसले होते. त्यांच्या किलबिलीत स्वतःचे सुख शोधत होते.' पृ. ८१ वरील निसर्गाचे चित्रण अप्रतिम तर झाले आहेच. रंगांची वेगवेगळी उधळण फुलांकडून होते त्याचेही रंग त्या टिपतात व वातावरणात पसरलेला विविध फुलांचा सुगंध पुस्तकातूनही दरवळताना जाणवतो.

'भयंकर उकडत होते. सृष्टी बदलली होती, वैराण झाली होती. हवा कंटाळवाणी, आळशी, निरूत्साही होती. ताडाची, शिंदीची झाडे, माडांचे उंच बांधे स्तब्ध झाले होते.' पृ. ९७. निसर्ग हवाहवासा वाटतो पण वातावरण बदलले की निसर्गातही बदल होतो. त्यामुळे त्याच्यातील झालेला बदल नकोसा वाटतो. त्याचा सहवास नकोसा होऊन जातो. हेच वरील वर्णनावरून जाणवते.

'सगळीकडेच फुलेच फुले....... पिवळीधमक शेवंती, शुभ्र शेवंती, निळी

जांभळी शेवंती, पिवळी, लालभडक,शेंदरी जास्वंद पांढरा, तांबूस, गुलाबी छटेचा सोनचाफा, पिवळा चाफा ! गवतासारख्या पानांत मृद्‌गंधाकरिता अडून बसणारा भुईचाफा, कठीण दिसणारा कवठी चाफा, रंगीबेरंगी डेलिया, पांढरा निशिगंध, मोत्यासारखा मोतिया ! निळी कृष्णकमळे व पिवळी सुर्यकमळ यांची समाधीवर आरास होती' पृ. १२१ वेगवेगळी फुले व त्यांचा रंग त्या बारकाईने टिपून प्रत्येक फुलांचा वेगळी रंगसंगती त्याच्यातील डोलण्याचा भाव लेखिका उत्तमरित्या टिपतात. 'सिल्व्हर ओक,फर, पाईनची प्रचंड झाडे सुर्यकिरणाला आत जायला मज्जाव करीत होती. उंच उंच युकॅलिप्टस्, कझुरिनाची झाडे उन्हाचा कवडसा बाहेर पडू देत नव्हती, रस्ता तर टिकल्यांचा खेळ खेळत होता आणि मध्येच एखाद्या घरापुढची, दिवाळीतल्या दीपमाळेतल्या लटकवणाऱ्या लोलकासारखी शेंदुरी लाल संत्री शेजारच्या झेंडूच्या फुलांना 'कोण सुंदर' म्हणत खिजवत सुटली होती. दोन्हीही सुंदर...... देवाने तुम्हाला निर्माण केले, तो दोन्ही हातांनी देतो, डावे-उजवे करीत नाही, अशी आम्ही मध्यस्थाची भूमिका घेतली; पण त्याआधीच शेजारच्या रथवृत्ताने फरच्या झाडाने त्यांना गळी पडून समजावले' पृ. १३५. निसर्गचित्रण करताना नवनवीन झाडांचीही माहिती देतात. तसेच ह्या चित्रणाबरोबर उपमा आणि प्रतिमांचाही त्या वापर तेवढ्याच चलाखीने करताना दिसतात. हे वरील वर्णनावरून कळते. 'शेजारीच निलगिरीची झाडे निळे निळे तुरे फुलातुन अत्तराचे फवारे सोडीत होती. सोनकीची पिवळी फुले आणि लाल लाल झेंडू एकमेकांत मिसळून होते आणि मधमाशांचा थवा गुंजारणे विसरून गेला होता. एक खार मात्र हातातले फळ खातानासुध्दा टवकारून बघत होती.' पृ. १३६. लेखिका शब्दातून चित्र साकार करतात जसाच्या तसा प्रसंग वाचकाच्या नजरेसमोर उभा करण्यात यशस्वी झाल्या आहेत. निसर्गामध्ये फुले सौंदर्यात भर टाकण्याचा प्रयत्न तर करतातच पण त्या वातावरणात सुगंधही ओतत असतात व त्या सुगंधाने मनुष्य पशु-पक्षी

मंत्रमुग्ध होत असतात. स्वत:चे अस्तित्वच जणू ते विसरून जातात. एवढे ते सौंदर्याचा उपभोग घेताना तल्लीन होऊन जातात.

'हळूहळू सुर्याचा लाल गोळा राणीवशात येऊ लागला. स्वप्नील धुके तर पृथ्वीला सोडायलाच तयार नव्हते. एक लोककथा कानांत येऊन गुणगुनू लागली. पृथ्वीचे खरे प्रेम आकाशावर....... पण तिचे लग्न झाले. पृथ्वीचे सकाळ–संध्याकाळ सुर्याकडे होणारे मिलन पाहून आकाश रागाने लाल होते, चिडते, तळमळते आणि रडून घेते. प्रियकराच्या दहिवराने भिजून पृथ्वी चिंब होते.' पृ. १८९

येथेही लेखिका उपमा प्रतिमांचा मुक्तपणे वापर करतात पण हे करत असताना त्या योग्य अशा उपमा देतात कुठेही भडकपणा येईल असे करत नाहीत. उलट अशा वर्णनात काव्यमयताच भरून राहिली आहे.

**आज इथे उद्या तिथे : व्यक्तिचित्रण**

व्यक्तिचित्रण हा ललित साहित्यातील महत्त्वाचा घटक असून व्यक्तिचित्रण हे बाह्यवर्णनाबरोबरच व्यक्तीच्या अंतरंगाचेही वर्णन यात येते. पण येथे खऱ्या अर्थाने कस लागतो तो लेखकाच्या कलात्मक कौशल्याचा लेखक व्यक्तिचित्रण करत असताना तो कशापध्दतीने त्यांना रेखाटत असतो हेही महत्त्वाचे असते. लेखक हा व्यक्तीच्या वेगवेगळया भावछटेसह तो त्यांना साकारत असतो. त्यासंदर्भात ना. सी. फडके यांचे मत विचारात घेऊ. ''कथा रचनेपेक्षा व्यक्तिदर्शनचातुर्य दसपटीने अधिक महत्त्वाचे आहे.''[४] असे नमूद करतात. आज इथे उद्या तिथे या सौ. उषा पाणंदीकर यांच्या प्रवासवर्णनातील व्यक्तिचित्रणाचा विचार खाली केला आहे.

**हिमालयाच्या कुशीत**

''केवड्याच्या पातीसारखी गोरी–गोरी, चापेकळी नाक नी रूंद जिवणी

राखाकृती चेहऱ्याची एक बाई ओलेत्याने गंगेत नहात होती. सगळे अंग उघडे असूनसुध्दा स्वैरतेचा मादकतेचा एक अंशसुध्दा या शालीन बाईत दिसत नव्हता. तिचे हसणे म्हणजे देवघरातील किणकिणणारी घंटा आणि डोळ्यात संथपणे तेवणारे निरांजन होते. अळीता लावलेले तिचे पाय पाण्यात साळकासारखे वाटत होते.'' पृ. ११.

गंगा नदी विषयी त्या लेखन करतात त्या लिहितात, ''या गंगेचे दुसरे एक वैशिष्ट्य असे की तिला मोठमोठ्या नद्या येऊन मिळतात. जान्हवी, सरस्वती, भागिरथी, अलकनंदा, मंदाकिनी पुढे उत्तरेकडून यमुना रामगंगा, घागरा, गंडकी, बुढी गंडकी, बागमती, कोशी..... किती किती..... वास्तविक यमुना नदी ही गंगेपेक्षा मोठी..... पाण्याने श्रीमंत, पण या साऱ्यांचा या गंगेवर काडीमात्र परिणाम होत नाही. तिला न्युनगंड नाही, अहंगंड नाही, काही नाही...... काही नाही. सगळ्यांना सामावून गंगाच राहते. आपल्या नादात धावत जाते. पुढे पुढे..... सागराकडे....... अनंताकडे..... पृ. १३.

''कोणी दुर्बळ स्वत:करता स्वत:च्या पोटाकरता मागतो तर कोण सामुदायिक आवाहन करतो. Beggars have no choice हे खरं..... पण इथं हे गोसावी एकसारखे आक्रोश करीत होते. शिवजीका दर्शन लो ! ओ आपका भला करेगा. हरीद्वारला तर एक पंड्या आमच्या मागे होता. गंगेची पूजा करण्याबद्दल तो एकसारखा विनवीत होता. 'बाबुजी गंगा अपनी राह दिखती है'। आणि इथं भिक्षेने सात्विक वळण घेतलेले होते. चार पाच पोरे आम्हाला सांगत होती; आम्हाला भिक्षा नको आम्हाला शिकण्याकरता पुस्तकांना पैसे हवेत. एकूण त्यांना पैसे नको होते ना ! त्यांच्या पुस्तकांची नावे आम्ही लिहून घेतली. त्यांचे पत्ते लिहून घेतले.'' पृ. १५.

''एका लहानशा झाडाखाली एक बाई व तिच्याजवळ एक लहान बाळ खेळत

होते. दुडू दुडू धावत आईला ते नाकीनव आणित होते. आमच्या मोटारीच्या रस्त्यावर ते धावत आले. बसचे ब्रेक कचदिशी लावले गेले. मुलाला वेंगेत घेऊन आईच्या डोळ्यात आलेले ते अश्रु....... आणि भांबावल्यामुळे...... मोठ्याने रडणाऱ्या त्या मुलाच्या डोळ्यातील ती आसवे..... मला आठवली एक कविता....

''चंवर गळता..... भियेव नाका

उरतले ते धरतले

सगळी जीण भरतले.....' पृ. १७,१८

एखाद्या भावूक प्रसंगाचे वर्णनही लेखिका तितक्याच भावस्पर्शी तन्मयतेने वर्णन करतात. हृदयाला वाचकाच्या एक प्रकारे पीळ पाडतात हे वरील व्यक्तिचित्रणावरून दिसून येते.

''भारताच्या कानाकोपऱ्यातून प्रवासी आलेले असतात. आमच्याबरोबर तरी होते. कुडता सलवार घातलेले पंजाबी, डोक्यावर केस बांधलेले शीख, धोतराचा सोगा घातलेले बंगाली, उजव्या सोग्याचा गुजराती आणि भला मोठा किल्ल्यांचा जुडगा कमरेला आणि डावा हात पुढे करून बोलणारी त्याची घरधनीण, घुंघट पांघरलेली मारवाडीण..... मुंबईकर मंडळी, मॉरिशसहून सुध्दा दोन जोडपी आली होती. 'तू सोला बरस की, मै सतरा बरस का' असे एक गाणे आहे. केव्हाही अभिप्रेत असे असते. आपली धारणाच अशी असते की नवरा हा बायकोपेक्षा मोठा असतो. त्याने तसे असावे पण ....' पृ. २०

लेखिका प्रवासात ज्या ज्या ठिकाणी फिरल्या त्या त्या ठिकाणी त्यांना विचित्र अशा व्यक्ती भेटल्या. स्वभावाने पेहरावाने प्रत्येकात त्याचा म्हणून काहीतरी एक गुण असे त्याचेच त्या वर्णन करताना दिसून येतात. या पोरग्याला हसू येण्याचे आणखी एक

कारण होते. 'कितना हँसा है मोसम'...... सगळे जग त्याला सुंदर भासत होते. 'कितनी हँसी खबर' त्याच्या जवळ होती. त्याचे लग्न ठरले होते. मस्तकावर कुरळे केस व कपाळावर भोवरा अशी सुलक्षणी वधू नेमस्त केली होती. आपण जसे कुलदेवतेला आमंत्रण करतो तसे देवा आधी हिमालयाला बोलावणे होणे. गंगामाईही येणार होती. पृ. २७.

तप्तकुंडाबाबत लेखिका लिहितात, ''केवढी सुंदर नैसर्गिक जागा ही ! .... इथे आधणाचे सळसळणारे पाणी...... तर हाताच्या अंतरावर मंदाकिनीचे बर्फाळलेले पाणी..... इथेच उमेला हातात मंदाकिनीचा आरसा देऊन सख्यानी तिला सुगंधी उटणी लावली असतील. केसांना चंदनाचा धूर देऊन तिचे केस वाळवले असतील. डोळ्यात काजळ रेखले असेल. ओठांना लाली चढवण्याकरता विडा खायला दिला असेल. व ही साजरी गोजिरी वधु बघण्याकरता हिमालयाला – बापाला बोलावले असेल. पृ. २८

पार्वतीच्या शृंगाराचे अप्रतिम असे वर्णन लेखिका करतात तिच्या साजशृंगाराचे तिच्या नटण्या थटण्याचे वर्णन आपल्या डोळ्यांसमोर घडत असल्याचा प्रत्यय येतो. एवढे ते वर्णन जिवंत व बोलके झाले आहे.

''वाटेत एक गढवाली महिला भेटली होती. ती त्याचे सामान उतरायला तयार झाली पण हा काही तिला लागट बोलला असावा. नाकात भली मोठी रिंग घातलेली ही स्त्री व तिचा नवरा त्याला मारायला धावले. बाकीच्यांनी आपल्या मदतीला यावे अशी त्याची अपेक्षा असावी पण ड्रायव्हरसकट कोणीच त्याच्या बाजूने आले नाहीत. इकडे ती गढवाली स्त्री पुरूष तुच्छतेने त्याच्याकडे पहात होती. हा त्यांच्यापुढे 'हत्तीपुढे उंदीर' असावा असा भासत होता. सभोवती पहात पहात हात चोळीत तो म्हणाला 'मी दिसतो तसा नाही. तुम्ही मला ओळखले नाही.'' पृ. २९.

एक लगडा भिकारी लेखिकेजवळ 'माई ! कुछ दे दो' म्हणत भिक्षा मागू लागला....... पण या बेट्याला पैसे नको होते त्याला माझा लोकरीचा कोट हवा होता. अंगावरील शाल हवी होती. पैसे फेकून देऊन तो उध्दटपणे म्हणाला, 'मैं भिकारी नहीं हूँ' मैं शिवजीका गण हूँ' मी तुम्हाला शापून टाकीन. तुम्ही हनुमान चट्टी रितसर कसे उतरता ते बघतो. ड्रायव्हरसकट सगळे त्याला मारायला धावले तेव्हा राग आला पण आता मात्र वाटते, बिचाऱ्याला शालीची कोटाची गरज असावी, नव्हे होतीच. पृ. ३९.

''बद्रीनाथपुरीत एका बाईशी ओळख झाली होती. मी तिच्या खोलीवर गेले. आमची पुरुष मंडळी तप्तकुंडावर स्नानाला गेली होती. ती बाईही खोलीत नव्हती. सगळी सराईच सुनसान होती. खोलीत एक अवाढव्य पांचुदीभर मिशांचा धुंद लाल डोळ्यांचा एक बिहारीबाबू..... सिनेमातल्या जमिनदारासारखा कोचावर बसला होता. मी दचकून मागे आले. तो मला म्हणाला, 'बहेनजी घबराईये मत ! आपण सर्व देवाच्या व्दारी आहोत. तुम्ही माझ्यापासून कसलीही भीती बाळगू नका. इथे पाप होणार नाही.'' पृ. ४०.

**मदनाचा बाजार :**

फुलनदेवीला घर लग्न संसार या गोष्टी रुचल्या नाहीत. ती विक्रम मल्लाद या आपल्या प्रियकराकडे सरळ येऊन राहिली. सर्व युध्दे स्त्रीमुळे झाली म्हणतात. कांचनाइतकीच कांतानी युध्दे निर्माण केली आहेत. पृ. ४४. माधोसिंग या दरोडेखोराची हकीकत तर दिलचस्पी........

''हा माधोसिंग पूर्वी लष्कारात शिपाईगडी होता. बाप निवर्तल्यावर हा घरी आला. हा लोहियांचा अनुयायी. एका निवडणुकीत याला दंडुके खावे लागले. यानेही पोलिसांना चार वंडे लगावले. त्यात एक पोलीस मारला गेला, व हे कारण पोलिसांना

माधोसिंगास छेडण्यास पुरे झाले. एरवी माधोसिंग आम्यानजदिकच्या गावी शांतपणे उद्योग करीत दिवस घालवित होता. पण इथेही पोलीस त्याच्यामागे लागून त्याच्यावर खोटेनाटे आळ घालू लागले. माधोसिंग बिथरला व जंग संघर्ष सुरू झाली.'' पृ. ४५.

''मानसिंग हा खेडा राठोडचा एक मोठा जमीनदार. हा एरवी भाबडा माणूस. या मानसिंगाचे व त्याचा उपाध्याय तलसीराम यांच्यात देवदेवस्कीवरून काही किरकोळ भांडण झाले. पण साध्या ठिणगीचा जाळ होऊन बसला. गावात दोन तट पडले. तंटे मारामारी दगाफटके यांना उत आला. व पोलीस या भांडणात शिरले. ते तलसीरामाला फितूर झाले व त्यांनी मानसिंगाला पकडले. मानसिंग तिकडे तुरूंगात जाऊन बसला तसा तलसीरामाने येऊन त्याच्या पुत्राला ठार केले, मानसिंग तुरूंगातून सुटून आला व हा व्यथित झाला. पण त्याने हे सहन केले...... मानसिंग मूग गिळून बसला ही गोष्ट बायकोला रूचली नाही. ती सूडाने पेटली होती. पृ. ४५

''ब्रिटिश सेनेला जबरदस्त हादरा देणारा हा पराक्रमी पुरुष उंच गोरा अतिशय देखणा होता म्हणे ! अगदी परिक थेतील नायक शोभावा. इंग्लिश स्त्रिया तर त्याच्यावर जीव ओवाळून टाकीत. पण तात्यांनी कधीच त्याची आस धरली नाही. कितीतरी स्त्रियांना शीलरक्षणार्थ दरोडेखोरांच्यापासून त्यांनी सोडवले होते. हा अगदी शंभर कुलोत्पन्न महाराष्ट्रीय ब्राम्हण..... त्याचे नाव तात्या भट. बाजीराव पेशव्यांबरोबर जी आश्रित कुटुंबे गेली त्यापैकी हा एक. याला शिपाईबाण्याची लष्कराची अतिशय आवड होती. सदोदित त्याच्या डोक्यावर लष्करी टोपी असायची. म्हणून त्याला थट्टेनं तात्या टोपे म्हणू लागले. थट्टेचे रूपांतर कौतुकात झाले व तात्या टोपे हेच नाव इतिहासात रूढ झाले.'' पृ.५२

नगरसुंदरीचे वर्णनही लेखिका करतात, ते पुढीलप्रमाणे या विषकन्यासुध्दा असत. लाडीक बोलणे..... करपल्लवी करून जवळ बोलावणे...... नाचून गाऊन मनोरंजन करणे. नाना रंग दंग करून विरूध्द पंथातल्या तरूणाची त्या वासलात लावीत. पण त्या तरूणीच होत्या असे नव्हे भिक्षुणी होत्या. विधवा होत्या, परिव्राजक रूपाने संतसंतिणीच्या मेळ्यात........ कुठेही विधिविशेष न बाळगता..... त्यांना टिपून त्या त्यांची वासलात लावीत. पृ. ५४.

लेखिका जेव्हा शिल्पकला पाहतात तेव्हा त्याचेही बाह्यवर्णन करतातच पण त्या कोरीव शिल्पकृतीच्या मनातील भावभावना सहज टिपतात. ते पुढीलप्रमाणे – ''इथं या कुमारिका असल्याने सौभाग्यकांक्षिणी असल्याने त्यांची शरीरे शेलाटी आहेत. सडपातळ आहेत. शरीराला वळण आहे. वक्ष लहान आहेत. उलट प्रमदांची प्रौढांची शरीरे थोराड सुटलेली आहेत. अवयवांची गोलाई. सुखासीन सुस्त गात्रे..... किंचित खाली झुकलेले पयोधर पोटाच्या वळ्या त्यामुळे या प्रौढ प्रमदा चटदिशी ओळखता येतात. निवडून काढता येतात.

कामवासनेने पछाडलेल्या निर्लज्ज मनाला ना भीती ना संकोच. हे जरी खरे असले तरी प्रक्षोभाने मदनाच्या दाहाने साडी फेडणारी साडी फेडून पतीला वा प्रियाला म्हणून उद्युक्त करणारी समागमास पुढाकार घेणारी स्त्री पाहून आपण मात्र शरमेने संकोचून जातो. आईबद्दल सहानुभूती असल्याने हेमवतीची व्यथा तर या चंद्रवर्माने उघडी केली नाही ना ? पृ. ६०

**भूतलावरचा स्वर्ग :**

पंजाबी शेतकऱ्याचे केलेले वर्णन वाचनीय झाले आहे. 'सर दिया लेकीन सीर

न दिया.' दिलाचे डरपोक नाहीत. आवेगासारखे झंझावातासारखे....... जिद्दी कामसू......
राजासारखे भोगावे, मजूरासारखे काम करावे. गव्हाच्याच सोनसळी रंगाचे हे शेतकरी.........

लांब कुडता, लुंगीसारखी गुंडाळलेली चौकड्याचा सलवार, डोक्यावर कोंबड्याच्या तुऱ्यासारखा फेटा आणि रंगीन दुपट्टा व कमीझ घातलेली लाल लाल गाल असलेली त्याची दणकट घरकारीण खांद्याला खांदा लावून काम करीत होती. शेतामधल्या वाहणाऱ्या पंपातल्या पाण्यासारखा जोश उतू जात होता. गव्हाच्या पोत्यांनी भरलेले ट्रक व ट्रॅक्टर्स जणू भांगडा खेळत होते.

त्यादिवशी कुठला तरी सण होता. हळूहळू लोकांचे अड्डे जमू लागले. दोन तीन ठिकाणी लैला मजनू की शिरीन फरहाद कोण जाणे यांची लोकनाट्ये चालली होती. धुक्यासारखा तलम दुपट्टा, सॅटीनची झगमगणारी सलवार, पातळ रेशमी झगमगणारा कुडता व पायांमध्ये जरीचा चढावा घालून जोड्या 'बल्ले बल्ले' करून मिरवत होत्या. कुठे पुढे 'दशहरा' ची तयारी..... रामलिलेची आख्याने चालली होती. पृ. ६५.

मधुचंद्राला आलेल्या जोडप्याचे वर्णन पुढीलप्रमाणे लेखिका करतात. ''यातली 'ती' मला खूप आवडली.'' वैवाहिक जीवन अजून अंगवळणी पडले नसावे. व्यवहारांचा स्पर्श न झालेली वासनेचा दर्प नसलेली, जास्वंदीसारखी आरक्त होत असलेली नवविवाहिता मला खूप आवडली. कर्दळीच्या डहाळीसारखी लवलवीत, वेताच्या छडीसारखी शिडशिडीत...... बोलण्यापुर्वी तिची डावी नाकपुडी किंचित वर होऊन तिच्या खट्याळपणाची चुणूक दाखवायची. त्यामुळे तर ती जास्त सुंदर काव्यमय दिसे. स्वत:शीच खुद्कन हसण्याची तिची लकब तर लाजवाब होती.

याउलट तो सदृढ शिसवी वर्णाचा...... गालफडे रूंद, नाक डोळे मोठे

बटबटीत थोडासा कुरूपातच मोडणारा....... शेक्सपियरनेसुध्दा ऑथेल्लो डेस्डीमोना ही विजोड जोडी निर्माण केली नाहीतर अनुरूप जोडी करण्यास त्याचा हात नव्हे लेखणी कोणी धरून ठेवली होती का ? पृ. ७०, ७१.

रामबनहून प्रवास करताना त्यांना पहाडी लोक भेटतात. ''वाटेत पहाडी गुजर लोक भेटले. अंगकांतीने पिवळे व केसाच्या दोन वेण्या घातलेले हे लोक विश्रांती घेत बसलेले होते. शेळ्या–मेंढ्या चरायला सोडल्या होत्या. खैबर खिंडीच्या पहाडी भागातले हे लोक मोसमात थोडी शेती करतात....... उरलेला वेळ खेचरावरून 'खाल' नावाच्या जनावराच्या लोकरीची देवाण घेवाण करतात. हे पठाण अफगाण....... हिंदूकुश पर्वतामध्ये हिंदू मेले........ ते यांचेच पुर्वज का ? हे लोक धर्माने मुसलमान....... पण खैबर खिंडीचे रक्षण करणे आपला धर्म मानतात. पवित्र कर्तव्य मानतात. पृ. ७४.

''थोड्या वेळाने मागे बडबड ऐकू आली. पहातो तो एक जख्खड म्हातारा पिऊन हातवारे करून आपल्याशीच बोलत होता. आम्ही ठरवलेला शिकारेवाला निळ्या डोळ्यांचा सोनपिवळी केतकी त्वचेचा उंचा पुरा तरणाबांड होता. आम्ही गाफील असताना या पोरग्याने दुसऱ्या शिकाऱ्यावर उडी मारून दुसरे गिऱ्हाईक पटवण्यासाठी तीर गाठला होता. तारूण्य हे त्याचे भांडवल होते. पृ. ८१.

''खरे काश्मिरी पहायचे खेड्यात पेहेलगामला जाताना चंदनवाडी किंवा सोनमर्ग येथे...... निळे निळे अथांग डोळे लाल जिवणीचा सोनचाफी त्वचा...... रेखीव नाक, डोळे सफरचंदी गाल आणि गुंजी ओठ.

स्त्रिया केसांवर रंगीन सेहरा बांधतात. गळ्यात केसात ॲल्युमिनियमचे दागिने, कान तर सतराशेकडे टोचलेले व अठराशेकडे त्यात दागिने.

एके ठिकाणी तर आमचे डोळे खिळले. एक स्त्री...... आपले सुकवण सुकवीत बसली होती. कापलेले टोमॅटो आणि मिरच्यामधून तिचा मेंहेंदीभरला हात फिरत होता. तो हात नव्हता.....तो पिवळा नाग डुलत होता.'' पृ. ८१, ८२.

काश्मिरी पंडित जोडपे अवंतीपूरला जात होते. डोक्यावर कशिद्याची गोल टोपी, गुडघ्यापर्यंत जाणारा झब्बा त्यावर कशिद्याचेच जाकीट होते. खाली पांढरी सलवार. या मध्यम वयाच्या माणसाने घातली होती. त्याच्या बायकोने कलाकुसरीचा कमीझ घातला होता. या कमीझच्या बाह्या खालची हाताची बोटे झाकतील अशा होत्या. डोकीवरचा गुलाबी तरंग्याचा शेमला पाठीवर आलेला..... गळ्यात 'बकरा' नावाचा हार...... नाकात सौभाग्यचिन्ह चमकी होती. हातात आमच्या गोटपाटल्यासारखे 'बंगल गुणस' होते. व कपाळावर ठसठशीत तांबडे लाल कुंकूही होते. पण सगळ्यात लक्षात राहिले ते सौभाग्यचिन्ह म्हणजे 'गिजुड'..... व डोकीवरच्या गुलाबी तरंग्याला विशोभित दिसणाऱ्या पाठीवरच्या पिकलेल्या केसाच्या दोन वेण्या....... पृ. ८८.

**कलकत्ता एक आनंदयात्रा**

लेखिकेने टिपू सुलतानच्या पुतळ्याचेही मुझीयममधले व्यक्तिचित्रण उत्तम रेखाटले आहे. ''हा टिपू मुसलमान होता. तरी त्याच्या चेहऱ्यावर मेहंदीभरी दाढी नाही. मिशांचे वळलेले आकडे नाहीत. चेहरा निवळ नितळ सात्विक...... अंगात बाराबंदी डोक्यावर पगडी व कानात भिकबाळी...... अगदी आपलाच वाटतो. श्रीवर्धनच्या पेशव्यांचा भाऊ.......... पण जवळीक साधण्याचे कारण नाही हे वळणावरचे पाणी आढ्यालाच मिळाले आहे. या टिपू सुलतानने ही देवळे मोडून त्याचे खांब मशिदीला बसवले आहेत. तो राजा झाला म्हणून पिंजाऱ्यानी तारा मोडू नये. वीर तात्या टोपे यांचा अंगरखा व डोक्यावरचे केस

आपल्या अंगावर काटा आणतात. ही केसाची बट राखून ठेवण्याची पाश्चात्यांची पध्दत...... कुणी केस ठेवीत कुणी राख चांदीच्या डबीत घालून ठेवीत. जे वंदनीय पूजनीय त्याची स्मृती ठेवायची,........... आणि बेरकी ब्रिटिशच हे करतात. पृ. ९९

''सती जाणाऱ्या स्त्रीचे एक चित्र आहे. या स्त्रिया स्वखुषीने सती जात होत्या असे नव्हते. एखादी स्त्री नाकारीत असे. तिला उपाशी ठेवून भांग पाजीत व हातपाय बांधून तिला त्यांची घरची माणसे चितेवर ढकलून देत. ती जर बाहेर येण्याचा प्रयत्न करू लागली तर तिला बांबूनी ढोसत व तिच्या किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून कर्कश भेसूर ढोल बडविले जात.

आणि स्वखुषीने सती जाणाऱ्या स्त्रियांना तरी पतीबद्दल माया प्रेम होतेच असे म्हणता येत नाही. पतीनंतर भेडसावणारे एकलेपण, स्वत:बद्दलची असहायता..... विधवा म्हणून समाजाकडून होणारी तुच्छता...... या गोष्टी त्यांना सती जाण्यास भाग पाडीत. शिवाय प्रलोभने होतीच होती. उपदेश होता. मंत्राव्दारे तिला सांगितले जात असे. 'जगणे मरणे एकच..... शिवाय तू काही मरत नाहीस. तू तुझ्या पतीकडे जात आहेस. तिथे तुझे पतीकडे पुनर्मिलन होईल. परत लग्न होईल. परलोकांत तुला नवीन वस्त्रे लेणे मिळेल.......' आता फक्त तिने दागिने उतरवून आगती जावे.'' पृ. १००.

''कलकत्याला ज्या घरी लेखिका वसतीला होती. त्यांच्याकडे एक सावताळ मोलकरीण येत असे. निळ्या काठाची साडी....... डोक्यात फुले असायचीच. वाऱ्याच्या झोताबरोबर नाचल्यासारखी ती यायची, तिची भाषा आम्हाला थोडी कळायची. एक दिवस ती आली आणि म्हणाली आपल्याला जत्रेला जायचे आहे. जत्रा म्हणजे दशावतारी खेळ म्हणजे नाटक. दुसरे दिवशी येताना तिने 'खाजे' ही मिठाई आणली व तीही त्याला 'खाजे'

म्हणतात असे जेव्हा आम्ही ऐकले तेव्हा तिला मिठी मारायची तेवढी ठेवली. पृ. १०१.

रवींद्रनाथ शरदचंद्र यांच्या कादंबरीतील नायिका कशा होत्या त्याचा साक्षात प्रत्यय लेखिकेला बंगालमध्ये आला. ''बंगालची 'ती' मात्र मला अतिशय आवडली. सुंदर पण कणखर तेजस्वी पण शांत आकर्षण..... आणि निस्तेज पिकुटलेली वाटली नाही. कलकत्त्यात सगळीकडे अराजक....... पण ही कुठेही बिनधास्तपणे हिंडू शकते. भांगात सिंदूर, पायात अळिता, गुलाबी पोपटी आकाशी अशा फिक्कट साड्या नेसणारी..... पदराला किल्ल्यांचा जुडगा.... हातात वज्रचुडा नावाचे सौभाग्यचिन्ह बांगडी........ याबरोबर शंखाच्या बांगड्या......

पतीची चरण धूळ माथी लावणारी........ जेवताना वारा घालणारी, रस्त्यावर पतीच्या मागून चालणारी, हळू आवाजात बोलणारी पण शेवटी आपलेच म्हणणे खरे करणारी........ ही ओळखीची वाटली. रवींद्रनाथ शरदचंद्र यांच्या कांदबरीत ही भेटली होती.'' पृ. १०३. ''दक्षिणेश्वरी काली पहायला विवेकानंद हा सात कमानीचा प्रचंड पूल ओलांडून जावे लागते. मुख्य मंदिर अर्थात दक्षिणेश्वरी भवतारिणी कालीचे ही आदिमाया काली शिवाची पत्नी पण लंकेची पार्वती नाही आहे. लक्ष्मीलाही असूया वाटावी असा भरजरी शालू व हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांनी ती मढलेली आहे. एक हजार चांदीच्या पाकळ्यांच्या कमळांत ती उभी आहे. डाव्या हातात राक्षसाचे मुंडके, उजव्या हातात तलवार एक हात अर्थात आशिर्वचनपर....... पण आपण शिवाची पत्नी हे भान तिला नाही आहे. दागिन्याच्या गर्दीत नरमुंडांची माळ ती वापरते. पण शिवाला म्हणजे महाकालाला ती लाथाडते. पृ. १०५.

दार्जिलिंगला जायला सिलिगुडीच्या गाडीत जाऊन लेखिका बसतात, तेव्हा एक नववधू सासरला परत चालली असावी. किशोरपण अजून पुरते सरले नव्हते. तारुण्यही

नीट भेटले नव्हते. धड ना दिवस ना रात्र अशा तिन्ही सांजेच्या गोरज सीमेवरची ही बालिकावधू......... डोळ्यात असहायता घेऊन ही रडत होती. सासरची वाट ही काट्याकुट्यांनी भरलेली असतेच. त्यातून नववधूला हे काटे जास्त टोचतात. पण नवरा समंजस होता...... असावा. गोड आवाजात तो कुजबुजत होता. तिला समजावित असावा आणि रडता रडता ती हसू लागली. हसता हसता परत डोळे पुसून श्रावणी खेळ खेळू लागली. हा आपल्या जीवनाचा जोडीदार..... स्वामी....... त्याच्याबरोबरच आता जीवन घालवायला हवे....... तिला कळत होते. पण मागले दोर काही कापत नव्हते.'' पृ. ११२, ११३.

''अशीच आणखी एक जोडी होती. यातला पुरुष पोक्त होता. ती मुलगी लग्न झालेली असावी. डोक्यावर घुंघट, भांगात शेंदूर...... ती एवढीशी अकरा बारांची...... बारीक चणीची........ अजून चूल बोळके काही तिने आवरले नसावे. आतासुध्दा तिच्या हातात बाहुली दिली असती तर ती गुड्डा गुड्डी भातुकली खेळली असती. डोळ्यांत चंचलता अस्थिरता....... ठिकऱ्या खेळल्यासारखी ती चालायची. तो तिचा सासरा बाप की नवराच हे मात्र कळले नाही. त्याने दुर्गा पूजेच्या वेळी फुले दिली नाहीत म्हणून ती रूसली होती. 'अच्छे घर की लडकी बालों में फूल नहीं डालते' घोगऱ्या आवाजात तो रागे भरत होता. पृ. ११३.

लेखिकेला हरतऱ्हेची माणसे भेटली. त्याचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले त्यांच्या भावभावनांसह आपल्या प्रवासवर्णनात वास्तवाच्या पातळीवर मांडण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे.

''गाडी येण्याची वाट पहात लेखिका फलाटावर बाकावर बसल्या होत्या. त्यांच्या मागेच जगाच्या रंगमंचावरचे नाटक चालू होते.

एक मध्यम वयाची बाई...... जिच्या पदराखाली आणखी एक मूल होते...... ती एका आठ दहा वर्षाच्या मुलीस बेदम चोपीत होती. मधेच कचाकचा बोलत होती. बरोबर एक पुरूष होता. आमचा अंदाज..... ती तिची सावत्र मुलगी असावी. मातीचे कुत्ते अते चिकटावून का चिकटतात किंवा ती पहिल्या घरोब्याचीही असावी. तिला ती मुलगी नकोशी झाली होती......' पिता जरी विरे, विरे न जननी....' नवऱ्यावरचा साऱ्या जगाचा राग मुलीच्या पाठीवर काढला जात होता. आणि ती मुलगी स्थिर नजरेने नागिणीच्या डोळ्यांनी तो मार नव्हे ते नियतीचे देणे स्वीकारीत होती. काय नव्हते तिच्या डोळ्यांत ? राग होता, व्देष, अगतिकता होती आणि सूडाची रेषाही तळपून जात होती. आता दुसरी जागा नव्हती. चार दिवस सासूचे नव्हे या आईचे, पुढले दिवस आले तर आईच्या नव्हे तर नियतीच्या कंठाचा घास ती घेणारच होती. पृ. १२५.

''जर्मनीतली कॅथरिन किनले ही तरूण मुलगी तीन चार वर्षे पुण्यात होती. स्वखर्चाने राहून ती वेद शिकली. कांचीपीठाचे शंकराचार्य हे आळंदी, पंढरपूरला आले होते. तिथे जाऊन ही कॅथरिन शंकराचार्यांना भेटली. आणि आपण वेद शिकत असल्याचे तिने त्यांना सांगितले. तिला प्रोत्साहन देण्याचे सोडून, तिचे कौतुक करण्याचे सोडून आमच्या शंकराचार्यांनी तिला वेद शिकण्यास मनाई केली. पृ. १३३.

**'देखणी दक्षिण' मधील व्यक्तिचित्रण :**

कथा, कादंबरी, प्रवासवर्णन यासारख्या साहित्याच्या कलाप्रकारातून उठून दिसणारा लेखनातील एक विशेष असा घटक म्हणजे व्यक्तिचित्रण. प्रवासवर्णनापुरता विचार केला तर प्रवासात लेखकाला वेगवेगळ्या प्रादेशिक स्थळांना भेटी द्याव्या लागतात.

तेव्हा ओघानेच तेथील व्यक्तीचाही लेखकाला सहवास लाभतो. ते त्या परिसरातील व्यक्तीच्या जास्तीत जास्त जवळ जाऊन त्यांच्यात सामील होतात. त्यांच्यातील चित्रविचित्रपणा, भावभावना, राहणीमान, बोलीभाषेचा वेगळेपणा, पेहेरावातील फरक, बोलण्याची लकब, त्यांच्या सवयी, त्यांच्यातील अंतरिक गुण दोषासह लेखक त्यांना चित्रीत करीत असतो. ''हा वाङ्.मयप्रकार वास्तवाविष्काराबरोबर कल्पितही असू शकतो, तो व्यक्तीच्या स्वभावावर अधिक भर देतो. तेथे ललित गद्य लेखनाला काही बंधने स्वीकारून व्यक्त व्हावे लागते. लेखकाच्या अनुभवापेक्षा व्यक्तीच्या स्वभावाला आणि 'भाव' दर्शनाला महत्त्व असते.'' [५] लेखिकेनेही वास्तव असे चित्रण तर केले आहेच पण ज्या ठिकाणी काही व्यक्ती भेटल्या त्यांच्या भावभावना त्या स्वत:च व्यक्त करतात. 'इथे एक रंगेल नवयौवना आपल्या प्रियकराला भिजवीत आहे. पिचकारीने त्याचे अंग अंग भिजवून ती त्याला जेरीस आणीत आहे. आणि 'नको' ची आर्जवे करण्याची पाळी त्याच्यावर आली आहे आणि तिची दासी की सखी कोण जाणे...... ती तर इतकी बहात्तर खोलीवाली खट्याळ, खोडसाळ आहे. खुदूखुदू हसून ती हिला भरीस पाडते आहे, उद्युक्त करते, तिला प्रोत्साहन देते.' पृ.१९. दगडात कोरलेल्या शिल्पाचे लेखिका अत्यंत बारकाईने निरिक्षण करतात व त्यांच्या अंतरिक मनातील भावभावना त्या वर्णन करतात. शिल्पांचे त्यांच्यावरील केलेले वर्णन हे अगदीच सुसंगत झाले आहे हे वरील वर्णनावरून जाणवते. 'भिंतीवरच्या छताच्या चारी बाजूंना आहे. सौंदर्यशालिनी बेचाळीस अप्सरा, एकीसारखी दुसरी नाही. या किन्नरी वेगवेगळ्या नाट्यमय मुद्रा लेवून उभ्या आहेत. मोहक अंडाकृती चेहरा, सरळ चाफेकळी

नाक, धनुष्याकृती भुवया, मोहक तोंडली ओठ, मासोळीसारखे चंचल नेत्र, मखमली उदर, कर्दळी मांड्या, यौवनाने टचटचलेले उन्नत उरोज, केळीच्या सोप्यासारखे पाय आणि आषाढ घनासारखा भरघोस केशसंभार...... हा सौंदर्याचा अर्क आहे.

यांची नावेच आहेत – हस्तिणी, चित्रणी, भामिनी, कामिनी, पुर्ण मोहिनी, गौरी, चित्रलेखा, चैत्रावली, दर्पण सुंदरी, गानमंजिरी, धनुष्य देहिनी, कपोलभैरवी' पृ. २०. सुंदर स्त्रीचा उत्कृष्ठ नमुना कसा असावा किंवा अर्क कसा असतो तेच सांगण्याचा लेखिका वरील शिल्पातून प्रयत्न करतात. लेखिका वर्णन करत असताना वाचकाची नजरही एका ठिकाणी ठरत नाही तर स्त्री देहाच्या प्रत्येक अवयवावर जाऊन स्थिरावते व उत्तम सौंदर्याचा नमुना नंतर त्या वर्णनातून साकार होतो. 'नेहमी सुंदर स्त्रीची कल्पना म्हणजे गुलछडीसारखी लवचिक, वेलीसारखी कोमल, वेताच्या छडीसारखी शिडशिडीत अशी असते. पण इथल्या एकूण एक स्त्रिया संस्कृत वाङ्.मयातील नायिकेसारख्या ठेंगण्या पण प्रमाणबध्द बांधेसूद, कोरीव आणि लालित्यपूर्ण आहेत.' पृ. २१. स्त्री सौंदर्याचे वर्णन त्यांचे लावण्य जास्तीत जास्त वर्णन करण्याचा लेखिका प्रयत्न करतात. सौंदर्याची झलक, सौंदर्याची खरी ओळख त्या वाचकवर्गाला करून देतात. प्रत्यक्ष सौंदर्याचा पुतळा त्या शब्दातून उभा करतात. 'निळ्याभोर आकाशाच्या पडद्यावर, निसर्गाच्या भव्य वेदीवर सत्तावन्न फूट उंचीचा नग्न, निर्भय, निरिच्छ पण निरागस...... चेहऱ्यावर केसाची झुल्फे खेळवणारी ही प्रचंड मूर्तिशिळा..... एक हजार वर्षांचा असा हा सुकुमार गोमटा बाहुबली ताजा, टवटवीत तरूण भासत होता. डोक्यापासून पायापर्यंत सगळे अवयव रेखीव व प्रमाणबध्द..... मोठे रूंद कपाळ, सरळ नाक, डोळे अर्धवट उघडे, मुखावर मंद स्मित आहे आणि अनाथकालीन गांभीर्य वसत आहे, असा हा सर्वसंग परित्याग केलेला तपस्वी

कमलपुष्पावर ध्यानस्थ उभा आहे. आजूबाजूला मुंग्यांनी वारुळे केली आहेत. याला भान नाही. वारूळांतून नाग डोकावताहेत, त्याला भिती नाही; पण चंदनाचा परिमळ लागल्याशिवाय काय राहणार आहे. ते आपला स्वभाव विसरले आहेत. तेही ध्यानस्थ आहेत.' पृ. २५. लेखिका दगडाच्या मुर्तीमध्ये जीव ओतण्याचा प्रयत्न करतात. त्यांना सजीवता देण्याचा प्रयत्न करतात. अन् ती खरोखरच हाडामासाची असल्यासारखी भासू लागतात. त्यांच्या अंतरिक भावभावनांचे कृतीतून हावभावातून व्यक्त होत राहते. 'काळ्या कोळशाच्या रंगाचा, डोक्यावर तेल–पाणी–फणी नाही अशा राठ केसांचा पाठीवर अंबाडा, रंगीबेरंगी ठिगळांच्या गोधडीचा अंगावर झगा आणि वरच्या उघड्या अंगावर शेंदूर माखलेला, पायांत चाळ व कमरेला घुंगराची माळ, माथ्यावर गाड्यासारखा देव्हारा ठेवलेला अशी त्याची स्त्री. हे विदेशी लोक पाहून धावत आली. हा पोतराज अंगावर आसूड मारीत रक्ताच्या चिळकांड्या उडवीत येऊ लागला. हे पाहून हे जोडपे स्तंभित होऊन डोळे मोठमोठे करीत पाहत राहिले. हे पाहून हा चेकाळला आणि परत परत आसूड मारून घेऊ लागला आणि ती बाई छातीवर स्वस्तिकाची आकृती करीत, मागे–पुढे पाय करीत मोरपिसांचा कुंचा हलवीत नाच करू लागली. डोळे झाकून नॅन्सी ओरडू लागली. तशी ही बाई चेटकीसारखे हसत अंगात आल्याचा भाव करू लागली. 'यू ब्रुट !' अनावर होऊन जोयस त्याच्या अंगावर धावून गेला आणि बाकीच्यांनीही मग या पोतराजाला पळवून लावले. त्यांनी त्या पोतराजाला पैसे दिले नाहीतच, पण नित्य नाविन्याचे हे भोक्ते–त्यांनी त्यांचे फोटो सुध्दा काढले नाही.' पृ. ३६. पोतराजाचा पोशाख व त्याच्या हावभावाचे अचुक चित्रण लेखिकेने केले आहे. त्यांच्या हालचाली व कृतीमुळे विदेशी युगलांवर कसा परिणाम झाला तेही अचुकतेने नमूद करतात. एक छोटेसे नाट्यच त्यांनी शब्दातून उतरविले आहे. 'रस्ताभर नुसती उधळण

चालू होती. साऱ्या सृष्टीला भुरळ पडली होती. पाण्याच्या खाचरांत काम करणाऱ्या स्त्रियांच्या काचोळीविना काया उन्हात तळपत होत्या आणि त्यांचे उघडे पाय जणू कृष्णकमळीची फुले वाटत होती........ पंख्यासारख्या नेसूच्या पांढऱ्या पायांवर आलेल्या निऱ्या, त्यांचे पाठीवरचे मोर पिसारे आणि त्यांचे पीळदार शिसवी शरीराचे 'पुडवे' नेसलेले त्यांचे घरकार ही जणू जलतरंगातली चित्रे वाटत होती.' पृ. ४६. उषा पाणंदीकर एखाद्या स्त्रीचं जेव्हा बाह्यांगाचं वर्णन करतात तेव्हा फारच पाणंदीकर सुकुमार कोमल, हळूवारपणे वर्णन करतात. कोठेही भडकपणाचे दर्शन घडवत नाहीत. चित्रकलेच्या दालनात जेव्हा त्या जातात तेव्हा तेथील चित्रांचेही पुढीलप्रमाणे हुबेहूब वर्णन करतात. 'राजा रविवर्माच्या प्रेयसीचे चित्र, सुगंधा म्हापसेकर हिचे चित्र पाहून. सुंदर शालीन चेहरा, माथ्यावरचे कुरळे केस, चमकत असलेली दंतपंक्ती, पिवळी सोनचाफी, किंचित गुलाबी झाक असलेली त्वचा...... निळ्या जळासारखा शालू नेसलेली ही शुभ्रवसना मनात कालवाकालव करून गेली. हिराबाई पेंडणेकर, अंजनी मालपेकर यांची ही समकालीन...... त्यांच्याचसारखी ही आपल्या गोमंतकाची होती.' पृ. ५४. स्त्री सौंदर्याच्या विविध घटकाचे त्या अत्यंत रंगसंगतीच्या साह्याने जीवंत स्त्री वाचकांच्या समोर उभ्या करतात. त्यात त्या पुर्णपणे यशस्वी होतात. वधुवेशातील कन्याकुमारीचे वर्णन पुढील शब्दात करतात. 'लाल रेशमी भरजरी परकर घातलेली, दंडावरचे सोनेरी काठ, खांद्यावरती सोनेरी कोयरी आणि कंचुकीचे मागचे सोनेरी बंध....... उजव्या बाजूने खोवलेला शेला...... डोक्यावरचा चकाकता मुकूट, कमरेचा मेखला लखलखते. दोन्ही नाकपुड्यांतले हिरे झगमगतात, अशी वधुवेशातली कन्याकुमारी उभी आहे.

'सौभाग्यकांक्षिणी म्हणाल तर हातात फुलांची वरमाला नाही; पण शिवाला

आवडणारी रूद्राक्षमाळ आहे. रूद्राक्ष म्हणजे वैराग्य, वंचना, हसऱ्या मुखवट्याआड डोळ्यांतले आसू लपवीत, कल्लोळ दाबीत, उसासे उरात दडवीत ही कन्याकुमारी उभी आहे.' पृ. ६३ स्त्री लेखिका असल्याकारणामुळे भाव, मनातील भावना अचुक अंदाज घेऊन टिपतात. ह्या संदर्भातच व्यक्ती चित्र कशाला म्हणावे ह्याविषयीचे भाष्य ''एखादा प्रसंग किंवा एखादे दृश्य आणि त्यामुळे उद्‌भूत झालेले मनोविकार याचे सूचक शब्दांत परिणामकारक व थोडक्यात काढलेले चित्र तेच व्यक्ति चित्र''[६] तिरूपती बालाजीने अंगावर कोणते अलंकार परिधान केले आहेत. त्याचेही लेखिका दागिन्यांच्या नावासह पुढीलप्रमाणे वर्णन करतात. 'किती याला दागिण्यांची लालसा ! स्त्रियांसारख्याच याने पायांत साखळ्या घातल्या होत्या म्हणून हसू आले आणि नजर वर गेली आणि बारकाईने पाहिले. कुठे दागिने नव्हते ? अगदी सजवलेल्या नंदीबैलासारखे बालाजी दिसत होते. सारे शरीर हिरे, मोती, माणिक यांनी भरले होते. गदेकरिता हात सोडला होता, त्या हातात काकणे होतीच; पण बाहूंत नागबंधन होते. डोक्यावर रत्नजडित गोमेद नवरत्नाचा किरीट होता. या मुकुटाला तीन इंच व्यासाचा पाचू होता. कान मकरकुंडलांनी शोभले होते. दोन्ही बाहूंवर दोन सोन्याची नागफुले होती. नवरदेव लग्नाला उभे होते; पण हातात तलवार होती' पृ. ९० प्रत्येक दागिण्यांची नावे देतात त्यांचा आकार या सर्वांची माहिती देतात. एका जोडप्याचेही तितक्याच कमी शब्दात दोघांना शब्दातून आकार देतात 'चणीचे ठेंगू, काळे केस कुरळे आणि नाक थापाडे असे निग्रोंसारखे एक जोडपे दारात उभे होते. त्या स्त्रीच्या गळ्यात थाळी होती. हाताच्या पाचही बोटात अंगठ्या होत्या. दोघांनीही कमरेला फडके बांधलेले होते व वरून एक फडके पांघरलेले होते. ती गवताने भरलेले कोल्हे घेऊन आली होती. कुणीतरी ते

घेतले आणि घरी येईतो त्याचा पार भुगा झाला होता.' पृ. १२२ असे सुरेख वर्णन जोडप्यांचे केले आहे. महादेवाचे वर्णन तर अप्रतिम झाले आहे. 'मागच्या हातात अग्नी, उजव्या हातात डमरू, पुढचा हात अभयमुद्रा....... केशसंभार बांधलेला तरी अवखळ सुटलेल्या बटा, लय, स्थिती, मुक्ती, अभय हे चेहऱ्यावरचे भाव. डावा पाय उचललेला, उजवा गुडघ्यात वाकलेला, गुडघ्यातला तो जबरदस्त आत्मविश्वास. डावीकडून उजवीकडे होणारे त्याचे पदन्यास. ते अंगविक्षेप, शरीराची होणारी ती लयबध्द हालचाल. एक पाय वर......... उलटा गेलेला, पायांची बोटे गालाला लागलेली....... कधी केसांशी खेळत आहेत. हे 'नटणं' आजच्या कसलेल्या नर्तकाला जमेल असे वाटत नाही.

'नृत्य करता-करता महादेवांच्या कानातले कुंडल खाली पडले; पण शिवांनी नृत्य थांबवले नाही. नृत्य करता करता पायांनीच कुंडल काढून त्यांनी ते कानात घातले.' पृ. १२३. शिवाच्या प्रत्येक हालचाली, पदन्यास, अंगविक्षेप, त्याच्यातला आत्मविश्वास, चेहऱ्यावरचा अभय हा भाव प्रत्येक घटकाकडे उत्तम लक्ष पुरवले आहे. रावण, कुंभकर्णाचे व्यक्तिचित्रण थोडक्यात आले आहे. पृ. १३१. शंकराची प्रचलित असणारी प्रतिमा दक्षिणेकडे जाईल तसे कशी बदलत जाते याचेही त्या चित्रण करतात. 'एरवी शंकर हा गरीब, स्मशानातला गोसावडा, पण यांनी दक्षिणपथ ओलांडला की हे किती नखशिखांत बदलून जातात याना आठवण करत नाही. त्यांच्या चिताभस्माचे मग उटणे होते, कवट्यांचे मोती होतात, सापांचे हिरेजडित रत्नहार होतात, तिसरा डोळा नीलमणी बनतो.

व्याघ्रचर्म सोडून, सोन्याचे शेले-शालू पांघरून, सोन्याची झूल पांघरलेल्या

नदीवर बसून सप्तमातृका व गण यांचे वऱ्हाड घेऊन हे पार्वतीशी लग्न करण्यास निघतात तेव्हा वाटते, हे दक्ष राजाने बघायला हवे होते.' पृ. १३४. उषा पाणंदीकर अशी एकापेक्षा एक सरस व्यक्तिचित्रणे करतात.

**'आज इथे उद्या तिथे' मधील निवेदनशैली :**

सौ. उषा पाणंदीकर यांच्या उपरोक्त पुस्तकातील निवेदनाचा विचार केला तर असे आढळून येते की, त्यांचे निवेदन हे बहुढंगी असे आहे. प्रवासात पाहिलेल्या प्रत्येक घटनाप्रसंगाचे, अनुभवाचे त्या स्वत:च भाष्य करतात. हे निवेदन प्रथमपुरूषी स्वरूपाचे असून ह्या निवेदनाचे विशेष म्हणजे त्याला आध्यात्म, पुराण, अवांतर वाचनाची विपुल अशी जोड आहे. त्या जेव्हा जेव्हा निवेदन करतात तेव्हा तेव्हा त्या संदर्भाच्या आधारे निवेदनाला पुर्णत्व देतात.

त्यांची निवेदन पध्दती ओघवती व लयबध्द, काव्यमय अन् अनेक भाषेच्या शब्दमिश्रणाने ओतपोत भरलेली आहे. निवेदनाच्या संदर्भात लिओ टॉलस्टॉय म्हणतात, ''प्रत्येक मोठा लेखक आपले स्वत:चे नवे तंत्रही शोधतो.'' आशय जेवढा वैविध्यपुर्ण असेल तेवढेच त्याचे तंत्रही वैविध्यपुर्ण व वैशिष्ट्यपुर्ण असते. हे स्टॉलस्टॉयचे मत महत्त्वाचे आहे.''[७] – लिओ टॉलस्टॉयच्या मताप्रमाणेच पाणंदीकरांची लेखनकरण्याची निवेदनपध्दती वैशिष्ट्यपुर्ण अशीच आहे, हे त्यांच्या लिखानावरून दिसून येते. प्रथम पुरूषी निवेदन पध्दती वापरताना लेखक एक किंवा अनेक व्यक्तिंशी तादात्म्य पावतो. अशा प्रकारच्या निवेदनपध्दतीमुळे लेखनात जिव्हाळा निर्माण होतो.

लेखकाला भावनात्मकतेला महत्त्व द्यावयाचे असेल, व्यक्तिचित्रणाचाच आविष्कार करावयाचा असेल तर अशी पध्दती (प्रथमपुरूषी) वापरली जाते. निवेदन

पध्दतीने निवेदन करताना खालील गोष्टी ओघानेच त्यात येतात. वाचकाला व्यक्तीचा परिचय करून देणे, प्रवासवर्णनातील घटनाप्रसंगाचा भाग पुढे सरकवणे, मार्मिकपणे भाष्य करणे, साध्या सरळ भाषेतून आपला अभिप्राय व्यक्त करणे, उपहास, उपरोध प्रशनात्मकता यांच्या साहाय्याने आपला अभिप्राय व्यक्त करणे हे निवेदनातून साधले जाते.

वरील सर्व घटकांच्या सुमेळ घालण्याचा सौ. पाणंदीकरांनी उत्तम प्रयत्न केला आहे.

**'देखणी दक्षिण' मधील निवेदनशैली :**

प्रवासवर्णन हे प्रथमपुरुषीच असते. लेखक आपले अनुभव स्वत: कथन करीत असतो. लेखक ज्या ज्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देतो, त्या ठिकाणचा त्याला झालेला निसर्गाविष्कार तो आपल्या आविष्काराच्या मिश्रणातून वर्णन करीत असतो, ''प्रवासवर्णनातील निवेदन पध्दतिविषयी प्रा. गंगाधर पाटील म्हणतात, 'प्रवासवर्णन करणारा लेखक निवेदन (नॅरेशन), वर्णन (डिसक्रिपशन), भाषण संवाद (स्पीच – डायलॉग) व भाष्य (कॉमेंट) या निवेदन पध्दतीच्या चार प्रकारांचा अवलंब कमी अधिक प्रमाणात करीत असतो. म्हणून प्रवासवर्णन हा निवेदनपर साहित्याचा प्रकार मानणे युक्त होईल.''[८] वरील चारही घटकांचा अवलंब उषा पाणंदीकर यांनी केलेला आहे. प्रवासवर्णनात त्यांनी ज्या ठिकाणांना भेटी दिल्या तेथील लेखन असो अगर निसर्गचित्रण असो त्याचे उत्तमप्रकारे वर्णन करून रसिकवाचकाला मंत्रमुग्ध करण्यात यशस्वी झाल्या आहेत. संवादाचा विचार केला तर लेखिका गोमंतकीय भाषेतून कधी कधी संवाद करतात. हे संवाद करत असताना त्यांच्या तोंडून आपसुकच मग म्हणी बाहेर पडतात. त्यांनी मराठी आणि कोकणी म्हणींचा आपल्या संवाद फेकीत उत्तम मिलाप घडवून आणला आहे. भाष्य

ह्या घटकाचा लेखिकेच्या प्रवासवर्णनात कमी प्रमाणात आढळणारा घटक म्हणून पाहता येईल. जीवनभाष्याचा त्यांनी इतर घटकापेक्षा अल्प प्रमाणात वापर केल्याचे जाणवते. प्रवासवर्णन करत असताना घटना प्रसंग, निसर्गचित्रण यांचे विपुल प्रमाणात वर्णन आले आहे, त्यामुळे त्यांनी भाष्यकरण्याकडे त्यांचा कल अल्पसा आहे. प्रवासवर्णन करत असताना त्यांनी आत्मनिवेदन करण्याचाही प्रयत्न केला आहे. त्यांच्या रोजच्या व्यवहारातील गोष्टी, सवयी यांचीही त्या आत्मनिवेदनातून माहिती नमूद करतात. काही वेळेला त्यांच्या मनाप्रमाणे जेवण, चहा, नाष्टा मिळत नाही तेव्हा त्या अस्वस्थतेचेही त्या वर्णन करतात . त्यांच्या आवडीनिवडीचीही त्या नकळत माहिती लेखनाच्या ओघात देऊन जातात.

**'आज इथे उद्या तिथे' : शीर्षकाची समर्पकता**

'आज इथे.......उद्या तिथे' पुस्तकात मुख्यत: चार ठिकाणच्या प्रवासाचे वर्णन आहे. हिमालय, खजुराहो, काश्मीर आणि कलकत्ता या चारी प्रवासकथा वाचताना आपण एक बहुश्रुत, रसिक व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात आहोत हे सतत जाणवत राहते. हे सुभाष भेंडे यांचे ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील विधान यथायोग्य असे आहे.

वरील चार ठिकाणच्या प्रवासाकरिता त्यांना वेगवेगळ्या घटना प्रसंगांना तोंड द्यावे लागले. एखादा प्रदेश, निसर्गस्थळ, मंदिरे पाहिले की, पुढच्या प्रवासाला तयार व्हायचे. कडाक्याची थंडी असो वा अंग भाजून काढणारा उन्हाळा असो, आज इथे तर उद्या तिथे जायला त्या नेहमीच उत्सुक असतात. याबाबतीत त्यांना मन:पुर्वक साथ देणारा पती सुदैवाने लाभला आहे. देशाटनाचे फायदे पतीपत्नींनी ओळखले आहेत. देशाटनामुळे माणसाच्या अंगी चातुर्य येते हे तर खरेच; शिवाय माणूस सहनशील होतो, कोणत्याही

विपरीत परिस्थितीत तोंड देण्याची क्षमता त्याच्या अंगी निर्माण होते.

प्रवास सतत नव्या प्रदेशातून सुरू असतो नवे लोक, नवे ठिकाण, नवी भाषा, जीवनपध्दती यांचा प्रवासकर्त्याला अनुभव येत असतो. त्यातून तो प्रत्येक घटनाप्रसंग, व्यक्ती, समाज, संस्कृती वेगळ्या व सुक्ष्म नजरेने पहात असतो व नमूद करीत असतो. प्रत्येक स्थळाच्या बाबतीत तो जाणून घेण्यासाठी आतूर असतो. प्रवासातील येणारे पुढील ठिकाण हे लेखनकर्त्या लेखकाला पर्वणीच असते. तो प्रत्येकवेळी नाविन्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. तो वेगवेगळ्या घटकातून, माध्यमातून वेगळेपणाचे चित्रण करत असतो.

उषा पाणंदीकरांनी त्यांच्या पुस्तकाला जे शिर्षक योजिले आहे ते अगदीच समर्पक असे आहे. कारण त्यांचा प्रवास हा सतत पुढे पुढे सरकत राहतो. प्रत्येकवेळी नवे पाहण्याची इच्छा होते. पहिले ठिकाण सुंदर असते. त्यानंतर येणारे स्थळ आणखीनच सुंदर असते. प्रत्येकवेळी त्यांच्या मनामध्ये जिज्ञासावृत्ती प्रबळ होत असते. नवनवीन ठिकाणासाठी स्थलांतर करावे लागते. ह्या सर्व प्रक्रियेतून त्यांना प्रत्येक अनुभवाला तोंड द्यावे लागते. ह्यातूनच त्या अनुभव संपन्न होत राहतात. म्हणूनच वरील शिर्षक हे समर्पक असेच आहे असे म्हणावे लागते.

**देखणी दक्षिण : शीर्षकाची समर्पकता**

उषा पाणंदीकरांनी 'देखणी दक्षिण' हे योजलेले शिर्षक अत्यंत समर्पक असे आहे. हे शिर्षक योजन्याच्या मागील गर्भितार्थ लक्षात घेतला तर आपणास असे आढळून येते की, लेखिकेने दक्षिण परिसरात जे गमन केले मंदिरांना भेटी दिल्या तिथल्या मंदिरामध्ये मंदिराच्या बाह्यांगावर जी स्त्रीशिल्पे कोरलेली आहेत त्यांचे जास्तीत जास्त वर्णन

करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीसौंदर्याच्या वर्णनामध्ये त्या इतक्या गर्क होतात की, स्त्रीची आभुषणे, अलंकार, पोशाख, चेहऱ्यावरील हावभाव, मनातील भावभावना सुंदररित्या चित्रित करतात. उदाहरण म्हणून सांगायचे तर कन्याकुमारीकेचे नववधू वेशातील केलेले वर्णन अप्रतिम असे झाले आहे.

लेखिका जशा शिल्पकलेचे चित्रण सुंदर करतात. ती प्रत्येक शिल्प जीवंत वाटू लागतात. वाचकांच्या चक्षुंपुढे त्या स्त्रिया आपल्या आभुषणासह व परिधान केलेल्या पेहरावासह तरळू लागतात. त्यांच्यात चाललेला संवाद जणू वाचकाला ऐकूच येतोय असा भास होऊ लागतो. शिल्पचित्रांच्या वर्णनाबरोबरच लेखिका दक्षिणेत ज्या ज्या स्थळांना भेटी देतात. तिथल्या परिसरातील स्त्रियांचेही वर्णन करतात. त्यांच्या शरीराची ठेवण, त्यांचा केससंभार, चक्षू, ओठ, भुवया, नाक, दंतपक्ती, गाल, कम्र, पोटऱ्या, उरोज या सर्वांना उपमाच्याद्वारे त्या प्रतित करतात. त्यांच्या सौंदर्याला आणखीन खुलवून दाखवतात. अशा वर्णनामुळे सौंदर्यरसाची निर्मिती तर होतेच अन् लिखाणाला आणखीनच लालित्य प्राप्त होते. ''प्रवासवर्णन लिहिणाऱ्या लेखकाचे वर्ण्य विषयाशी आंतरिक नाते जुळले तर त्याचे लेखन आत्मनिष्ठ व कलापुर्ण होते. आपण पाहिलेले प्रदेश वा स्थल कसे आहेत हे सांगण्यापेक्षा आपल्याला ते कसे दिसले हे सांगितले तर ते प्रवास/स्थलवर्णन लालित्यपुर्ण होते. अर्थात त्यामागे असणारे मन संपन्न असावे लागते.''[९] भारती निरगुडकरांच्या या विधानावरून असे लक्षात येते की, लिखानात आत्मनिष्ठा महत्त्वाची आहे. सौ. उषा पाणंदीकरांनी दक्षिणेतील स्त्री शिल्पांचे जे वर्णन केले आहे ते नक्कीच आत्मनिष्ठ तर आहेच पण त्याबरोबर लालित्यपुर्णही आहे. असे ठामपणे त्यांच्या लिखानाच्या बाबतीत म्हणता येईल.

**आज इथे उद्या तिथे मधील छायाचित्रे :**

या पुस्तकामध्ये लेखिकेने त्यांना लिखानाच्या गरजेनुसार छायाचित्रांचा वापर केलेला दिसून येतो खरे तर त्या त्या ठिकाणाची बरीच छायाचित्र देता आली असती पण पुस्तकाचा आणखीनच आवाका वाढला असता याचे भान ठेवून त्यांनी ठराविक व मोजक्याच छायाचित्रांना प्राधान्य दिलेले आहे. 'आज इथे उद्या तिथे' या पुस्तकाचे मुखपृष्ठ फारच बोलके असे आहे. मुखपृष्ठावर त्यांनी भारताचा नकाशा दाखवला असून भारतातील काही ठराविक विशेष वस्तुशिल्पांचा, मंदिरांचा, गोमटेश्वराची उभी मुर्ती, मिनाक्षी मंदिर, आग्र्याचा ताजमहल, जम्मू काश्मिरकडील बर्फाळप्रदेश, हिमालयाचा सचित्र देखावा नकाशातून उभा केला आहे. त्यामुळे वाचकाला पुस्तक हाती घेताक्षणीच भारतातील विशेष स्थळांचे मुखपृष्ठावरूनच दर्शन होते. त्यामुळे वाचक सुखावतो व आपल्या मायभूमीतला प्रत्येक विशेष स्थळांची माहिती वाचण्यास नक्कीच उद्युक्त होतो. छायाचित्रांच्या बाबतीत डॉ. आनंद पाटील यांचे मत विचारात घेतले आहेच.

या पुस्तकात पृ. १७ व २१ वर दोन छायाचित्रे दाखवली असून १७ वर मंदिराचे चित्र दिले आहे. हिमालयाच्या कुशीतील हे मंदिर असून त्याच्याविषयीची आख्यायिकाही लेखिकेने नमूद केली आहे. पृ. २१ वरील चित्र हे फारच रमणीय असे असून निसर्गाचा सुंदर मिलाफ या छायाचित्रातून दिसून येतो. वर असणारे बर्फाच्छादित डोंगर व बाजूलाच वाहणारी नदी आणि त्याच्या किनारी असलेले सुंदर असे छोटेसे छोपडीवजा घर हे छायाचित्र खरोखर विलोभनीय असे असून याचे विशेष असे की, वाचक हा प्रत्यक्ष त्या प्रदेशात गमन करत असल्याचा त्याला भास होत राहतो. लेखिकासुध्दा चतुरस्त्र आहेत. छायाचित्र जसे बोलके वापरतात. तितक्याच तल्लकबुध्दीने त्या परिसराचे

काव्यमयरित्या वर्णन करून त्याच्या सौंदर्यात आणखीनच भर घालतात.

पृ. ५७ वरही छायाचित्र दिले असून रतिक्रीडेत मग्न होऊन परस्परांच्या बाहुपाशांत बध्द होऊन धुंद झालेल्या मिथुन शिल्पाच्या जोडीचे आहे. यातून त्यांनी ब्रम्ह व माया यांचा संयोग..... जणू योग व भोग हे देवत्वाशी एकत्र होण्याकरता त्या मिळण्याकरता हातात हात घालून चालले आहेत. त्या जे छायाचित्र देतात त्याचे वर्णनही संदर्भासहित व वास्तवाच्या पातळीवर करतात. पृ. ५९ वर एका मुलीचे शिल्पचित्र आहे. त्याविषयी लेखिका लिहितात. ही मुलगी सोळा सतरा वर्षाची आहे. स्नान करीत असावी. पदर खाली पडला आहे. ही पाय दुमडून मान वळवून आपल्याकडे पहाते. हिला आपण आलेले आवडत नाही. भुंवया उंचावून ही विचारते कोण तुम्ही ? काय काम आहे तुमचे ? दिसत नाही ? मी इथे आंघोळ करते आहे. असे त्याविषयी वर्णन करतात.

जम्मुमध्ये लेखिका जेव्हा प्रवास करीत होत्या तेव्हा त्यांनी तेथे बर्फाच्छादित डोंगर तर पाहिलेच पण सरोवरेही पाहिली. तेथील सरोवरातील छोट्या-छोट्या गृहनौका,स्थिती, पर्यावरण या चित्रातून दिसून येते. त्यामुळे लेखनाला वास्तवाची जोड मिळाली आहे. बेने देत्तो क्रोचेंचे मत ''सौंदर्यात्मक कृतीचे रहस्य या नि:स्तब्ध प्रयत्नात असते. कलावाक्य त्यावेळेस जी मुर्ती मनातील भाव प्रकट करील अशा अव्यंग सर्वांगपुर्ण मुर्तीचे चिंतन करीत असतो. हे रहस्य अंत:स्फूर्त असते; त्यात गुढता नसते; परंतु सम्यक दर्शन असते, परिपुर्ण कल्पना असते; योग्य कल्पना असते. कलेचे आश्चर्य बाह्यात्मकतेच नसते, तर कल्पनेच्या संकल्पनेत असते. बाह्यीकरण किंवा बाह्य अभिव्यक्ती (Externalization) ही गोष्ट यांत्रिख तंत्राने व हस्तकौशल्याने केली जात असते.'' [१०]

पृ. २ वर एका काश्मिरी महिलेचे छायाचित्र दिले असून तिच्या पेहेरावाचे व

आभुषणाचे त्यातून सहजदर्शन घडते. त्या स्त्रीविषयी उषा पाणंदीकर फारच सुंदर लेखन करून लेखनात जीवंतपणा आणतात ही स्त्री त्यांना प्रवासात भेटलेली आहे व सौंदर्याचा उत्कृष्ठ नमुना म्हणूनही त्या स्त्रीची दखल घेतात. पृ. १०३ वर बंगालमधील एका ऐतिहासिक वास्तुचे छायाचित्र दिले असून तिचे सौंदर्य अजूनही आहे तसेच आहे. ती वास्तू कशी रुबाबात दिसते हे प्रत्यक्ष चित्र पाहिल्यावर त्याचा प्रत्यय हा येतोच यात शंका नाही. पृ. १२८ वर नटमंदिराचे छायाचित्र दिले असून त्याच्याविषयीची माहितीही लेखिका पुरवताना दिसतात. त्या मंदिराच्या प्रत्येक भागाची माहिती देताना दिसतात. प्रत्येक भागाचे विशेष वर्णन केले आहे.

पृ. १३५ वर पुरीच्या मंदिराचे चित्र दिले असून त्याच्याविषयीची माहिती, तेथील सण उत्सव याचीही त्यांनी सखोल व पुराव्यानिशी माहिती दिली आहे. लेखनाला जर छायाचित्राची जोड मिळाली तर असे प्रवासवर्णन आणखीनच वाचनीय होते व वाचकवर्गाला प्रत्यक्ष स्थळ पाहिल्याचा आनंद मिळतो. तेथील प्रसंग वा परिसर प्रत्यक्ष छायाचित्राच्या माध्यमातून उभा राहतो. त्यामुळे लेखनाला आणखीनच विश्वासार्हता प्राप्त होते. पुस्तकाच्या पृष्ठावर सौ. उषा पाणंदीकरांनी स्वत:चा ओळखपत्रप्रकारचा फोटो छापला असून त्यांची थोडक्यात माहिती त्यांनी दिली आहे.

**देखणी दक्षिण : छायाचित्रे**

छायाचित्र प्रवासवर्णनामध्ये असणे ह्यासंदर्भात आनंद पाटील म्हणतात ''छायाचित्रे काढणे हा प्रवासातील एक प्रमुख विधीच ठरला आहे. पण आपल्या प्रवासर्णनाला पूरक ठरणारे फोटो बऱ्याच वेळा नियोजनपुर्वक काढून घ्यावे लागतात. तांत्रिकदृष्ट्या ते छपाईसाठी योग्य असावे लागतात. रेखाचित्रेही फार परिणामकारक ठरतात.

दृश्य परिणाम साधणारे, मुड दाखवणारे, वातावरणदर्शक, स्थळदर्शन घडवणारे, असे अनेक फोटो असतात. संहितेला उठाव देणारे फोटो फार हुशारीने निवडावे लागतात.

प्रवासवर्णनात नाट्यमयता आणणारी छात्रायाचित्रे छापावी. प्रवास वर्णनातील वर्णनाशी विसंगत ठरणारी छायाचित्रे वापरू नयेत. त्यांची पुनरावृत्ती टाळावी.''[११] उषा पाणंदीकरांच्या 'देखणी दक्षिण' या पुस्तकाच्या अंतरंगात अशा कुठल्याच छायाचित्राचा अगर रेखाचित्राचा वापर केल्याचे आढळून आले नाही. छायाचित्र अगर रेखाचित्र वापरल्याने त्याचा वाचक वर्गावर होणारा परिणाम आनंद पाटील यांनी त्यांच्या विधानातून नमूद केला आहे. सौ. पाणंदीकरांनी मुखपृष्ठावरच तेवढे दक्षिणेतील मंदिरावर जी शिल्पे कोरली आहेत त्याचा वापर केल्याचे दिसून येते. 'देखणी दक्षिण' या पुस्तकात छायाचित्राचा वापर न केल्याची कमतरता लगेच डोळ्यास जाणवणारी आहे.

**आज इथे उद्या तिथे : पुस्तकाचे भाषाविशेष**

सौ. उषा पाणंदीकर यांनी संमिश्र स्वरूपाच्या लेखनपध्दतीचा अवलंब केला आहे. त्यांच्या या पुस्तकात त्यांनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कोकणी शब्दांचा वापर केला आहे. तरीसुध्दा मराठी भाषेने आपले अस्सलपण सोडलेले व ढळलेले दिसत नाही. उलट तिच्या सौंदर्यात आणखीनच ठसकेबाजपणा अवतरला आहे. उषा पाणदीकरांची लेखनी खेळकरवृत्तीची, तटस्थपणा, अवांतर वाचणाचे अफाट संदर्भ, परखडपणा, वास्तवाच्या पातळीवर लेखन करतात. त्यांच्या वाचनाची विस्तारकक्षाही त्यांच्या संदर्भावरून कळून येते. एखाद्या ऐतिहासिक विषयावर भाष्य करित असताना त्या कुणाचाही मुलाहिजा न राखता अगदी स्पष्टपणे आपले मत मांडतात. भाषेच्या प्रमुख दोन अंगाचे विवेचन नेमाडे

करतात. ''स्थिर भाषा ही सामुहिक व्यवस्था असते, तिच्यात समूहमानस व्यापक स्वरूपात प्रकट होते. तो व्यक्तिनिरपेक्ष असा निर्णायक नियमांचा संकेतकोश असतो. ह्याउलट अस्थिर भाषा प्रयोगशील, उद्देशपूर्वक वापर म्हणून आढळते.''[१२] डॉ.भालचंद्र नेमाडे यांच्या विधानाचा प्रत्यय हा उषा पाणंदीकरांच्या लेखनातून येतो. त्यांना हवी तशी भाषा तयार करून त्यांच्या व्यक्तिगतपातळीवर त्यांनी स्वत:ची शैली निर्माण केली आहे. त्यांच्या भाषेत कोकणी, मराठी म्हणींचाही वापर केलेला दिसून येतो.

उषा पाणंदीकर यांनी त्यांची स्थानिक गोमंतकीय भाषेचाही अधूनमधून वापर केल्याचे दिसून येते. याही पुस्तकात त्यांनी उपमा, प्रतिमा, प्रतिक यांचा वापर करून भाषेला लालित्य प्राप्त करून दिले आहे. ह्यासंदर्भात नेमाडे म्हणतात, ''साहित्याच्या भाषेची प्रमुख कसोटी ही की, तिने व्यवहारभाषेचे व्याकरण प्राधान्य किंवा नियमावलंघन पार पाडून त्याला ओलांडून अधिक अर्थ दिला पाहिजे. म्हणजेच साहित्याच्या भाषेत शैलीचा उसवा आढळतो.''[१३]

काव्यात्मकतेचाही त्यांच्या लेखनीतून प्रत्यय येतो. एखादी घटना वा प्रसंग लेखिकेच्या मनावर इतकी भावते की त्यामुळे त्यांच्या हृदयातील बोल आपसूकच ओठावर येऊन लेखणीतून काव्यमयरित्या उतरतात.

**देखणी दक्षिण : भाषाविशेष**

'देखणी दक्षिण' या पुस्तकाची भाषा जादातर प्रमाण मराठी असली तरी लेखिकेने काही संस्कृत, इंग्रजी, कोकणी शब्दांचा वापर केल्याचे दिसून येते. इंग्रजी शब्दांचा तर त्यांनी भडीमारच केला आहे. नको असताना सुध्दा इंग्रजी शब्द घुसडण्याचा प्रयत्न केला आहे. जसे इंग्रजी शब्दांच्या बाबतीत घडते तसे संस्कृत कोकणी शब्दांच्या

बाबतीत घडत नाही. आवश्यक तेथेच असे शब्द योजले आहेत. त्यामुळे प्रवासवर्णनाच्या आशयात लालित्य निर्माण झाले आहे. त्यासंदर्भात आनंद पाटील यांचे विधान विचारात घेऊ ''भाषाशैली प्रवासवर्णनाच्या आशयसुत्रानुसार बदलणारी असावी. उदा. निसर्गाचे रम्य दृश्य वर्णन करताना ती काव्यमय बनेल, पण काव्याच्या लाटेत लेखक वाहून जाता कामा नये. साधी आणि सरळ निवेदनपध्दती वापरावी, विशेषणे योग्य जागी द्यावी. त्यांची उधळण न व्हावी. अतिशयोक्ती शक्य तेवढी टाळावी. स्थळ, लोक आणि त्यांच्या प्रदेशाचे वर्णन वास्तव असावे. त्यांच्याबद्दल सहानुभूती असली तरी आश्रयदात्याची भूमिका व्यक्त होऊ नये. वेगवेगळ्या पध्दतीने प्रवासवर्णन लिहून प्रयोग करता येतात.''[१४]

उषा पाणंदीकरांनी हिंदी गाण्यांचा असाच स्वैर वापर केलेला दिसतो पृ.१२,३३,५३,१३६,१३९ त्यामुळे प्रवासवर्णनाला एक प्रकारे बोजडपणा आल्याचे जाणवत राहते. अशीच काही हिंदी वाक्ये व गाणी प्रवासवर्णनाचा मुख्य आशय पचवू शकला नाही. उलट ती खेळकर वृत्तीची भडकपणा दर्शवणारी वाटतात. म्हणींच्या बाबतीत म्हणायचे झाले तर त्यांनी कोकणी व मराठी म्हणींची सुंदर प्रेरणी प्रवासवर्णनातून केली आहे. त्यांच्या भाषाशैलीतील महत्त्वाचा घटक म्हणजे काव्यात्मकतेचा, त्यांची लेखनी एका सुज्ञ कवीची असल्याची जाणीव होते. कधी कधी त्या काव्यपंक्तीही लिखाणात उतरवतात. संवाद, उपमा, प्रतिक यांची तर त्यांनी सुंदर उधळणच केली आहे.

या पुस्तकातून त्यांनी भावनाविष्कार घडवणारे काही घटना प्रसंगाचेही चित्रण केले आहे. आलंकारिक वाक्येही आली आहेत. जीवन भाष्यही अधुनमधून कमी प्रमाणात का होईना पण करतात. आशय जसा बदलेल तशी त्यांची भाषा बदलताना दिसते. या वरील घटकांचा आपण वेगळ्या स्वरूपात विचार पुढे करणार आहोतच.

**'आज इथे उद्या तिथे' मधील म्हणी :**

पाणंदीकरांच्या पुस्तकात म्हणींचाही वापर केल्याचे दिसून येते. म्हणींमुळे ललितलेखनास एक चटकदारपणा येतो. तसेच कमी शब्दात खूप मोठा आशय दडलेला असतो. म्हणी म्हणजे अनुभवाच्या खाणी असे म्हणतात ते योग्यच आहे. म्हणी या समाजव्यवहारातूनच निर्माण झालेल्या आहेत. एखादी घटना, प्रसंग, अनुभव हा परत घडत असेल तर अनुभवाच्या म्हणीचा हमखास उल्लेख जनमाणसात होतोच. ह्या म्हणी मुखोदगत असतात. परंपरेने त्या चालत आलेल्या असतात त्यांची स्वत:ची एक लकब शैली असते.

समाजाला उपदेश, उद्‌बोधन करणे, जागृती करणे हेच म्हणीच्या उच्चारामागे दडलेला भाव असतो. प्रसंगानुसारच काही म्हणींचा उच्चारी केला जातो. कोणत्याही वेळी कोणतीही म्हण उच्चारून चालत नाही. शिवाय म्हणी या ललितसाहित्यात सौंदर्यनिर्माण करण्याचेच काम करतात. आज प्रत्येक भाषेत म्हणींचा सर्रास वापर केला जातो. साहित्यातसुध्दा पुष्कळ प्रमाणात वापर केल्याचे आढळून येते.

म्हणींचे विशेष हे की, आकार छोटा पण त्यातील आशय मोठा असतो, सुक्ष्मनिरीक्षण, अनुभवाची समृध्द अभिव्यक्ती, थेट मनाला भिडण्याचे सामर्थ्य, रंजकता, चटकदारपण, प्रखर वास्तव, रूपकाचा चपखल वापर, चमत्कृतीचा वापर, लोकमान्यता, सार्वत्रिकता, समाजमनाचे प्रकटीकरण, समुहमनाला आवाहन करण्याचे सामर्थ्य, यमक, अनुप्रासादी शब्दालंकाराच्या योजनेचा म्हणीत वापर. यामुळे म्हणी सौंदर्यपुर्ण होतात. तसेच म्हणीतून विवेक, विनोद, बौध्दिकता आणि कल्पकता याचेही वर्णन येते.

म्हणींची व्याख्या अनेकांनी केली. म्हणींची पहिलीच उपलब्ध असणारी

ऑरिस्टॉटलची व्याख्या "Proverbs are remarks which on account of their shortness & correctness have been saved out of the wreck and rains of ancient philosophy "[१५] (म्हणीचे रूप सुटसुटीत असते आणि तिच्यात विपुल आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य असते. तसेच म्हणींची परंपरा अतिशय प्राचीन असते.) अशी म्हणींची व्याख्या ऑरिस्टॉटलने केली आहे. तर न. चि. केळकरांनी तीन प्रकारात म्हणींचे लक्षण सांगितले आहे. ''चिमुकले, चतुरपणाचे व चटकदार वचन म्हणजे म्हण''[१६] वरील विशेष व व्याख्या पाहिल्या तर हेच दिसून येते की, ललित साहित्यात म्हणींचा वापर केल्याने ललितसाहित्याच्या सौंदर्यात, घाटात विशेष भर पडते.

**उषा पाणंदीकरांच्या वरील पुस्तकातील मराठी म्हणी :**

१. निद्रेसी आसन उत्तम पाषाण वरी आवरण आभाळाचे . पृ. ९७.

२. शूराला पहावा रणात आणि शेराला पहावा वनात. पृ.१२१.

३. पिता जरी विरे, विरे न जननी. पृ. १२५.

४. जे न देखे रवी..... ते देखे कवी. पृ. १२९.

५. भटाला बारसे आणि बारावे सारखेच म्हणतात. पृ. ९७.

**हिंदी म्हणींचा वापर :**

१. नंगे को खुदा भी डरता है। पृ. ८५.

२. घायल की रीत घायल ही जाने। पृ. १०६.

**कोकणी म्हणींचा वापर :**

१. दर्याच्या देगेर, रूप्याच्या वेळेर. पृ. ९०.

२. आम्ही तुमी एकां भाषेनं केले लोका . पृ. ९४.

३. कोण करता पाप आणि कोण पिता जाप ! पृ. १२६.

४. घुगी गे घुगी, आमाड्यार उबी. पृ. ११८.

**संस्कृत म्हणींचा वापर :**

१. प्रथम : ग्रासे मक्षिका पात :

**देखणी दक्षिण मधील म्हणी :**

ललितसाहित्यात म्हणी का वापरावयाच्या ? त्याचे ललित साहित्यात काय योगदान असू शकते. या संदर्भात वि. वा. भिडे यांचे मत विचारात घेऊ त्यांनी म्हणींची व्याख्या सांगितली आहे. ''ज्यात काही अनुभव, उपदेश, माहिती, सार्वकालिक सत्य किंवा ज्ञान गोवलेले आहे, जे अल्पशब्दात्मक आहे, ज्यात काही चटकदारपणा आहे आणि लोक संभाषणात वगैरे वारंवार योजतात असे वचन किंवा वाक्य म्हणजे म्हण.''[१७] वरील व्याख्येवरून वरील दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. अल्पशब्दात्मकता, उपदेश, माहिती, अनुभव, सत्य किंवा ज्ञान ह्या सर्वांचा प्रत्यय एका म्हणीतून आपल्याला सहज होऊ शकतो.

उषा पाणंदीकरांनी मराठी म्हणींचा तर वापर केला आहेच पण त्याचबरोबर कोकणी म्हणींचाही त्या सुंदररित्या वापर करतात. आशयाला अनुसरूनच त्यांनी म्हणींची निवड केली आहे. आशयाला बाधा अगर विसंगत अशा स्वरूपाच्या म्हणींचा वापर केलेला प्रत्यय येत नाही. 'देखणी दक्षिण' या पुस्तकात ज्या कोकणी व मराठी, संस्कृत, हिंदी म्हणी आल्या आहेत त्या एकत्रित खाली दिल्या आहेत.

**मराठी म्हणी :**

१. 'वेश्या असुनि पतिव्रता....... नेमिला जो पुरूष तत्वता........ कोणासही वश नव्हे'

पृ. २०

२. राजा बोले...... दल हाले पृ. ३२.

३. करून करून भागली अन् देवपूजेला लागली पृ. २५.

४. खाणाऱ्याने खाल्ले........ कोठावळ्याच्या पोटात दुखते पृ. ३६.

५. दुरून डोंगर साजरे पृ. ३७.

६. आधी झाले थोडे पृ. ३८.

७. खाल्ल्या अन्नाशी जागले पृ. ४३.

८. आषाढमासे दिसे चांदणे...... समजावी दुष्काळाची लक्षणे पृ. ४५.

९. रोज शय्येला राणी चालत नसते आणि जिभेला कोंबडी नको असते पृ. ४७.

१०. सासरचे बोल, कारल्याचे वेल पृ. ५०.

११. दिसते तसे नसते पृ. ५४.

१२. श्रावणात मेली सासू आणि भाद्रपदात आले आसू पृ. ६२.

१३. आप सोडून पर घरी. त्याची मनसुबी देव करी पृ. ७१.

१४. भाव तेथे देव नाही, हाव तेथे देव पृ. ९५.

१५. ससा पळाला म्हणून मी पळालो पृ. ९५.

१६. कडू कार्ले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच पृ. १०३.

१७. इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो पृ. १०८.

१८. जेवायला आधी, निजायला मधी आणि कामाला कधी कधी पृ. ११३.

१९. अंगापेक्षा बोंगा जड पृ. १२८.

**कोकणी म्हणी : २० आहेत.**

१. नस्ते बाये म्हाका सोसना...... मोगाक भायली सवंगा कित्याक ! पृ. १०.

२. मरणांति वैराणी. पृ. २८.

३. पोळ्येर पावणो. पृ. ३२.

४. पर्वता दोंगरार चंदन फुलला........ चंदन फुलला कोणे देखिला ....... पृ. ३७.

५. राखूक जाय गोय झाडां रोय. पृ. ३९.

६. देवान दिला....... आणि देवचारानं व्हेला..... पृ. ४१.

७. आळवा खाज ज्याची ताकाच कळटा....... पृ. ४१.

८. आम्ही तुमी एका.... नव्हे भाषेन केली लोका......पृ. ४२.

९. एकीकडे नांदू आनि चिचेपानार न्हिदू. पृ. ४५.

१०. रवळेत दवरला फोव ....... योतलो वतलो म्हजो घोव !..... पृ. ४५.

११. कांटो आनि गोटो. पृ. ४७.

१२. दूध लाह्यो चाख...... भावाक म्हज्या राख. पृ. ५४.

१३. चेंगलम चेंडा मंगलम. पृ. ५८.

१४. फेस्त करी गांव.......पादव्हिगारा नाव. पृ. ५९.

१५. आंधळ्याक गाय,संन्यासाक बाय. पृ. ६७.

१६. कुंदेदु तुषार हार धवला. पृ. ६८.

१७. नशिबान घोव मेळचो. पृ. ११३.

१८. पाच घोवांची बायल. पृ. ११४.

१९. इतलो कोको,इतलो मेमो. पृ. ११८.

२०. साळो वरसाच्या व्हकलेन उखललो करो आनि आवय म्हंटा म्हंजो कुसावो बरो. पृ. १४१.

**संस्कृत म्हणी :**

१. दुर्जनस्य प्रथमम् वंदे पृ. ३१.

२. संगती संग दोषानम् पृ. ४४.

**पोर्तुगीज म्हण :**

Hlaoe sempre rainha, haoe sempre galinha - पृ. ४७.

**हिंदी म्हणींचा वापर :**

१. बिल्ली गयी हाज को पृ. २५.

२. मियाँ बिबी राजी पृ. ३५.

३. कौन खाय दूध–मलिदा, कौन खाय भूस पृ. ३६.

४. लडकपन खेल में खोया – बुढापा रोया रोया पृ. १००.

५. दुनिया झुकती है लेकीन झुकानेवाला चाहिए । पृ. १११, ११२.

**आज इथे उद्या तिथे : हिंदी शब्दांचा वापर**

वरील पुस्तकात हिंदी शब्दाचा वापर लेखिकेने खूप केला आहे. त्या हिंदी शब्द मुद्दाम घुसडत नाहीत. तर आवश्यकतेनुसार त्याचा वापर केलेला दिसतो. सौ. पाणंदीकरांच्या लेखनाला एक वेग आहे. त्या लेखनवेगाच्या ओघातच त्यांच्या तोंडून हिंदी गीते, हिंदी म्हणी, शब्द बाहेर पडतात. ज्यावेळी लेखिका उत्तरेकडे प्रवास करत असतात तेव्हा त्यांना साहजिकच राष्ट्रभाषेचा वापर करावा लागतो. जेव्हा त्यांची जिज्ञासा होते तेव्हा त्या तेथील परिसरातील व्यक्तिंशी हिंदीतूनच संवाद साधतात. त्यांना प्रवासात मग ज्या

ज्या व्यक्ती भेटल्या त्यांच्या तोंडचे संवाद हे हिंदूतूनच लेखिकेने आपल्या पुस्तकात नमूद केले आहेत. त्यामुळे प्रवासवर्णनाला एक प्रकारची खुमारी प्राप्त झाली आहे. त्यामुळे लेखिकेने योजिलेला प्रत्येक शब्द हा पुस्तकास लालित्य प्राप्त करून देतो.

हिंदी शब्दांच्या वापरामुळे लिखानास लयबध्दता प्राप्त झाली आहे. मराठी भाषेच्या अस्सलपणात कसलीही बाधा आली नाही. उलट मराठी भाषेला एका उंचीवर नेऊन ठेवण्याचे कार्य इतर भाषांनी साधले आहे. त्यापैकी एक म्हणजे हिंदी भाषा होय. हिंदी शब्दांमुळे, हिंदी म्हणी, गाणी यामुळे लालित्याचा एक उत्कृष्ठ नमूना पाहता येईल. उषा पाणंदीकरांनी त्यांची स्वत:ची एक खास शैली तयार केली आहे. ह्या पुस्तकात जे हिंदी शब्द आले आहेत ते खालीलप्रमाणे.

**भूतलावरचा स्वर्ग**

मौसम – ६३, अलिशान – ६४, लढाई – ६४, अनाजळी – ६५, मंडी – ६५, 'सर दिया लेकीन सीर न दिया' – ६५, डरपोक – ६४, शौकीन – ६५, खाना – ६५, चुलाणा – ६५, पराठा – ६५, नान– ६५, मालीश – ६५, कबर – ६६, काला आम – ६६, खलिसा – ६७, अश्राफ – ६७, गुरू का चरक – ६८, खास – ६८, मेहमान – ६९, दरबार साहिब – ६९, नफरत – ६९, 'गुरू नानकसा फकीर...... हिंदू का गुरू मुसलमान का पीर – ६९, जो गृहस्थ रहे उदास नानक कहे ताकत दास – ६९, न कोई हिंदू न कोई मुसलमान सबको एकचि अल्ला रे – ६९, मुखबानी – ७०, खालसा – ७०, शरमून – ७१, शहीद कुँवा – ७१, तसबिरी – ७२, जागो मोहन प्यारे – ७२,दरिया – ७३, खाल – ७४, हमे इसका अभिमान है –....७४, खुनीनाला – ७४, आंचल – ७५, माशलुका – ७५, सैय्या झुटों का बडा सरताज निकलो – ७५, ओ बलमा तूने धोका

दिया ! – ७५, मजनू – ७६, कश्मिर और कुछ नही सिर्फ कश्मिर – ७६, हां हां ! पूछने की क्या जरूरत है – ७७, बंदा हाजिर है – ७८, 'हा ! मेरी बच्चीको मच्छी खिलाउंगा, मुर्गी खिलाऊँगा' – ७८, 'तुझे लंडन दिखाऊ पॅरीस घुमाऊ, व्हीस्की पिलाऊ, ब्रॅडी पिलाऊ....' – ७८, 'ये कश्मिरी लोगों की आदत अच्छी नही है....... – ७९, दानत बुरी है इसलिये ये लोग गरीब रहते है – ७९, कोश्ताबा – ७९, बडी – ८०, कहावा – ८०, गाफील – ८१, सेहेरा – ८१, बार बार देखो हजारबार देखो, ये देखने का है – ८१, देखने की जीच – ८२, इसी जगह सायरा बानू खडी थी – ८२, कश्मिर की कली हूँ मैं ! मुझसे ना रूटो बाबुजी ! मुरझा गई तो फिर खिलूँगी कभी नही, कभी नहीं, कभी नहीं जी – ८३, रूज – ८३, मेहेर – ८३, प्यार का राही – ८३, अकबरी – ८३, दीदी आप खूश है ना । आप मुझे खूश करोगी ना ।' – ८५, झब्बा – ८८, कमीझ – ८८, बकरा – ८८, धुप्पी – ८८, वझिरे आझम शेर ए कश्मिर – ८९.

**कलकत्ता एक आनंद यात्रा :**

पेहेलियात – ९३, घोडा अडा क्यो ! पान सडा क्यो ! – ९३, जुठन – ९३, खुशबू – १०४, बदबू – १०४, जहर – १०७, बझार – १०७, अच्छे घर की लडकी बालों में फुल नही डांलते – ११३, 'लाल लाल गाल.... गाल तेरे – ११४, दी दी येलो – ११८, मेरा नाम जोकर – १२०, जबरदस्त – १२१, गर्दन – १२१, इन्कलाब झिंदाबाद – १२२, क्रांती अमर रहे – १२२, सच्चे – १२३, लुच्चे – १२३, कच्चे – १२३, आदमी – १२६, औरते है । टुरिस्ट है छोड दो........ – १२७, आराधनागृह – १२८, शौकीन – १३१, कल हमारा है ! १३४, जहन्न में – १३८, 'लगाई न लगे बुझाई न बुझे छुपाई न छुपे – १४६, कत्तल – १४६.

**देखणी दक्षिण : हिंदी शब्दांचा वापर**

मराठीने अनेक भाषांचे होणारे आघात सोसून स्वत:चे अस्तित्व टिकवले आहे. अनेक भाषांमधून मराठीत शब्द आले पण मराठी भाषेने तिचे मराठीपण सोडले नाही. इंग्रजी, हिंदी, पारशी, पोतुर्गीज, गुजराती अशा वेगवेगळ्या भाषेतून शब्द आले. मराठी भाषेने कसलीही कुरकूर न करता असे शब्द स्वीकारले. काही शब्दांना आपलेसे करूनही घेतले.

भाषेमध्ये अशा प्रकारचे संक्रमण का होते ? या प्रश्नाचे उत्तर असेच देता येईल की, मणुष्य हा स्थलांतरशील प्राणी आहे. तो एका ठराविक ठिकाणी राहून आपले जीवन व्यतित करू शकत नाही, जेव्हा तो आपल्या काही उद्देशाने प्रवास करतो तेव्हा तेथील लोकांशी, संस्कृतीशी त्याची ओळख होते. एकमेकांच्या संस्कृतीची देवाणघेवाण होते. एका भाषेतील शब्द साहजिकच दुसऱ्या भाषेत प्रवेश करतात. जसे स्थलांतराने हा बदल घडतो तसाच बदल, लेखन, साहित्यामुळे, पत्रव्यवहार, मिडीया, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, दूरदर्शन यामुळेही भाषेमध्ये इतर शब्दांची सरमिसळ होऊ शकते.शब्दांचे स्थलांतर होऊ शकते.

अशा पध्दतीने भाषेमध्ये होणारे परिवर्तन म्हणजे दुसऱ्या भाषेचे आक्रमणच असते. अशा वेगवेगळ्या माध्यमातून आलेली आक्रमणे मराठी भाषेने पुर्ण क्षमतेने पेलली आहेत व तिची स्वत:ची अशी खास स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. जेव्हा अशा वेगवेगळ्या भाषेतून घेतलेले शब्द असतात तेव्हा जाणकार साहित्यिक मुद्दाम व कलात्मकदृष्टी ठेवून लिखाण करीत असतो. यासंदर्भात एक मत ''कलात्मक कलानिर्मिती ही रचनात्मक प्रवृत्तीला आकार देण्याची जी अंत:प्रेरणा तीतून जन्मते, तसेच हृदयातील भावनांना कलेचे स्वरूप प्रामुख्याने वास्तवाची नक्कल असते; कला म्हणजे निसर्गासमोर धरलेला आरसा. कला म्हणजे वास्तवाचे प्रतिबिंब माणसाला अनुकरण करण्यात आनंद

वाटतो. पशुपक्ष्यांत ही गोष्ट नाही. परंतु कलेचे मुख्य कार्य बाह्यरूप दाखवणे नसून, वस्तूंचे अंतरंग दाखवणे हे आहे. कला अंतरभावदर्शिनी आहे. केवळ बाह्यरूपदर्शिनी नाही. कलेचा प्राण बाहेरच्या गोष्टीचे बारीकसारीक चित्रण करण्यात नसून अंतरंग प्रकट करण्यात आहे.''[१८] उषा पाणंदीकर यांच्याही पुस्तकात परकिय भाषेतून बरेच शब्द आले आहेत त्याचा विचारही आपण केला तर असे आढळून येते की, लेखिकेचे वाचन अफाट आहे. तसेच जनसंपर्कही खूप असल्याने त्यांच्यामध्ये अशा शब्दांचा साठा असल्याचे जाणवून येते. 'देखणी दक्षिण' या पुस्तकात आलेले हिंदी शब्द. कुँवार, जंगल – ९, पत्थर, शौक – १६, तेज – १९, ना मारो पिचकारी – १९, चीज – १९, खोलीवाली, मश्गुल – २१, अलग – २२, बेफिकीर – २२, सफेद – २३, पहाड – २३, गुल – २४, डोली –२४, झुल्फे – २४, पेहनीत – २६, हुकूम – २६, फर्माना – २६, घडी – २६, कफन – २६, नंगानाच – २६, कहानीतल्या – २७, अंदर की बात – २८, बातों बातों में – २८, चाँद तारा – २८, हुली – २८, दिवाबत्ती – २९, खुत्बा – २९, मन्नत – २९, सुंता – २९, जनानखान्यात – २९, बहाल – ३०, 'अल्ला हो अकबर...... काफरांचा नाश कर..... ३०, सजा – ३०, गुंबज – ३०, कबरी – ३०, शरम – ३३, जोश – ३३, तोहमत – ३४, विवाह – ३५, इलाज – ३७, तुफान – ३८, नहाण्यात – ४०, पकवत – ४१, दौलत – ४१, कचरा – ४१, शादीबरोबर – मुस्लिम – ४२, किताब – ४२, इमान – ४२, शयनगृहात – ४३, आमेन, जुती – ४३, बडे – ४४, खुद्द – ४६, फकीर – ४६, दर्गा – ४६, 'केरळ गोमंतक एक है – ४७, मुल्ला – ४८, खानदानी – ४९, लुटारू – ४९, बिनापाणी – ५०, बिनाखत – ७०, बेफाम – ७०, महकुमरि आवा – ७०, ताशेमोक्कर – ७०, कायदे आझम – ७१, मोहल्ले – ७१, अहिस्ता – ७१, बदनाम –

१२, दिलचस्पी – ७३, पुराना, नया – ७३, दुवाई – ७३, खुदकुशी – ७४, झुमके – ७४, भुलभुलैया – ७४, 'बैठिये जनाब, तशरिफ लाईये' – ७५, 'ला इलिल्लाह मुहम्मदूरल्लिलाह' – ७५, 'शुक्रअल्लाह' – ७५, फजर – ७६, जोहरा – ७६, असर – ७६, मगरीब – ७७, अंगूर – ७६, खास – ७६, शौक – ७६, बिछाना – ७७, जुम्मे – ७७, आलमारी – ७७, जिंदगी – ७७, बडे लाटसाहेब – ७७, तोहफा – ७८, दावती – ७८, अजब – ८०, फासेखाना – ८४, हरम – ८४, शुतूर – ८४, पतला – ८४, कटोरा – ८४, आलेकुम सलाम – ८४, प्यास – ८६, मिट्टीसमान – ८६, जबरदस्त – ९१, प्रहार – ९२, मुलुख – ९५, हमलोग – ९५, रेजिदोर – ९६, धागा – १००, मजनू – १०४, मजबूर – १०६, खानसामा – १०६, मामला – ११३, आँखे हल – १२२, अलग – १२५, गायब – १२९, हम दो.... हमारा एक – १४१, अलिशान – ३६, बेचली – ७२, शहनाई – १०६.

**आज इथे उद्या तिथे मधील संस्कृत शब्द :**

उषा पाणंदीकरांनी त्यांच्या वरील पुस्तकात संस्कृत शब्दांचा बऱ्याच प्रमाणात वापर केला आहे. शब्दांची, वाक्यरचनेची मोडतोड करून एका वेगळ्या स्वरूपात आपले अनुभव मांडण्याचा प्रयत्न लेखिकेने या पुस्तकात केला आहे. त्यांनी प्रवासवर्णनासाठी मराठीला जरी प्राधान्य दिले असले तरी संस्कृत शब्दांचीही सरमिसळ झाली आहे. हे शब्द जाणूनबुजून न वापरता तशी आवश्यकता असल्यानेच त्यांनी त्याचा उत्तमप्रकारे वापर केला आहे. लेखनाची नवीन शैली त्यांनी मराठी साहित्याला अर्पण केली आहे. ह्याविषयी एक मत असे, ''पुराणे व महाकाव्ये ही वस्तुत: मुळात साहित्य म्हणूनच अवतरलेली असली तरी साहित्य हे जेव्हा त्यांचा परत निर्मितीसाठी उपयोग करून घेत असते तेव्हा त्यांचा आणि

साहित्याचा संबंध हा इतिहास आणि साहित्य यांच्या संबंधासारखाच ठरतो.''[१९] हे वा.ल. कुलकर्णींचे विधान पुरेपुर साहित्याला लागू पडणारे आहे. संस्कृत भाषेतील शब्द जसेच्या तसे त्यांनी आपल्या प्रवासवर्णनामध्ये योजिले आहेत. तसेच पुराणे, महाकाव्ये यामधील दंतकथा, संदर्भ लेखिकेने प्रसंगपरत्वे, स्थळपरत्वे देण्याचा उत्तमसा प्रयत्न केला आहे.

**संस्कृत शब्द खाली दिले आहेत.**

प्रस्थान – ६३, आष्टांगाने – ६४, क्रौंच – ६४, सुजलाम – ६४, सुफलाम – ६४, प्रसवले – ६४, प्राक्तन – ६६, पदभ्रष्ट – ६६, अक्षौयणी – ६७, मुर्च्छित – ६८, क्षीर – ७२, हंस : श्वेतो बळ श्वेतो..... को भेदो बक हंसया । नीर क्षीर विवेक तू हंसो बक : बक : – ७२, अनलंकृत – ७४, गाग – ७४, जलोदभव – ७६, श्वान – ७७, गृहनौका – ७८, गणेशश्रध्दी – १०२, तत्रो हेच प्रचोदियात – १०४, देशाटण – १०४, आशिर्वचनपर – १०५, तृण – १०५, प्रक्षुब्ध – १०५, द्रव्य – १०६, स्वास्थ्य – १०६, अंतर्धान – १११, घटिका – ११७, मुहुर्त – ११७, सुखकर्ता, दुखहर्ता...... दुर्गे दुर्घट भारी – ११९, भव्यता – सुक्ष्मता – १२७, आराधनागृह – १२८, नर्तन – १२८, नर्तिका – १२८, परिभ्रमण – १२९, अश्व – १३०, अस्तंचल – १३०, जनन – १३१, पद्मावर–१३१, पदलोचन – १३१, पद्ममुखी – १३१, प्रात:काळी – १३१, विभ्रम – १३१, धर्मपद – १३१, द्रेष्टा – १३३, उषा – १३३, प्रत्युषा – १३३, दारूब्रम्ह – १३५, बंधुद्वय – १३५, नंदीघोष – १३५, चतुरायन – १३६, नि:शंक – १३६, राजइंद्रप्रद्युम्न – १३६, भित्तरेच्छ महापात्र – १३७, कर्पुर – १४१, पुष्प – १४१, मर्दल – १४१, संवर – १४१, चतुर्भूज – १४२, अष्टग्रह शिरोभूषण – १४४, ध्वज– १४४, सृजनकार्य – १४५, निषिध्द – १४५, प्रियदर्शिनी – १४०, अनिष्ट –

१४६, स्थितप्रज्ञ – १४७, निष्पन्न – १४७, शस्त्र – १४६.

**'देखणी दक्षिण' : संस्कृत शब्दांचा वापर**

उषा पाणंदीकरांच्या वाचनाचे प्रमाण अफाट आहे. त्या त्यांच्या प्रवासवर्णनामध्ये जास्तीत जास्त प्राचीन पुराण, कथा, संस्कृतमधील संदर्भ देतात. त्यामुळे इतर भाषेबरोबरच संस्कृत शब्दही खूप आले आहेत. संस्कृत शब्दांचा प्रवासवर्णनामध्ये येण्याचे कारण शोधले तर लेखिकेची वाचनाची बैठक ही संस्कृत हीच जास्त प्रमाणात आढळते. तरीही संस्कृत शब्द आले आहेत म्हणून प्रवासवर्णनाला कुठेही बाधा आलेली नाही. उलट प्रवास वर्णनाला सौंदर्य प्राप्त झाले आहे. प्रवासवर्णनाच्या वर्णनास आणखीनच लालित्य प्राप्त झाले आहे. यासंदर्भात ''जीवन हाच साहित्याचा शाश्वत विषय आहे. ह्या विषयाला गवसणी घालण्यासाठी जेव्हा जुनी, प्रचलित भाषा अपुरी पडू लागते तेव्हा साहित्यिक नवीन प्रयोग करून जुन्या भाषेला नवीनरूप व सामर्थ्य देत असतो. हे कशासाठी तर जीवनाचे जे अत्यंत अभिनव, जटिल, गूढ अविष्कार साहित्यिकाला जाणवतात. त्यांचा समाजाला अनुभव यावा म्हणून –'' [२०] ह्या विचाराचा संपुर्ण प्रभाव उषा पाणंदीकरांच्या लेखनावर असल्याचे सातत्याने जाणवत राहते. 'देखणी दक्षिण' पुस्तकात आलेले संस्कृत शब्द : कृतघ्न – १०, नृत्य – १०, मातृ – १०, कृष्णयजुर्वेदाची – १०, वैडुर्यमण्यासारखा – ११, दृष्टी सौख्य – १३, सस्यशामला – १३, हस्ते – १३, वंदन – १४, वर्ण – १४, अरिष्ट – १५, पौरूष –१५, कमलायन – ११, कमलेक्ष – १७, कमलकिरीट – १७, द्वारपाल – १७, प्रलय – १८, कंकण – १८, कुंडल – १८, कृतार्थता – १८, सौम्य – १९, प्रसन्न –१९, शीतल – १९, विभ्रम

– २१, स्फटिकयुक्त – २३, क्षम्य – २५, मोक्ष – २६, क्रीडा – २६, बीभत्स – २८, व्याघ्र – ३०, लक्ष – ३१, पदभ्रष्ट – ३२, वृंदावन – ३३, व्रतस्थ – ३५, स्वैर – ३५, मूत्र – ३५, स्तंभित – ३६, सार्थ – ३६, अंतर्धान – ३६, उदक – ३६, उग्र – ३८, रौद्रभीषण – ३८, स्मिमित – ३८, निर्मनुष्य – ३९, पदस्पर्श – ३९, पादत्राणे – ४०, वृक्ष – ४०, संहार – ४०, प्रदूषण – ४०, सुजलाम सुफलाम – ४१, प्रजा – ४२, शेष – ४१, सद्याय – ४३, ताम्रपट – ४३, प्रवचन – ४३, दोषानम – ४४, अद्वैत – ४४, विघटन – ४५, सृष्टी – ४५, मातृत्व – ४५, प्रजोत्पत्ती – ४५, शिरच्छेद – ४६, 'यदा यदा हि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत.... अभ्युत्थानम् धर्मस्य.... तदात्मानं सुजाम्यहम्......' – ४८, अनर्थ – ४८, भक्ष्य – ४९, अभ्यंगस्थाने – ५०, प्रित्यर्थ – ५१, कलंक – ५१, स्त्रोत्र – ५४, कुर्म – ५८, वराह – ५९, गृहस्थाश्रमी – ५९, क्षुद्र – ५४, अजस्त्र – ६६, सहस्त्र – ६६, दुर्बल – ७४, प्राक्तन – ७५, कालाय तस्मैनम : ! – ७५, लाख – ७७, निर्माल्य – ७७, नैवेद्य – ८०, स्थितप्रज्ञ – ८१, अमृतवल्ली – ८७, प्रगल्भ – ८८, ध्वनी – ८५, ॐ प्राणाय स्वाहा; ॐ अपानाय स्वाहा; ॐ व्याना स्वाहा; ॐ उदाना स्वाहा; ॐ ब्रम्हणे स्वाहा – ९५, त्रैलोक्य – ९७, वार्धक्य – १००, आर्द्रता – १०३, वक्रतुंड – १०४, लंबोदर – १०४, गलितगात्र – १०४, गतप्राण – १०४, स्तुती – १०४, अनुज्ञेशिवाय – १०४, स्मरले – १०४, निर्सन – १०५, स्तंभ – १०६, उत्खनन – १०६, पाषाण – १०६, निर्वाह – १०६, कमलनयन – १०६, निरिच्छ – १०७, सर्वभक्षी – १०७, क्रुर – १०७, मत्सर – १०८, प्रतिष्ठा – १०८, मस्तवाल – १०८, औदार्य – १०८, देवत्व – १०८, दानव – १०८, मोह – १०८, अहंकार –

१०८, व्देष – १०८, दुर्गुण – १०८, दैत्य – १०८, कृत्य – १०८, अर्पण – १०९, आम्रवृक्ष – १०९, परिमल – ११०, लेप – ११०, सम्राट – ११०, गलिच्छ – ११०, पुनर्स्थापन – ११०, पीठाधिश – ११०, सर्वस्व – ११०, पुरुषार्थ – १११, उःशापाला – १११, प्रदर्शन – १११, अगाध –११२, दृश्य – ११२, अजस्त्र – ११२, पुरस्कर्ता – ११२, कलासक्त – ११३, कर्तृत्व – ११३, अनलंकृत – ११४, साम्राज्ञी – ११४, द्वारपाल ·· ११४, तृतीय – ११४, ध्यानस्थ – ११४, उत्कृष्ठ – ११४, तपस्या – ११४, आत्मबलिदान – ११६, कृतार्थ – ११६, वृधा – ११९, पटल – ११९, शोक – ११९, भ्रम – ११९, उत्क्रांती – १२०, कर्मण्येवाधिकारस्ते – १२०, आध्यात्मिक – १२०, स्मित – १२०, मृगजिन – १२०, वसुधैव कुटुंबम – १२२, तांडवनृत्य – १२३, त्रैलोक्यजननी – १२३, प्रदोषकाली – १२३, साध्य – १२३, मुद्रा – ,पदन्यास – १२३, जीर्ण – १२३, भुर्ज पत्रावरील – १२७, 'करूनी पर्यटन, मनुजा चातुर्य येतसे – १२७, धन्वंतरी – १२७, गर्भगृह – १२८, स्तब्ध – १२९, क्षुधा, तृष्णा, वसती, नित्यकर्म – १२९, दर्या – १३०, दशग्रंथी – १३१, दशकंठी – दाती, तृण – १३१, उत्कर्षाने – १३१, पौरोहित्य – १३१, दशासन – १३१, कंपायमान – १३१, धुमाक्ष्य – १३१, वज्रद्रष्ट – १३१, अवर्षण – १३१, वसंतक – १३१, कुंभहून – १३१, महानाद – १३१, क्षम्मवर – १३१, महाबल्लिळ – १३१, महापार्श्व – १३१, दूषणे – १३१, सक्त – १३१, ऱ्हास – १३१, शुचिर्भूत – १३१, पुलस्य – १३१, क्षुबुध्द – १३१, कलह – १३१, कर्मकांड – १३४, पर्यटन – १३४, कर्पुर गौर – १३४, सप्तमातृका – १३४, भस्मचर्चित – १३४, वैराग्य – १३४, तमालपत्र – १३६, मिथ्या

– १३६, अनुपम – १३८, स्वप्नील – १३९, उत्तेजन – १४० इत्यादी संस्कृत शब्दांचा वापर उषा पाणंदीकरांनी त्यांच्या प्रवासवर्णनात केला आहे.

**आज इथे उद्या तिथे मधील इंग्रजी शब्द :**

आज इंग्रजी भाषा अनेक क्षेत्रांना व्यापू पहात आहे. प्रत्येक नवीन तंत्रज्ञानामध्ये इंग्रजी शब्दांची नावे असतात. लेखिकेचे वाचन तसेच स्थळांना भेटी देण्याचे प्रमाण फारच विस्तारात्मक व व्यापक आहे. त्यामुळेच त्यांच्या लेखनात विविध क्षेत्रातून इंग्रजी शब्द आल्याचे जाणवत राहते. कधीकधी जाणूनबुजून तर कधी नाइलाजास्तव इंग्रजी शब्दांचा वापर केल्याचे जाणवत राहते. शैलीची व्याख्या करताना स्विफ्ट म्हणतो, "Proper words in proper places make the true defination of style." आज इंग्रजी भाषा वैश्विक रूप घेऊ पहात असली तरी सर्वच भाषा तिचा स्वीकार करतील असे नाही. मराठीच्या बाबतीत हेच खरे सत्य आहे. आधुनिकीकरणाचा कितीही विपरीत परिणाम झाला तरी मराठीने आपले स्वत:चे अस्तित्व हरवले नाही हे सत्य आहे. वरील पुस्तकात आलेले इंग्रजी शब्द खालीलप्रमाणे : सिझन – ६३, टॅक्सी – ६४, रेस्टॉरंट – ६४, ट्रॅक्स, ट्रॅक्टरस् – ६५, सॅटीन – ६५, व्हिक्टोरिया मेमोरिअल – ६७, प्लेग – ६७, Luis de cameos - ६७, This Pillar - ६७, सिमेंट्रीत – ६८, डॉक्टर – ६८, टी. व्ही. – ७०, Interest - ७१, मार्शल लॉ – ७१, बॉबकट – ७२, जॉर्जेट – ७२, मॉर्निंग डील– ७२, पेटंट – ७५, विंपिंग विलो – ७५, रेडिओ, d. Lux - ७८, पेंटींग्ज – ७८, फोन – ७८, कटलरी क्रॉकरी – ७८, वीक पॉईंट – ७८, कॅमेरा – ८६, ग्लॅडिओ – ८७, जाकीट – ८८, फोटोग्राफर – ८९, पर्सेस – ८९, टोस्टला – ८९, ट्राऊट – ९०, एक्सप्रेस – ९१, रिटारिंग रूम – ९१, ऑफिसर – ९१, प्लॅट फॉर्म –

९२, टॅक्सी – ९४, बल्ब – ९५, फाइल – ९५, ट्राम – ९५, इव्ह – ९६, स्केअर – ९६, गार्डन – ९६, Pedler, ppimp, Proslitute pick pocketers & police........९६, डेटी लिव्हर – ९६, कंडक्टर – ९६, बोटॅनिकलगार्डन – ९७, रोजवुडचा पियानो – ९९, गॅलरी – ९९, रॉयल – ९९, प्लॅनेटॉरियम – १०१, प्रॉटेस्टंट – १०५, टेंपल – १०७, ड्रॅगन – १०७, ब्लॅकहोल – १०८, green - १०९, Red Tank - १०९, 'Oh ! poet (1) Think that ever, If I were on death bed your songs would call me back to like' - ११०, स्टेशन – ११२, टी. सी. – ११२, पॉईंट – ११४, शुटिंग – ११४, बर्च हिलवर – ११५, पेन्सिल – ११६, Tiger hill - ११७, जीपने – ११७, दुर्बिणी – ११७ It is, over - ११७, कँटीन – ११७, गाईड – ११८, Anything is beautiful - ११८, Tibetian Refuee - ११९, Hill station - १२०, Step a side - १२०, सिस्टर – १२०, Teen ager - १२०, बुट, टाय – १२१, Confess - १२१, calf love - १२१, ऑब्झरव्हटरी – १२१, Himalayan Mountaineering - १२१, equipmen - १२१, Institute - १२१, Botanical - १२१, Zoological - १२१, पार्कात – १२१, सीटरिझर्व – १२२, सीटस् – १२२, बर्थवर – १२२, प्रोफेसर – १२२, रमिस्टर वेट – १२३, डायरिया – १२४, बेअरिंग – १२४, रिझव्हर्ड – १२५, लायब्ररी – १२६, बस सर्व्हीस – १२६, प्रायव्हेट – १२६, टुरिस्ट – १२७, Blak is beatiuful - १२७, Black pagoda - १३२, White pagodge - १४०, टॉऊन – १४१, कॅपिटल – १४१, लाऊड स्पीकर – १४१, पोल्ट्री – १४१.

**'देखणी दक्षिण' : इंग्रजी शब्दांचा वापर**

इंग्रजांनी भारतावर दीडशे वर्षे राज्यकर्ते म्हणून सत्ता गाजवली. ह्या सत्ता कालावधीमध्ये व आजपर्यंत भारतातील सर्वच भाषांनी इंग्रजीतील शब्दांचा स्वीकार केला आहे. काही शब्द हे इंग्रजीतील आहेत पण तेच शब्द आता प्रादेशिक शब्द बनून राहिले आहेत. उषा पाणंदीकरांच्या 'देखणी दक्षिण' या पुस्तकामध्येही याचे विपुल प्रमाण आढळून येते. इंग्रजीतून आलेले शब्द : टॉनिक – १०, रॉकेट – १२, 'What a waste of water !' – १२, टुरिझम – १८, 'Babi Shabi pouca difference' - १९, शॉपिंग – २८, 'The body of Tipu Sultan was found here' - 28, He-fought like a liger .......' २८, गव्हर्नर – ३२, फ्रेंच – ३३, इंजिनिअर्स – ३३, फुट – ३३, म्युझियम – ३४, फर्निचर – ३४, इटालियन – ३४, फरशी – ३४, पॅलेस – ३४, मार्बल – ३४, जिने – ३४, मेक्सिकन ट्री – ३५, फोटो – ३०, हॉटेल – ३६, यु ब्रुट – ३६, स्टँड – ३८, ड्रायव्हर – ३८, बोर्ड – ३९, बॅटरी – ३९, सायलंट व्हॅली – ४०, कम्युनिझम – ४१, में, सप्टेंबर , ऑक्टोबर, डिसेंबर – ४०, पॅलेस्टाईन – ४३, क्रॅगनोर – ४३, डच – ४३, पोर्च – ४३, ज्युइश सिनेगॉग – ४३, कॉरोनेशन – ४३, हॉल – ४३, रोजवुड – ४३, गॅलरी – ४३, old Pestament - ४३, चर्चेस – ४४, सेंट थॉमस – ४४, Cape of Good Hope - ४४, इक्झिशिनच्या – ४७, मेडिसिन – ४७, ट्रक्स – ४७, ४ पॉव्हर्टी – ५४, "The lady with of an....." - ५४, लॉंच – ६५, सिस्टर – ६५, कॉम्प्युटर – ६५, We hate Hitler - ७०, कल्चर्ड – ७४, कॅंटोनमेंट – ७०, ट्रस्ट, रेस्ट हाऊस – ७६, टीन – ७७, डॉलर्स – ७७, नोट – ७७,

ऑफिस – ७७, ड्रॉवर्स – ७७, कॅरेट – ७७, वेटपेपर – ७७, मॅफिस्टो – ८२, टोल – ८२, टिंग – ८६, चेक्स – ९०, हॉस्पिटल – ९०, चॉकलेट – ९३, फॅन्सना – ९३, फॅशन – ९३, चेक पोस्ट – ९५, आर. टी. ओ. – ९५, टेंपो – ९५, डोंट सिट्ट आँटी – इट इज बेडडा अंकल ! – ९७, ब्लू डायमंड ९८, गर्व्हनर – ९९, स्विमिंग क्लब – ९९, आईस हाऊस – ९९, पी. डब्ल्यू. डी. – ९९, पॅरीज कॉर्नर – १०१, थिऑसॉफिकल सोसायटी – १०१, लायब्ररी – १०२, लिटर्स – १०३, Delicacy - १०५, प्रिस्क्रिप्शन – १०५, वेटरला – १०६, ऑर्डर – १०६, ग्रॅनाईट – ११२, ॲल्युमिनियमचे – ११५, Liberte, Tranquilite, Equalite - ११७, Veil - ११७, बूट – ११७, स्टॉकिंग – ११७, स्वेटर – ११७, Rip van-Winkle - ११७, Aqui & portugal - ११८, Bonjour - Nonsieur - ११८, Conment vous, portez vous - ११८, नेटिव्ह – ११८, बॅरिस्टर – ११८, सूप – ११८, सॅलेड – ११८, सर्व्ह – ११८, सिटी ऑफ डॉन – १२२, Microfile - १२७, ग्रँड ॲनिक्ट – १२९, स्कार्प – १२९, लिपस्टिक – १२९, हनिमून – १२९, बॅग – १३९, मॉड – १३९ स्वेटर्स – १३९.

**आज इथे उद्या तिथे मधील कोकणी शब्द :**

उषा पाणंदीकर या गोमंतकीय आहेत. त्यांच्या प्रवासवर्णनासाठी त्यांनी मराठी भाषेचा अवलंब जरी केला असला तरी त्या आपल्या मायबोलीला विसरल्या नाहीत. त्यांनी त्यांच्या दोन्ही प्रवासवर्णनांमध्ये गोमंतकीय भाषेचा अवलंब केला आहे. गोमंतकीय शब्द त्यांनी अधून मधून उद्गावरून प्रवासकथनात समाविष्ट केले आहेत. तसेच त्यांनी

तेथील प्रादेशिक म्हणींचाही मोठ्या चतुराईने वापर केला आहे. कोकणी शब्द कळायलाही बऱ्याचवेळा वाचकवर्गाला अडचण येते. काही शब्दांचा अर्थ कळत नसल्याने नाइलाजास्तव वाचकाला अर्थ कळण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. त्या शब्दांचा अर्थ पडताळून पहावा लागतो. कोकणी न येणाऱ्यास ही मात्र अडचण पुस्तक वाचत असताना जेव्हा जेव्हा असे शब्द येतात तेव्हा अशी अडचण भासते. या पुस्तकात आलेले

**कोकणी शब्द : भूतलावरचा स्वर्ग**

गावार म्हाळ – ६८, कांगडी – ७६, वड्या–आम – ७७, सुंगटाच्या – ७७, किल्लुसाणी – ७७, आमसोलाना – ७७, दरबटाणी – ७७, तेफळाना – ७७, हरबटसाणी – ७७, वळणुट्टाणी – ७७, गुट्टाणी व आम्मटाणी – ७७, कंडम – ७८, कहावा – ८०, नाखवा – ८१, वल्हव – ८१, मयणोळी – ८६, बंगलगुणस – ८८, जिजुड – ८८, हंगुळ – ८९, 'दर्याच्या देगेरे रूप्याच्या वेळेर – ९०.

**कलकत्ता : एक आनंद यात्रा**

'घे ते फळ घाल........ ना जाल्यार कांदो घाल' – ९४, आम्ही तुमी एका– ९४, इश्वाकू – १००, सुशेगात – १०१, छांछडा – १०१, खाजे – १०१, रान्ना घरात – १०२, उप्पाट – १०२, अलिपना – १०२, जमाई षष्ठी कथा – १०२, चल्याला – १०२, टुकीखुकी – १०२, राव गे माच्चर ! सुशोगात करूया ते !..... – १०२, कदला, मनसा, जांभुली – १०३, अवसर – १११, 'आरे गॉड ना म्हणून गॉडासारखे उत्तरयना – ११३, दोरजे – ११५, ओबीत – ११६, फुलांची घाटो – १२१, सासाय – १३६, सुंकले – १४१, कुवऱ्या – १४१, देऊल – १४१, नरबिडाल – १४३, बिडाल – १४३, ललितेंदू – १४४, डुग्गी – १४४, चंड – १४६.

**'देखणी दक्षिण' : कोकणी शब्दांचा वापर**

उषा पाणंदीकर या ज्या प्रादेशिक विभागात राहतात तेथील त्यांची भाषा कोकणी आहे. मराठीचीच उपभाषा असून कोकणीनेही स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. तिची स्वत:ची अशी खास बोलण्याची लकब, शैली आहे. यासंदर्भात मिलिंद मालशे म्हणतात, ''वास्तवाचा अनुभव घेण्याच्या क्रियेमधील एक कार्यरत घटक म्हणून भाषा वावरते; 'वास्तवा' च्या मानवी अनुभवाला घाट देण्याचे कार्य भाषा करीत असते. एका अर्थाने भाषेबाहेर 'वास्तव' बदलते. मानवाच्या जाणिवा, भावना, आचार–विचार, दृष्टीकोन, रूढी–परंपरा यांच्यावर भाषेचा खोल परिणाम घडत असतो, हे सपीर – वोर्फ यांच्या सिध्दांताचे प्रमुख सुत्र आहे.'' [२१] भाषेमुळे मानवाच्या अनुभवात असा बदल होतो ? वास्तव अनुभव भाषा कशी व्यक्त करते याचे सुंदर विवेचन मालशेंनी केले आहे. आपले अनुभव एकाच भाषेतून व्यक्त केले तर साहित्यात सारखेपणा जाणवतो. पण तीच कलाकृती इतर भाषेतील शब्दांचा वापर करून साकारली तर रसिक वाचकाला वाचणात आणखीनच रूची व नवीन शब्दांची ओढ व जाणून घेण्याची इच्छा प्राप्त होते. इतर भाषेची ओळख काहीशा प्रमाणात होते. आपल्या व इतर भाषेमध्ये काही सारखेपणा वा वेगळेपणा आहे हे शोधण्याचा प्रयत्न सुज्ञवाचक करीत असतो. अशा वेगळ्यावळणावरील केलेला प्रयोग हा साहित्यात स्वत:चे वेगळेपण दाखवून देतो. स्वत:ची खास शैली तयार यामुळेच होते. 'देखणी दक्षिण' या पुस्तकात आलेले कोकणी शब्द : वॅळ – १०, ताई गिता बंदू विल्ला – १०, मचूळ – १०, निद हॅग उदीर – १२, शिट्रूक – १९, स्वामी बा दुडू – २३, दोड्डाबेटा – चिक बेट्टा – २५, गुळ्ळे कायजी – २७, ऑळशिक – २५, हुली – २८,

३३, पिसलाती – ३३, भेरूंड – ३३, पडाव – ३९, पनेळ – ३९, रेंदेर –४०, पाडेली – ४०, वाळक्कड – ४०, परबीकुलम – ४०, (चेरियर, चलकुडी, पेरियर, पंपा – नद्या) ओणम् – ४१, इलम् – ४१, आरूद – ४२, शहाळी – ४३, मॉपिटलाय –४२, पझमतील – ४२, बेने इस्त्रायल – ४२, सद्याय – ४३, माचुल – ४३, धूळभेट – ४३, सोय – ४५, यल्लु – ४५, कायरा – ४५, कुरूवेप्पु – ४५, कुरूवा – ४५, तता – ४५, थरवाड – ४५, पुडवे – ४६, अगुरू – ४५, संपन – ४७, पायस – ४७, पडी – ४७, दुकळे ४७, काणे – ४७, कामोतीम – ४७, इगर्जीची – ४८, 'आंग मुजे चोय....पुण....' – ४८, चॅडी – ४८, 'आमोद सुवासी' अवे पडवे – ४९, मुंडू – ४९, बावून – ४९, धुवेला – ४९, न्हाण – ४९, आयतारा – ४९, अंदुळवारा – ४९, पिसूडल्यावर– ४९, वरड – ४९, भरड – ४९, दिवळेक – ४९, धाकले – ४९, इडले – ४९, वेल्लिकल्ली – ५०, यवोदक – ५०, पुयर – ५३, काउस – ५४, दिवली – ५४, थिय्या – ५५, पुल बक्कम – ५५, पुआ डियमल – ५५, ओणतप्प्या – ५५, उरकाय – ५५, मुंडकार – ५५, कुट्टीययान ओवाळे – ५५, कट्टनाद – ५५, पंतुकळी – ५५, सर्ती – ५५, मन्मटा यणपती चेनम – ५९, शिरवळ्या – ५९, वळेसर – ५९, भायर – ५९, पाडसावरचा कुंवाळा – ६०, शुचि – ६०, स्थाणू – ६०, पासरीभर – ६२, मेखला – ६३, अवनीमुलम – ६७, शुक – ६७, छोक्कालिंगम – ६९, मोष्कर – ७०,चांदवो चांदणे – ७४, कपाली – ७९, शुतूर – ८४, पतला – ८४, करोरा – ८४, बुरगट्टू – ८४, पनकल – ८५, पनक – ८५, व्यंका – ८९, कटा – ८९, रंगनायकुल – ९०, कवंडळ – ९१, बाणीर बोट – ९५, घृतम – ९५, कऱ्यांतु – ९६, जिरंतु – ९६, रेजिदोर – ९६,

पायसम – ९७, कोलम – ९८, हरमल, बागा, कळंगुट, कोलवा, मार्जोर्डा, कासवल्ली, पाळोले–गोमंतक – ९९, अडियार – १०२, अड्चार – १०२, हुमण – १०६, पानगुनी – १०९, वेलू – १११, चिट्ठुकरी – ११२, इतलो कोको, इतले मेमे – ११८, शर्वाणी – १२३, मृडानी – १२३, मार्गली – १२४, भगूल्या – १२५, आमोरॉ – १३६, धेंगान वाडलो – १७६, कोडाय – १३८, कुरूंजी – १३८, किचमीत – १४०, तोखणायेन – १४१.

**आज इथे उद्या तिथे मधील हिंदी गाणी :**

'देखणी दक्षिण' या पुस्तकामध्ये ज्याप्रमाणे हिंदी गीतांचा वापर केला आहे त्याप्रमाणेच याही पुस्तकात काही हिंदी गीतांचा वापर लेखिकेने आपल्या मनातील भाव–भावनांना वाट करून दिली आहे. प्रत्येक क्षणी त्यांची मनस्थिती कशी बदलते त्यांच्या खोल मनपटलावर तेथील स्थळाचा कसा परिणाम होतो त्यांचे मन मग हिंदी गाण्याचा आधार घेऊन गाताना दिसते या पुस्तकात आलेली हिंदी गाणी चित्रपट सृष्टीतील असून त्याचा त्यांनी आपल्या दोन्ही पुस्तकात छानसा वापर केल्याचे दिसून येते.

**पुस्तकात आलेली हिंदी गाणी :**

१. परदेमे रहने दो । पृ. ६९.

२. बार बार देखो – हजार बार देखो, ये देखने का है । पृ. ८२,

३. कश्मिर की कली हूँ। मुझको ना रूको बाबुजी ! मुरझा गई तो फिर ना खिलूँगी कभी नही, कभी, कभी नही जी पृ. ८३.

४. 'लाल लाल गाल..... गाल तेरे । पृ. १४४.

**देखणी दक्षिण मधील हिंदी गीतांचा वापर :**

उषा पाणंदीकर जेव्हा लिखानात मग्न होतात तेव्हा त्या स्वत:चे भान हरवून जाताना आढळून येतात. त्यांचे लेखन वाचताना एका निरागस बालकाचा प्रत्यय येतो. लहान बालिश बालक जसे आपल्याच विश्वात मग्न बागडत असते. तसे उषा पाणंदीकरही आपल्या मनात जे विचार तरंग येतात त्याला मोकळेपणाने वाट करून देतात. शांत पाण्यात हळूच दगड पडल्यानंतर जसे तरंग निर्माण होतात. तसेच तरंग उषा पाणंदीकरांच्या निरागस मनात उमटतात. ते अंतरंग मनातच रहात नाहीत तर ओठावरही नाजूकपण प्राप्त करून देतात. गीतांच्या विचाराविषयी बहिणाबाई म्हणतात ''अरे घरोटा घरोटा, तुझ्यातून पडे पीठी, तसतसं माझं गानं, पोटातून येतं व्होटी'' त्यांच्या गाण्याचं नातं हे जगण्याशी संबंधित आहे.

ह्या संदर्भात दि. पु. चित्रे म्हणतात, ''गीतकाव्य हे गातां येण्यासारखे असते, असें म्हणताच त्याची खास रचनात्मक वैशिष्टे ध्यानात येतात. एकतर ते पद्यरूप असले पाहिजे; जरी त्याची रचना मुक्त असली, तरी मुक्त संगीतरूपाशी त्याची सांगड घालता आली पाहिजे. बीटल्स किंवा बॉब डिलनसारखे गायक गातात ती गाणी म्हणजे आजची गीतकाव्येंच होत. हिंदी चित्रपटात अनेकदा चांगली गीतकाव्ये आढळतात. काव्य आणि संगीत या दोन्ही कला अत्यंत लवचिक आहेत, हे मान्य करताच गीतकाव्य हा प्रकार सांकेतिकच आहे. असें नाही, हे कळून येते.''[२२]

**देखणी दक्षिणेमध्ये आलेली गाणी :**

१. निल गगन के चले, धरती के प्यार तले, ऐसे ही जगमें पृ. १२

२. ना मारो पिचकारी पृ. १९

३. मुझे मालूम है... मैं शराबी नही पर कोई पिलाये तो मै क्या करूँ ? पृ. ३३

४. फुलों से ....... कलियों से तेरी माँग भर दुँगा पृ. ५३

५. कभी – कभी बैजूबान परबत कहते है । पृ. ५६

६. सैय्या झुठों का बडा सिरताज निकला। पृ. ६३

७. हम काले है तो क्या, दिलवाले है....... हम तेरे तेरे चाहनेवाले है। पृ. १३६

८. जिंदगी एक सफर सुहाना..... यहाँ कल क्या हो किसने जाना। पृ. १३९.

**आज इथे उद्या तिथे मधील : संवाद**

संवाद हा खरं तर नाटकातील अत्यंत महत्त्वाचा घटक असला तरी संवाद हा घटक इतरही ललितसाहित्य प्रकारात वापरात येणारा घटक आहे. संवाद लेखनामुळे लेखनाला वस्तुस्थिती प्राप्त होते. संवादामुळे व्यक्तींची ओळख होऊन त्यांच्या तोंडून निघालेल्या संवादातून तेथील परिस्थितीचे चित्रण तर येतेच त्याबरोबर त्या व्यक्तींची मानसिकस्थिती व त्यांच्या मनातील भावतरंग समजून येतात. प्रवासवर्णनाला गतिमानता देण्याचे कार्यही संवादामुळे नकळतच साधले जाते. प्रवासात आलेल्या व्यक्ती हरतऱ्हेच्या असल्याने बौध्दीक विकासाबरोबरच त्या परिसरातील बारकावे विशेष कळून येतात. या पुस्तकात जे संवाद आले आहेत त्याचा विचार खालीलप्रमाणे.

हिमालयाचा प्रवास सुरू होता तेव्हा एक लहानसा गाव लागला. तेथे बेलफळाचं लिंबू घातलेलं सरबत मिळत होतं. विक्रेता त्याचा खास असा आवाज काढून लेखिकेला म्हणतो, ‘ओ ! बेहेनजी ! अरी ओ दिदीजी ! पिजिये ! सरबत पिजिये !’ ते पाचक असते. ते गुणकारी आहे. त्यामुळे तुम्हाला पहाडांतला प्रवास बाधणार नाही. अशी फायद्याची अनेक अमिषे दाखवतो. पृ. १४.

एक गोसावी लेखिकेला आक्रोश करीत होता. शिवजीका दर्शन लो ! ओ आपका भला करेगा. हरीव्दारला एक पंड्या लेखिकेच्या मागे होता. गंगेची पूजा करण्याबद्दल तो एकसारखा विनवीत होता. बाबुजी गंगा अपनी राह देखती है। तर दुसरीकडे चार पाच मुलं लेखिकेला सांगत होती. आम्हाला भिक्षा नको आम्हाला शिकण्याकरता पुस्तकांना पैसे हवेत. एकूण त्यांना पैसे नको होते ना ! त्यांच्या पुस्तकाची नावे लेखिका लिहून घेते. त्यांचे पत्तेही लिहून घेते. पृ. १५.

कुमाड प्रदेशातल्या आदिवासीचे म्हणणे होते, 'तुम्ही बंदुकीच्या जोरावर झाडे तोडू शकता पण आम्हाला मारून आम्ही जीवंत असेतो झाड नाही पण पानालाही हात लावू शकणार नाही.'' पृ. ३२, ३३.

लेखिकेच्या बरोबर एक बाई प्रवास करीत होती ती अजस्त्र पहाड व मरणकाळची शांतता पाहून घाबरून जात. भीती वाटू नये म्हणून भजन करीत असे. आणि हा ! हा ! भाईसाब आप तुम बोलो बेहेनजी तुम गाओ' म्हणून सगळ्यानाच आग्रह करीत सुटे. पृ. ३३,३४.

एक लंगडा भिकारी लेखिकेजवळ 'आई ! कुछ दे दो' म्हणत भिक्षा मागू लागला. श्रीयुत पाणंदीकरांनी पैसे त्या भिकाऱ्यास दिले पण ते पैसे फेकून म्हणतो ' मैं भिकारी नही हूँ । मैं शिवाजीका गण हूँ' मी तुम्हाला शापून टाकीन. तुम्ही हनुमान चट्टी रितसर कसे उतरता ते मी बघतो. त्याला लेखिकेने घातलेला कोट थंडीपासून बचाव करण्यासाठी हवा होता. म्हणून तो एवढा संतापला होता. पृ. ३९.

पुरीतील एक प्रसंग सांगीतला आहे. एका अवाढव्य पाचुंदीभर मिशांचा धुंद

लाल डोळ्यांचा एक बिहारीबाबू..... सिनेमातल्या जमीनदारासारखा कोचावर बसला होता. लेखिका दचकून मागे येतात. तो लेखिकेला म्हणतो. 'बेहेनजी घबराईये मत ! आपण सर्व देवाच्या व्दारी आहोत. तुम्ही माझ्यापासून कसलीही भीती बाळगू नका. इथे पाप होणार नाही.' पृ. ४०.

केदारनाथ मधील एका लहानशा हॉटेलमधील चपाती भाजणारा तो वृध्द म्हणाला 'बेटा ! साऱ्या जगाचे पाप धुणारी गंगा इथे आहे. वर डोंगरावर केदारबाबा बसला आहे. आम्ही अभक्ष्य कधी बघितलेच नाही. 'प्याज' सुध्दा आम्ही खात नाही. तू कसलाही संशय न धरता संकोच न धरता खा........ उपाशी पोटाने जाऊ नकोस,' पृ. ४०.

**मदनाचा बाजार :**

चंबळच्या खोऱ्याचे वर्णन करून साध्या साध्या कारणासाठी तेथील लोक बागी बनतात. त्यातील एक संवाद 'अरी ओ ठाकुरनी ! ओ तलसीराम बिरामन है।' ज्याचे पाप त्याला. मानसिंग तिला समजावीत असे. हे ऐकून बायको अधिक पेटून उठे. 'ठाकुरजी ! तुम्ही 'चुडिया' कां नाही भरत हो ! रावण कोण होता ? आणि त्याला मारणारा राम !........' पृ. ४५.

दोन मित्रातील संवाद. एक सहज म्हणाला मला एक उंट विकत घ्यायचा आहे. दुसऱ्याने जाता–जाता म्हटले कुठे ठेवशील ? तुझे मकान तर बिळाएवढे....... पहिल्याला हे साधे बोलणे खिजवून गेले. तो तिरकसपणे म्हणाला 'तुझी गढी तर मोठी आहे ना ! तिथे बांधीन भई !.....'

'मी बघतोच तू कसा बांधतोस ते ! मोठ्ठा आला आहेस तू उंट खरेदनेवाला !'

दुसरा तावातावाने भांडू लागला.

'अस्स ! मी बघतोच ! तू कसा नाकारतोस ते ! हा बघ मी उंट घेतला आणि तुझ्या मकानात नेऊन बांधला..... त्याच्या तळहातावर फुली मारीत पहिला उद्‌गारला.

दुसरा आता खवळला व घरी जाऊन बंदुक घेऊन आला. पहिल्याला गोळी घालून डाफरला 'आता कुठे ठेवशील उंठ ?' पृ. ४६.

लेखिका त्यांच्या वर्तनावरून विधान करतात बिहडाच्या जाळ्यासारखीच ही गुंतागुंतीची जाळी..... सोडवता गेलो तर अधिक किचकट होणारी......

एका शिल्पाचे वर्णन सुंदररित्या केले असून........... ते शिल्प एका सोळा सतरा वर्षाच्या मुलीचे आहे. ती स्नान करीत असावी. तिच्या तोंडचे उद्‌गारही लेखिका आपल्या कल्पक बुध्दीने नमूद करते. तिचा पदर खाली पडला आहे. ही पाय दुमडून मान वळवून आपल्याकडे पहाते. हिला आपण आलेले आवडत नाही. भुवया उंचावून ही विचारते कोण तुम्ही ? काय काम आहे तुमचे ? दिसत नाही ? मी इथे आंघोळ करते आहे. पृ. ५९,६०.

स्त्रीच्या सौंदर्याची विविध रूपे चित्रबध्द करून ठेवली आहेत. एक शृंगारलेली स्त्री दर्पणास म्हणते 'सांग दर्पणा कशी मी दिसते' हे विचारणारी रूपगर्विता आहे तर 'कसं सतावलं ग बाई ह्यानी सगळी रात्र' अनुरागाने म्हणत आळस झाडणारी सुस्त युवती..... आहे. तर एक सुंदरी तर्जनीवरच्या फडफडणाऱ्या पोपटाला विचारते आहे 'सांग कधी येणार ते ? पपिया पिया कहाँ है ?' व्याकुळ झालेली ही विरहंकिता.........' 'पायी रूतला काटा माझ्या !' स्त्य करीत काढणारी भूमिकन्या..... वाटते पृ. ६१.

**भूतलावरचा स्वर्ग :**

जालियनवाला बागेविषयी श्रीयुत पाणंदीकर सौ. पाणंदीकरांना म्हणतात, 'काय गं ! तुला या बागेचे महत्त्व नाही ? Interest नाही ? पृ. ७१.

जम्मूमधील नौकेचा पठाणी मालक लेखिका गोमंतकीय म्हणताच 'हां ! मेरी बच्चीको मच्छी खिलाऊँगा, मुर्गी खिलाऊँगा.' ही साखर पेरणी त्याने सुरू केली. पृ. ७८.

दुसरा त्याचा खानसामाकम मॅनेजर...... कोण जाणे ! तो काश्मिरी लोकांविषयी सांगत असे 'काश्मिरी लोगों की आदत अच्छी नही है...... दानत बुरी है । इसलिये ये लोग गरीब रहते है ।' पृ. ७९. जहाँगिराविषयी लेखिका लिहितात. पाकिस्तानमध्ये अनारकलीचा एक मकबरा आहे. म्हणतात..... त्याच्यावर या मजनू सलीम अकबरने अल्लाला शंभर वेळा साकडे घातले. अल्लाची शंभर नावे कोरून दुवा मागितला आहे. 'मला माझ्या प्रेयसीचे मुख पहायला मिळाले तर मी अल्लाचा कल्पांतापर्यंत ऋणी राहीन हेही तो म्हणायला विसरला नाही. पृ. ८४.

**कलकत्ता एक आनंदयात्रा :**

कलकत्त्यातील एका प्रसंगाचे चित्रण लेखिकेने केले आहे. ट्राममधील हा प्रसंग असून, ट्राममध्ये खूपच प्रवाशांची गर्दी होती. तरीही ट्राममध्ये प्रवासी चढतच होते आणि कंडक्टर 'आशुन आशुन बोशुन बोशुन' करतच होता. 'या या' बरं आहे पण 'बसा बसा' कुठे ! पृ. ९६.

सतीला सती जावी म्हणून लोक काही उपदेश, मंत्र देत असे ते असे, 'जगणे मरणे एकच........ शिवाय तू काही मरत नाहीस. तू तुझ्या पतीकडे जात आहेस. तिथे तुझे

पतीकडे पुनर्मिलन होईल. परत लग्न होईल. परलोकांत तुला नवीन वस्त्रे लेणे मिळेल......' आता फक्त तिने दागिने उतरवून आगीत जावे. पृ. १००.

कांचनगंगा पाहण्यावेळचा प्रसंग अफलातून होता. लेखिका तिथेच चहा घेता घेता दोन चार शेंबडी पोरे लेखिकेकडे गेली व एव्हरेस्ट कसा दिसतो कुठून दिसतो ते सांगू लागली. त्यांच्यापैकी एकजण धावत दोन झेंडूची फुले घेऊन आला. 'दिदी ये लो ! दिदी ये लो !' करून त्याने लेखिकेला दिली. पृ. ११८.

लहानपणी लेखिकेने वाचलेला एक चुटका सांगितला आहे. दोघा माणसांच्या हातात दोन पेले दाखविले होते. त्यातला एक रडत राऊत म्हणत होता, 'माझा अर्धा पेला रिकामा' या उलट दुसरा हसत हसत सांगत होता 'माझा अर्धा पेला भरलेला...... जे नाही त्याचा शोक तरी कां व किती करायचा ? पृ. १२७.

जगन्नाथ मंदिराचे लेखिका निरीक्षण करीत असताना कनोजी ब्राम्हण आपल्या वह्या काढून लेखिकेला म्हणू लागले, 'तुम्हाला गती मिळणार नाही. तुम्ही जहन्नमे जाल' पण आम्ही म्हणजे 'स्वर्ग नको, सूरलोक नको...... तृप्ती नको, मुक्ती नको, मज लोभस हा इहलोक हवा' असे म्हणणाऱ्या बाकी बोरकरांच्या जातीचे लोक ' पृ. १३८.

**'देखणी दक्षिण' : संवाद**

उषा पाणंदीकर यांनी प्रवासवर्णन लिहिताना त्यांना ज्या परिसरात व्यक्ती भेटल्या त्यांचे त्यांच्या ओहारापासून, पोशाखापर्यंत तसेच त्यांची संस्कृती यांचेही त्यांनी छान वर्णन केले आहे. जेव्हा जेव्हा काही व्यक्ती त्यांच्या संपर्कात येत तेव्हा त्या व्यक्ती लेखिकेशी संवाद साधत. ह्या संवादामुळे प्रवासवर्णनाला आणखीनच जीवंतपण लाभले

आहे. प्रवासवर्णन करताना ज्या व्यक्ती भेटल्या त्याही लेखनात वेग आणतात. तसेच तेथील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिकतेचे दर्शन देऊन जातात. ह्या संदर्भात सुध्दा जोशी म्हणतात, ''संवादाचे प्रमुख प्रयोजन हे पात्रनिर्मिती हे होय. पात्राचे व्यक्तिमत्त्व, त्याचा सामाजिक/ सांस्कृतिक स्तर, त्याची विशिष्ट मन:स्थिती, भावस्थिती यांची प्रचिती संवादातून येते. अशाप्रकारे संवादातून प्रत्यक्ष पध्दतीने पात्रचित्रण साधले जाते. म्हणजे संवाद हे पात्र निर्मितीचे नाट्यात्म साधन होय.''[२३]

**'देखणी दक्षिण' मधील संवाद :**

लेखिकेच्या बरोबर एक आदित्य भास्कर नावाचे एक बंगाली गृहस्थ होते. हे जोडपे डोलीत होते. गोमटेश्वराला जातानाचा हा प्रसंग असून, पुढच्या प्रवाशांना डोल्या घेऊन जाताना बसलेल्या आदित्यांना घेरी यायला लागली. त्यामुळे अर्ध्या वाटेत ही डोली दुसऱ्या प्रवासिनीला मिळाली. तेव्हा त्या प्रवासिनीला अतिशय आनंद झाला आणि तिने तिथेच 'जय गोमटेश्वरा.....' नव्हे, 'जय भास्करा' म्हणत नमस्कार घातला. पृ. २४

दोन मित्र होते, त्यांच्यातील उद्‌गार एकजण किर्तनाला जातो दुसरा देवळाच्या शेजारच्या घरात नर्तिकेच्या नाचाला जातो. जो किर्तनाला गेला होता, तो म्हणत होता, 'आपण उगीच ही बाशकळ बडबड ऐकून घेत आहोत.कुणी पाहिला आहे उद्याचा जन्म, मोक्ष ? आजची घडी महत्त्वाची. आला क्षण भोगावा हेच खरे ! मीही तिथे जायला हवे होते.'

तर दुसरा चुटपुटत होता, 'कुठल्या क्षणिक सुखासाठी आपण वासनेची शिकार होऊन बसलो. आयुष्यातील सुंदर क्षण आपण कुरूप करून टाकले.' पृ. २६

आफ्रिकेतल्या नायजेरियाजवळचे 'आनावारिक' हे आदिवासी नागडे-उघडेच हिंडायचे आपले सर्व काम हे उघड्यानेच करावयाचे तेव्हा वरून हुकूम आला. समजावणी आली. पण जनता संतापली, असंतोष माजला आणि जनतेनेच सरकारला ठणकावून सांगितले, 'नग्नता ही आमची संस्कृती, तो आमचा धर्म, तो आमचा हक्क. त्यांच्यावर आम्ही गदा आणू देणार नाही. सरकारची ही दडपशाही आम्ही मानणार नाही, सरकारला हा नंगानाच, हे वाकडे पाऊल आम्ही घालू देणार नाही.' पृ. २६

प्रवासात काही ठिकाणी जेव्हा पाणी मिळत नाही. त्यावेळी प्रवाशांची काय अवस्था होते हे सौ. आदित्य त्यांच्या संतापातून व्यक्त होते. त्या म्हणतात, 'टाळ्याला काटे आले अगदी; पण पाण्याचा थेंबसुध्दा नाही. ती बडबडत होती. पृ. २७

टिपू सुलतान जेव्हा मरण पावला तेव्हा ब्रिटिशांनी त्याचा गौरव केला, 'He fought like a liger....' पृ. २८

कलिकत येथे टिपूचा सरदार फेरोक याच्या नावाचा वधस्तंभ आहे त्यावर लिहिले आहे 'जे जे मुसलमान होण्यास नकार देतात, त्यांच्याकरिता पृ. २९ टिपूने केलेला हिंदू व ख्रिश्नांचा छळ वरील संवादातून स्पष्ट होतो.

त्याचप्रमाणे टिपूच्या मृत्यूनंतर वेलस्ली यांना बहाल केलेल्या तलवारीवर हे शब्द होते, 'अल्ला हो अकबर...... काफरांचा नाश कर..... जे जे मुस्लिम होण्यास नकार देतात त्यांना सजा दे........ त्यांच्याकरिता ही तलवार तळपते आहे. आम्हांस साहाय्य कर.' पृ. ३०

एक पुरूष एक तरुणीला जेव्हा बोगनवेलीच्या आडोश्याला घेऊन जातो तेव्हा बोगनवेल शरमून लाल झाली, म्हणाली,

'मुझे मालूम है......मैं शराबी नहीं

पर कोई पिलाये तो मैं क्या करूँ ?' पृ. ३३

उषा पाणंदीकर जेव्हा प्राणिसंग्रहालयाकडे प्राणी पाहण्यासाठी जातात तेव्हा एक वाघीण माजाला आली होती. आपले मूत्र शिंपडीत 'तुमचे इथे काय काम ?' असे विचारत होती. पृ. ३

आपल्याकडील पोतराज हा श्रध्देचा व धार्मिक मानला जातो. पण परदेशी पाहुणे जेव्हा त्यांचा अवतार पाहतात तेव्हा परदेशी बाई नॅन्सी ओरडू लागते व म्हणते 'यु ब्रूट !' पृ. ३६

'लेखिकेची आत्या एक गोष्ट सांगत असे, तिच्या शेजारणीला (आत्याच्या) सून व मुलगी दोन्ही अंगे होती. दोघीही घरात असल्या म्हणजे लेखिकेची आजी विचारी, 'दोघा मुलींना न्हाऊ कधी घालतेस गं ?' 'हो' बाई अगदी खडीसारखी मिटक्या मारून सांगे, 'धुवेला न्हाण घालण्यास वेळ तरी मिळतो का ? तिला न्हाण घालते. या आयतारा...... त्या बुधवारा..... 'आणि सुनेला ?' आता आजी खोचकपणे विचारी आणि पुढे म्हणे, 'तिचे केस पिसूडल्यावरी दिसतात.' 'तिचे केस परत परत धुवावे लागतात. तिचे केस आहेत वरड, भरड, तुटके. तिला मी या धाकले दिवळेक..... त्या व्हडले दिवळेक न्हाऊ घालते.' पृ. ४९

राजा रविवर्मा यांनी सुगंधासाठी जे उद्‌गार निरोपाच्याबाबतीत काढले ते असे,

'मी तुझा कोणी नव्हतो

.......... आणि कुणी नाही

विसर सर्व घडलेले

विसर तू, मलाही........' पृ. ५५

'कोवालम् बीच' येथील एक प्रसंग चित्रित केला असून लेखिका त्या प्रसंगावर नाक मुरडतात. तेव्हा शेजारच्या डोगरांनी पाहिले व ते म्हणाले, 'का ? तुम्हाला याचा विटाळ आहे ? गोवा तर अशा पर्यटकांकरिता प्रसिध्द आहे.' पृ. ५६

एक अमेरिकन माणूस अमेरिकतल्या नग्न माणसांच्या गावाला भेट देतो व तो आपले अनुभव आपल्या मित्राला सांगतो. आपण एका घराकडे गेलो व बेल वाजवली. मोलकरणीने येऊन दार उघडले. 'पण ती मोलकरीण होती, हे तुला कसे कळले ?' मित्राने विचारले ! 'कारण तो गडी नव्हता !' तो म्हणाला.पृ. त्यांनी प्रवासात यक्षगान या लोककलेचा प्रकारही पाहिला, त्या संदर्भातील संवाद 'हाड रे संकासुरा, सवंग भायर.' पृ. ५९

एकदा दयानंद सरस्वती यांना एक माणूस भेटतो. तो आपल्या ऐश्वर्याच्या गोष्टी सांगतो, त्यावेळी स्वामी त्या गृहस्थाला जगाचा नकाशा दाखवून त्याचा अहंभाव काढून टाकतात त्याला उद्देशून म्हणतात. 'वेड्या ! जिथे तुला तुझा गाव सापडत नाही, प्रांत दिसत नाही, नकाशावर बिंदूसारखाही तो वाटत नाही, तिथे कुठल्या वैभवाची गाणी गातोस ? या विश्वात तू कुठे आहेस ? किती लहान, बेडकांच्या जगात राहतो आपण ! हे कळले ना ?' पृ. ६१

उषा पाणंदीकरांचे दूरचे आजोबा यांच्याबाबतीत घडलेला प्रसंग वर्णन करतात. ते एकदा खरेदीस दुकानात गेले आणि त्यांनी लुगडे बघितले. घासाघीस करायचीच..... तेव्हा त्यांनी दुकानदारास विचारले, ' हे लुगडे किती किंमतीचे !' दुकानदाराने उत्तर दिले, 'बाबू ' साठ रुपये'. 'साठ ?' आजोबा उद्‌गारले, 'पन्नासाला देतोस ?' त्यांनी विचारले. 'साहेब, साठ नाही. मी सात म्हणालो. 'विक्रेता म्हणाला, 'अस्सं.... ! सात, मग पाचला दे.' आजोबा बोलले. पृ. ६२

कन्याकुमारीला एकदा गांधीजी आले होते. तो विराट निसर्ग, भारतमातेचे ते चरणधुणारे तिन्ही सागर.... बापू भावनावश झाले आणि त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले..... 'इथेच राहता आले तर !.....' पृ. ६४

प्रवासात जॉयस – नॅन्सी नावाचे जोडपे हे फ्रँकफुर्टच्या शेजारच्या गावात राहत होते. रूडॉल्फ हिटलरविषयी लेखिका जाणून घेण्यासाठी प्रयत्न करतात पण त्यावर त्या दोघांची प्रतिक्रिया त्यांनी एका वाक्यात सांगितली. 'We hate Hitler.' पृ. ६५

उषा पाणंदीकर एका गावातील प्रथा सांगतात, एका गावात माणसाची ठराविक वर्षे उलटली की त्याचा मुलगा त्याला डोंगरावर नेऊन ठेवीत असे. त्याला अंथरुणास, पांघरुणास घोंगडी–कांबळं, थोडे जेवण–खाण व पाणी प्यायला एक लोटा जवळ ठेवीत असे आणि मुलगा परत येत असे.

एकदा एकावर डोंगरावर जाण्याची वेळ आली. वृध्द बापाने जाताना दोन दोन वस्तू घेतल्या. 'हे काय ?' मुलाने विचारले, 'दोन दोन वस्तू कशाला ?' 'मुला !' बाप

म्हणाला, 'उद्या तूही इथे येशील. येताना तू या गोष्टी न आणल्या तरी चालतील.' पृ. १९

नागार्जुन व कर्णार्जुन यांच्यातील संवाद खालील प्रमाणे आला आहे. नागार्जुन म्हणतो, 'हा, कर तुझ्या मनासारखे....' यात बुडव आणि चालव तुझी ती तलवार.' पृ. ८७

लेखिका एक लहानपणी ऐकलेली जावयाची गोष्ट सांगतात. एक जावई सासुरवाडीला जाण्यास निघतो. त्याचे मित्र त्याला सल्ला देतात, 'हे बघ, तू पहिल्यांदाच सासरी जातो आहेस. बुळ्यासारखा वागू नकोस. सासरची माणसे तुझे पाणी जोखतील. त्यांना जरब दाखव, भीती दाखव, अशा प्रकारची समज त्याला देतात. जावई जेव्हा पोहचतो तेव्हा घडलेला प्रकारही लेखिका नमूद करतात. पृ. ९०, ९१

लेखिकेने एका लग्नातील भट व त्याचा मुलगा यांच्यातील प्रसंग सांगितला आहे. दोघे बापलेक लग्न लावीत होते. त्या बापाच्या मनात होमहवनकरिता ठेवलेले तूप चोरण्याचा विचार आला. तो मंत्र म्हणत मुलाला शिटकावू लागला, 'मुला ! घृतम् चोरी....... घृतम चोरी.....! 'अण्णा ! कशांतु...... कशांतु ?' मुलगा भाबडेपणाने विचारू लागला. 'नव्या कऱ्यांतु कऱ्यांतु' बापाने समजावून सांगितले. 'नव्या कऱ्यांतु...... जिरंतु ?' मुलाने शंका काढली. 'नव्या कऱ्यांतु जिरंतु ! तुझ्या बापाचे काय सरंतु !.....' पृ. ९५, ९६

एकदा इथल्या दक्षिणेतला माणूस परदेशात गेला आणि तिथे एकाकडे जेवायला गेला. जेवल्यानंतर आवरता आवरता गृहिणीने गोष्टी सुरू केल्या, 'तुमच्याकडे तर नोकर असतात, तुम्हाला या बशा, ताटे धुण्याचा त्रास नसेल.' 'नाही !' तसं नाही,

आम्ही हा जंजाळ ठेवतच नाही, ' तो म्हणाला 'आम्ही जेवणाच्या प्लेटस् सरळ फेकून देतो.' 'अस्सं !' गृहिणी उद्‌गारली, ' तिथे इतकी श्रीमंती आहे ? इंडिया गरीब, गरीब म्हणून इथे उगाच नाके मुरडतात तर !' पृ. ९७

जेवणाच्याच बाबतीत पर्ल बकही एके ठिकाणी म्हणतो, ' हिरव्यागार केळीच्या लुसलुशीत पानावर स्वत:च्या हाताने जेवणे यासारखे सुख आहे का ? त्यावरचा तो पांढरा शुभ्र भात, ते पिवळे वरण, सांबार, टोमॅटोची लाल कोशिंबीर, तांबडी–हिरवी मिरची घातलेली ती बटाट्याची भाजी, डावीकडचा तो केशरी भात, हिरवा मसालेभात आणि लाल लाल अचार.... लोणचे, अमेरिकेत आपण चमच्याने जेवतो, चीनमध्ये बांबूच्या काड्यांनी; पण स्वत:च्या हाताने या पानावर जेवणे यासारखे सुख आहे का ? आणि स्वच्छता तरी....' पृ. ९७

प्रवासात लेखिकेच्याबाबतीत जेवणाविषयीचा प्रसंग, एके ठिकाणी जेवणात केळाची भाजी होती. खरे म्हणजे ती केळीच्या गाभ्याची भाजी होती. लेखिका वेटरला विचारतात 'यात केळी दिसतच नाहीत ? सगळ्या फोडी गाभ्याच्याच दिसतात. तुम्ही प्रमाण काय ठेवलेत ? 'एका केळ्याला एक केळीचा गाभा सर....' वेटर सांगू लागला. पृ. १०६

एकदा सत्य व असत्य या दोघी नहायला नदीवर गेल्या. दोघीही पाण्यात डुंबून घेता घेता सत्याने डोके वर काढले आणि पाहिले तर असत्य लगबगीने जाऊन वाळवंटात सत्याचे कपडे घालीत होती. 'ए ! तू चुकतेस ! तू माझे कपडे घालीत आहेस.' 'सत्याने वर येता येता सांगितले. 'नाही !' असत्य खदाखदा हसत म्हणाली, 'मी मुद्दामच

ते घातले आहेत. आता मला तू समजतील आणि तुझ्यात मला शोधतील.' पृ. १०८

एक मुलगी लग्नानंतर माहेरी आली व म्हणाली, 'आई, मी सुखात आहे. मी मागते ते 'हे' देतात.' 'मुर्ख आहेस!' आई म्हणाली, ! 'अगं! तुझा नवरा तुला प्रत्येक गोष्ट देतो ? म्हणजे तू नीट मागितले नसावेस.... किंवा तुझा नवरा पुरूष तरी नसावा.' पृ. १०९

दोन गिधाडपक्षी म्हणे पुशा व विधाता नावाचे दोन साधू होते. त्यांच्या तोंडचा उष्टा प्रसाद खाण्यासाठी घडलेला प्रसंग व एक इसम पुढे होऊन लेखिकेला म्हणतो, 'पुशा व विधाता केव्हाच उ:शापाला गेले असतील. आता येतात ते पक्षी माणसाळलेले होत, पाळलेले होते. अन्नासाठी दाही दिशा नाही, त्यांना एकच दिशा माहित होती. त्या तिरूकुलू-कुंदरमूच्या दिशेकडे ते सरळ येतात. पुजाऱ्याच्या हातचे नैवेद्य खातात आणि परत जातात.' पृ. १११

पाँडीचेरीला अरविंदाची म्हणून ओळखली जाते. पण काही महाभाग असेही लेखिकेला भेटले. एक सुटाबुटातला असामी विचारीत होता, 'अरविंद कुठे आहेत ? आणि माताजी ?' पृ. ११८

१९०५ साली वंगभंगाची चळवळ सुरू झाली. अरविंदनाही इंग्रजांनी पकडले. तुरूंगात टाकले. तेव्हा त्यांनी एक दिवस श्रीकृष्णाला जाब विचारला, 'देवा ! भगवंता ! आपली काहीच चूक नसताना, अपराध नसताना आपण या तुरूंगात का कोंडलो गेलो आहोत ? आपल्यावर हा वृथा आळ का ? आपल्याला ही शिक्षा का म्हणून ?

आणि तुरूंगात असताना एकदिवस त्यांना श्रीकृष्णाचा संदेश आला. देवांनी त्यांच्या डोळ्यांवरील पटल दूर केले. श्रीकृष्ण बोलत होता. सुख व दूःख, रात्र व दिवस, शोक व आनंद ही एकाच जीवनाची दोन अंगे. ती तुला समजावून द्यायला हवी होती. तुझ्या डोळ्यांवरील भ्रम दूर व्हायला हवा होता. त्यापलीकडे तुझी नजर पोहोचायला हवी होती. पृथ्वीवरील निर्मितीची मानवजात हा शेवटचा टप्पा नव्हे. उत्क्रांती चालूच राहील व ती मानवजातीला मागे टाकील. या जीवनश्रेणी आगमन कार्यात आपल्याला सहभागी व्हायचे असेल तर...... त्याच दिशेने, त्याच वेगाने मार्ग कापायला पाहिजे. हे ज्याचे त्याने जाणून घ्यायला हवे. 'कर्मण्येवाधिकारस्ते.....' गीतेचे हे सार तुला समजायला पाहिजे होते, ते तू पचवायला हवे होते म्हणून हा प्रपंच करावा लागला. आता फार दिवस तुरूंगात राहणे नाही. पृ. १२०

एक माणूस एका हॉटेलमध्ये गेला आणि त्याने मिसळ मागितली. मिसळीत झुरळ होते, ते त्याने हॉटेलच्या मालकाला दाखविले, पण 'दोन रुपयांच्या मिसळमध्ये हत्ती–घोडे कुठून असणार ?' मालक उद्गारला. पृ. १२६

शेक्सपीयर म्हणतो नावात काय आहे ? तरीही लेखिका तो जिवंत असता तर त्याला नावात काय नाही ? असे विचारावेसे वाटले असते असे म्हणून बरेच संदर्भ नमूद करतात. पृ. १३०

**आज इथे उद्या तिथे : काव्यात्मकता**

सौ. पाणंदीकरांनी आपल्या या प्रवासवर्णनामध्ये स्वत:च्या निर्मित

काव्याच्या ओळींचाही समावेश केला आहे. काव्याच्या ओळीमुळे प्रवासवर्णनास आणखीन गती प्राप्त झाली असून, प्रवासवर्णन वाचनीय तर झाले आहेच त्याचबरोबर त्याला लयबध्दता, तालबध्दता आली आहे. त्यामुळे ललित साहित्यात ह्या प्रवासवर्णनाचे सौंदर्य आणखीनच खुलून उठले आहे. हे पुढील उदाहरणांनी आपल्याला पटते.

प्रवास हा कसा असतो तर 'दोन दिसाची रंगतसंगत; दोन दिसाची नाती' अशाच स्वरूपाचा असतो. पुढे गंगेत लोक अंघोळ करून पाप विसर्जन करतात. लेखिकेला याचे काहीही वाटत नाही. त्या म्हणतात..... 'नाही पुण्याची मोजणी नाही पापाची टोचणी' पृ. १२. एक लहान मुल व आई यांच्यातील घडलेल्या प्रसंगावर एक कविता सुचते. लेखिका लिहितात.

''चंवर गळता........... भियेव नाक

उरतले ते धरतले

सगळी जीण भरतले............ '' पृ. १८

वाटेत जेव्हा रानझाडे लागतात तेव्हाचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात. 'निळी जांभळी रानतुळस...... लाल गुलाबी गुलाब..... पुढे आली प्रभूंच्या ओळींची आठवण करून देतात 'ऐलतडी आले रंग रंग.....' पृ. १९ खजुराओ मंदिर पाहायला जाताना पाऊस लागत नाही. जेव्हा मंदिराजवळ लेखिका पोहचतात तेव्हा पाऊस थोडा थोडा पडू लागतो व त्यावेळी गुलमोहरच गाणे गात होता असे लेखिका म्हणतात.

'सरीवर सरी आल्या गं ! सचैल गोपी न्हाल्या गं !

देवळांवरच्या गोपी न्हाल्या ग ! .......'पृ. ५३

बारामुल्ला ह्या स्थळाला भेट देतात तेव्हा बोरकरांच्या कविता आठवतात, 'याची ज्यानी देऊन नीज शीर, घडले मानवतेचे मंदिर, परि जयांच्या दहन भूमीवर नाही चिरा नाही पणती !' पृ. ८५.

नूरजहाँने मासळींच्या नाकात नथनी घातल्यावर त्या कश्या सुळूक सुळूक नाचत असतात याचेही वर्णन लेखिका काव्यातून व्यक्त करतात. 'नथनी मोरी डोले ! होले होले !' पृ. ९०

सिलीगुडीला जाताना लेखिकेला काव्य सुचते ते तेथील निसर्ग पाहून त्या भारावून जाऊन काव्य पंक्ती उच्चारू लागतात.

''किलबिल किलबिल पक्षी बोलती, पानोपानी फुले बहरती,

फुलपांखरे वर भिरभिरू, स्वप्नी आले बाई, गाव पाहिला आज

एक मी गांव पाहिला बाई !'' 'कुणी न मोठे कुणी धाकटे' पृ.

११४

कोणार्क पाहून लेखिका जवळच्या समुद्राकडे गेल्या. समुद्र जणू काही वाईट घडलेच नाही असा दूर राहून खिदळत होता........ काही हरकत नाही....... दिलासा देत होता. तेव्हा लेखिका केशवसुतांच्या ओळी आठवतात. 'जुने जाऊ द्या मरणा लागूनी.....' असे वर्णन करतात. ओडिसात भुईया लोक जुने काहीच ठेवत नाहीत. दर वर्षी अग्नीसुध्दा नवा करतात..... उगीच शोक का करायचा..... म्हणूनच त्या वरील ओळी उद्घृक्त करतात. पृ. १३४.

जगन्नाथ मंदिरात जेव्हा दोन कनोजी ब्राम्हण भेटले तेव्हा त्यांनी दान मागण्यासाठी वह्या काढल्या कोणीच त्यांना दाद न दिल्याने त्यांनी शिव्याशाप दिला. तेव्हा लेखिका बाकीबाब बोरकरांच्या ओळी ह्या प्रसंगासाठी उद्यृक्त करतात.

'स्वर्ग नको, सूरलोक नको.......... तृप्ती नको, मुक्ती नको, मज लोभस हा इहलोक हवा'...पृ. १३८

लेखिका भावस्पर्शी प्रसंग, निसर्गसौंदर्य वर्णन, स्त्री सौंदर्यवर्णन, खेळकर प्रसंग सहजरित्या काव्यमयरितेने काव्यात्मक करतात. अन् प्रवासवर्णन आणखीनच चटकदार व वाचणीय करतात.

**देखणी दक्षिण : काव्यात्मकता**

सौ. उषा पाणंदीकरांच्या लेखनीचा आणखी एक गुण विशेषाने जाणवतो. तो म्हणजे काव्यमयता. एखादा भावस्पर्शी प्रसंग असो निसर्गसौंदर्यस्थळ वा खेळकर मनोवृत्ती असो प्रसंगानुसार त्या त्या प्रसंगाला न्याय देतात. तो प्रसंग काव्यातून त्या व्यक्त करतात. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, त्यांच्यात एक कवयित्रीसुध्दा कार्यरत असल्याचे त्यांच्या पुढील उदाहरणांवरून दिसून येते.

एक बोगनवेल शरमून लाल झाली, अन् म्हणते

' मुझे मालूम है...... मै शराबी नह

पर कोई पिलाये तो मै क्या करूँ ?'   पृ ३३

ज्यावेळी प्रवासात दूरवर दरी पसरलेली असते. बाजूचे डोंगर, खालची

नारळीची झाडे दूरची वाटत होती. या भितीदायक वातावरणाचे वर्णन त्या पुढीलप्रमाणे करतात.

'काळवंडली जळे.... चिंचही न सळसळे.... वाटते भयाण सर्व सलत आत कातरा' पृ. ३७

जेवणासाठी छान हॉटेल होते. चहा, कॉफी, वडा, इडली, उतप्पा सारे काही होते, विशेष म्हणजे गर्दी सुध्दा नव्हती पण योग्य वेळ नसल्याने त्या पुढील ओळी वर्णितात.

'भलत्या वेळी, भलत्या मेळी, मन असता भलतीच कडे.....' पृ. ३९ राजा रविवर्माने सुगंधाला निरोप दिला त्यावेळी त्याच्या तोंडात जे उद्गार लेखिकेने घातले ते काव्यमय आहेत ते पुढीलप्रमाणे.

'मी तुझा कोणी नव्हतो,
..... आणि कुणी नाही
विसर सर्व घडलेले
विसर तू, मलाही.....' पृ. ५५

कन्याकुमारीच्या विषयी त्यांनी काव्यमय ओळी वर्णन केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

सगळच कसे होणार
आपल्या मनासारखे
आपणसुध्दा आपल्याला

होत असतो पारखे..........!' पृ. ६४

आपल्या प्रियकराची वाट पहात उभी असणाऱ्या कन्याकुमारी विषयी वरील ओळी वर्णन केल्या आहेत. तिरूपतीचे मंदिर पाहताना बा. भ. बोरकरांचे 'चांदणो चांदणे' त्याच पुढे म्हणतात पण छे ! सांगणे जमत नाही. शब्द हरवतात. काई बाई सांगू.... कसं गं सांगू.....पृ. ७४

खदखद हसणाऱ्या सुर्यफुलांकडे पाहून हिरमुसल्या होणाऱ्या ओव्या ओल्या गुलमोहरला त्याचे पडझड झालेले चिरे समजावत होते.

'मोर सुंदर नाचतो म्हणून आपण का सुन्न व्हायचे ?

कोकीळ सुंदर गातो म्हणून आपण का खिन्न व्हायचे ?' पृ. ११५

सिताने रावणाविषयी जे उद्‌गार काढले ते काव्यमय स्वरूपात लेखिका मांडतात. खरेतर तसे सितेला वाटले तर नसेल असेही लेखिका पुढे म्हणतात.

'सिता होऊन लिहावे; पुन्हा एक रामायण

नारीसाठी दोन नाही........ राम आणि रावण' पृ.१३२.

हिरव्यागार झाडांचे ओले लावण्य मनाला ताजगी देत होते. निलगीरीची झाडे आणखी निळी झाली होती. 'झाडे झाली निळी, निळी.....' बोरकरांना ही कविता इथेच सुचली का ? असा त्या स्वत:लाच प्रश्न विचारतात. तर बाजूच्या गर्द झाडीत एक मधुचंद्री युगुल निवांत, नि:शब्द बसून धुंद डोळ्यांनी हे पिऊन घेत होते. हळू-हळू सुर्याचा लाल गोळा राणीवशात येऊ लागला. स्वप्नील धुके तर पृथ्वीला सोडायला तयार नव्हते. एक

लोककथा कानात येऊन गुणगुणू लागली. पृथ्वीचे खरे प्रेम आकाशावर...... पण तिचे लग्न झाले. पृथ्वीचे सकाळ–संध्याकाळ सुर्याकडे होणारे मिलन पाहून आकाश रागाने लाल होते, चिडते, तळमळते आणि रडून घेते. प्रियकराच्या दहिवराने भिजून पृथ्वी चिंब होते. पृ. १३९ खरोखरच लेखिकेने वरील ओळीतूनही काव्यमयता जपली आहे. एखादा प्रसंग सहजसोप्या शब्दात काव्यमयपणे त्या उभ्या करतात. हे त्यांच्या लेखणीचे विशेष म्हणून आपल्याला दखल घ्यावी लागेल.

**आज इथे.... उद्या तिथे : उपमा प्रतिक :**

**उपमा**

एक बाई शहामृगासारखी तोंड खुपसून पडली होती. पृ. १४

जीव मुठीत धरून शेजारच्या शिवालिकडे आशेने पहात आम्ही हा घाट ओलांडून देव प्रयागला पोहचलो पृ. १४

मंदाकिनी नदी अगदी घास घ्यायला टपलेल्या लावसटीसारखी पाताळात खळखळ आवाज करीत होती. पृ. २२.

देवद्वारात गेलो तेव्हा धुक्यात उन्ह तरळत होते. मागचा पर्वत सोनेरी सुर्यकिरणात सोन्या चांदीने मढवल्यासारखा वाटत होता. पृ. २५ भक्ष्य गिळून पडलेल्या अजगराप्रमाणे हवा सुस्त होती. पृ. ४६.

**प्रतिक :**

केवड्याच्या पातीसारखी, गोरी गोरी, शंखाकृती चेहऱ्याची, तिचे हसणे

म्हणजे देवघरातील किणकिणणारी घंटा आणि डोळ्यात संथपणे तेवणारे निरांजन होते. अळीता लावलेले तिचे पाय पाण्यात साळकासारखे वाटत होते. फेनधवल प्रपात, भुसभुशीत बर्फ, वाट वळणावळणाची, सुताएवढी धार, विंचवाचा दाह हा मदनाच्या दाहासारखाच..... न सोसण्यासारखा.

उषा पाणंदीकरांनी आपल्या पुस्तकात उपमा व प्रतिकांचा सुंदर वापर केला आहे. या दोन्ही अलंकारांचा सुंदर मिलाप त्यांनी या पुस्तकात केला आहे. वाङ्.मयीनदृष्ट्या ह्या घटकामुळे ह्या पुस्तकाच्या सौंदयात आणखीनच भर पडली आहे. अफाट कल्पनाशक्तीच्या जोरावर त्यांनी वेगळे विश्व त्यांनी उपमांच्याव्दारे मांडण्याचा प्रयत्न छान केला आहे.

**देखणी दक्षिण मधील उपमा, प्रतिक :**

उपमा हा जसा एक अलंकार आहे, तसे उपमान हे एक ज्ञानाचे प्रमाण आहे. यामुळेच वाक्यार्थास अधिक सौंदर्य आणून द्यावयाचे व दुसरे म्हणजे वस्तुस्वरूप अधिक स्पष्ट करून सांगावयाचे. मुळ वस्तू सुंदर नसली तरी उपमा सुंदर होऊ शकते. ती त्या उपमेमधील सादृश्याच्या उत्कटत्वामुळे उपमेय–उपमानभूत अशा दोन वस्तूमधील साधर्म्य उत्कटत्वाने प्रतीत होते हेच त्या वाक्यार्थातील सौंदर्य अथवा त्यांची शोभा. म्हणूनच मुळात सौंदर्य जरी नसले तरी ते वाक्यार्थात उतरण्याचे कारण म्हणजे साधर्म्य दर्शनामधील लेखकाचे कौशल्य होय. लेखकाची अलंकार वापरण्यातील प्रतिभा अशा ठिकाणी प्रत्ययास येते. सौ. उषा पाणंदीकर यांनीही उपमा या अलंकाराचा आपल्या

पुस्तकात सुंदररित्या वापर केला आहे.

**उपमा :**

- किनाऱ्यावरती तरणीताठी सुरूची झाडे समोरच्या डोंगराला अचकट–विचकट नाचून दाखवीत होती. पृ. १०
- गरिबांच्या घरातील गंजलेले चिमणीचे दिवे गेले होते. आता विजेच्या दुधी प्रकाशाने घर उजळून निघत होते. पृ. १३.
- जोगचा मागचा हिरवाकच पहाड एखाद्या वन पुरूषासारखा नटून राहिला होता. पृ. १३.
- शत्रूची टेहळणी त्याच्याशी दोन हात करण्यासाठी ढालीसारखा या गोपुरांचा उपयोग होत असे आणि अरिष्ट, पूर या संकटांना ही गोपुरे आईच्या मायेने कांगारूसारखी लोकांना पोटात घेऊन बसत. पृ. १५.
- कारागिरांचे कुशल हात लागल्यावर हा वज्रादपी कठोर असलेला पाषाण फुलाहूनही कोमल झाला असेल; लोण्याहूनही तो मऊ बनला असेल. पृ. १६.

**प्रतिक :**

फुलांसारखे फेसांचे तुरे, महारूद्र रूद्रासारखा गर्जत होता, निळी, हिरवी, गुलाबी इंद्रधनुष्ये फुलत होती. नाट्यमय मुद्रा, मोहक अंडाकृती चेहरा, सरळ चाफेकळी नाक, धनुष्यकृती भुवया, मोहक तोंडली ओठ, मासोळीसारखे चंचल नेत्र, मखमली उदर,

कर्दळी मांड्या, यौवनाने टचटचलेले उन्नत उरोज, केळीच्या सोप्यासारखे पाय आणि आषाढ घनासारखा भरघोस केशसंभार.

**समारोप :**

या प्रकरणात आपण वाङ्:मयीन मुल्यमापन पाहिले, यामध्ये प्रवासवर्णन वाङ्:मयातील वेगवेगळ्या घटकावर लक्ष केंद्रीत केले आहे. लेखिकेने प्रवासवर्णनामध्ये कोणत्या घटकांचा अवलंब केला आहे ? कितपत केला आहे? कोणत्या पातळीवर केला आहे? याचा ऊहापोह या प्रकरणात केला असून यामध्ये,रचनाविशेष, निसर्गचित्रण, व्यक्तिचित्रण, निवेदनशैली, शीर्षकाची समर्पकता, छायाचित्रे, भाषाविशेष. यामध्ये पुन्हा म्हणी, मराठी म्हणी, कोकणी म्हणी, संस्कृत म्हणी, पोर्तुगीज म्हणी, हिंदी म्हणी तसेच हिंदी, संस्कृत, इंग्रजी, कोकणी शब्दांचा वापर, हिंदी गीतांचा वापर, संवाद, काव्यमयता, उपमा या वाङ्:मयीन घटकांच्या आधारे वरील दोन्ही पुस्तकांचे वाङ्:मयीन मुल्यमापन आपण पाहिले लेखिकेने प्रत्येक घटकाचा सुंदर असा वापर केल्याचे आपणास दिसून येते.

पुढील प्रकरणात आपण आज इथे उद्या तिथे व देखणी दक्षिण या दोन्ही पुस्तकलेखनाचे विशेष पाहू.

# संदर्भ ग्रंथसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. जोशी ग. ना. (संपा) | : | तत्वज्ञानाची कहाणी (The Story of Philosophy) मुळ लेखक : विल ड्युरांट अनुवाद साने गुरूजी. चेतश्री प्रकाशन, मुक्ताई, अंमळनेर. पान नं. १८८, प्रथमावृत्ती ११ जून १९९९. |
| २. | चित्तमपल्ली मारूती | : | शब्दाचं धन, प्रथमावृत्ती, नागपूर. (का. ना.) पृ. ८८. |
| ३. | जोशी प्र. न. | : | अर्वाचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९९७, द्वितीयावृत्ती १५ ऑगस्ट २०००. (१८००-१९६०) पृ. १९५. |
| ४. | फडके ना. सी. | : | प्रतिभासाधन १९३१, पृ १०९. |
| ५. | कुलकर्णी गो. म. | : | मराठी वाङ्.मयाचा इतिहास खंड सहावा : भाग दुसरा, |
| | कुलकर्णी व. दि. | : | महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, पहिली आवृत्ती २७ |

मे १९, ९१ पृ. २३०.

६. तत्रैव : पृ. २३०

७. सिरिअस अॅलॉट, रोहेज अॅन्ड : फॉर्म अॅज व्हेरीड अॅज कंटेन्ट नॉव्हे लिस्टस्
केगन पॉलऑन द नॉव्हेल, लंडन, पुनर्मुदित,
१९७७, पृ. क्र. २६५.

८. पांटील गंगाधर : समीक्षेची नवी रुपे
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. १९७५.

९. निरगुडकर भारती : 'गाडगीळांची समीक्षा रूपे पृ. १०५. पद्मगंधा
प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २५ मार्च २००५.

१०. जोशी ग. ना.( संपा.) : मुळलेखक : विल ड्युरांट, अनुवाद – सानेगुरूजी.
The story of philosophy चेतश्री
प्रकाशन, मुक्ताई, अंमळनेर, प्रथमावृत्ती ११
जून १९९९. पान. ४९७.

११. पाटील आनंद : सृजनात्मक लेखन पृ. २७०, २७१. लेखन
प्रथमावृत्ती मार्च २००५, पद्मगंधा प्रकाशन,
पुणे.

१२. नेमाडे भालचंद्र : साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन,
औरंगाबाद १९८७, आवृत्ती पहिली पृ. ४.

१३. नेमाडे भालचंद्र : तत्रैव पृ. १०

१४. पाटील आनंद : सृजनात्मक लेखन, प्रथमावृत्ती मार्च २००५, पद्मगंधा प्रकाशन पुणे, पृ. २६९.

१५. Krappe Alexander : The science of folklore Metuen 1965, Page No. 143.

१६. नवरे निळकंठ शंकर : मराठी म्हणींची मिमांसा : लोकसाहित्य भाषा आणि संस्कृती (संपा) सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती १९६३ पृ. ६१.

१७. भिडे विद्याधर वामन : 'मराठी भाषेचे वाक्यप्रचार व म्हणी' चित्रशाळा प्रकाशन, पुणे. १९५९ पृ. ३५९.

१८. जोशी ग. ना. (संपा.) : पाश्चात्य तत्वज्ञानाची कहाणी : (The Story of philosophy) मुळ लेखक : विल ड्युरांट, अनुवाद : साने गुरूजी, चेतश्री प्रकाशन. मुक्ताई, अंमळनेरे, प्रथमावृत्ती ११ जून १९९.पृ. ८४.

१९. वा. ल. कुलकर्णी : साहित्य शोध आणि बोध पॉप्युलर प्रकाशन
दुसरी आवृत्ती, १९९५/१९९६, पृ. ४७.

२०. पुंडे दत्तात्रय
तावरे स्नेहल : साहित्य विचार
प्रकरण : साहित्याचे प्रयोजन, स्नेहवर्धन
पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. ३७

२१. मालशे मिलिंद : आधुनिक भाषा विज्ञान लोकवाड्.मय गृह, मुंबई.
प्रथमावृत्ती फेब्रु.
१९९५ राज्य मराठी विकास संस्थेच्या
सहकार्याने दुसरी सुधारीत.
नोव्हें. १९९८ तिसरी (I) नोव्हें. २००४.

२२. दावतर वसंत : गीतकाव्य
अलोचना प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती जानेवारी
१९७१. पृ. ४८.

२३. जोशी सुधा : कथा : एक साहित्य प्रकारावरील निबंध, साहित्य
अध्यापन आणि प्रकार, पृ. २९६. संपा. सी. पु.
भागवत, सुधीर रसाळ इत्यादी.
पॉप्युलर आणि मौज प्रकाशन, मुंबई, १९८७
आवृत्ती पहिली.